९२-८७

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

संग्रहालय, ठाणें.
/वाचनालय शाखा.
| क्रमांक २२
हिंदुत्वाचे पंच प्राण
लेखक
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवं नका.
डा. ना. [illegible]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
सं. हालय/वाचनालय शाखा.

| अनुक्रम नं. २१५ | विभाग निबंध. | क्रमांक १२ |
|---|---|---|

पुस्तकाचें नांव हिंदुत्वाचे पंचप्राण.
लेखक वि. दा. सावरकर.
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0006850

स्वा. वि. दा. सावरकर

× × ×

# हिन्दुत्वाचे पंचप्राण

REFBK-0006850

प्राप्तिस्थळः—
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबई ४



मूल्य तीन रुपये

पहिली आवृत्ती
जानेवारी १९४७
मुखपृष्ठ
रघुवीर
मुळगांवकर

सर्वाधिकार लेखकाकडे

मुद्रक
कृ. ना. सापळे
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
त्रिभुवन रोड मुंबआी ४
प्रकाशक
जी. आर. भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड, मुंबआी, ७

[library stamp] ८८५०

# हिंदूंचा हिंदुस्थान

हिंदुराष्ट्रवादाच्या अंगोपांगाची साग्र चर्चा करणारे वीर सावरकरांचे मोटमोठे प्रबंध अभ्यासिणें हें वेळेच्या किंवा ग्रहणशक्तीच्या अडचणी-मुळें ज्यांच्या आटोक्यांत येत नाहीं; परंतु ज्या सहस्रावधि सर्वसामान्य वाच-कांना त्या विषयींची वीर सावरकरांचीं मतें त्यांच्याच प्रभावी लेखनांतून नि शब्दांतून वाचण्याची नि ऐकण्याची उत्कंठा असते; त्या वाचक—वर्गासाठीं हिंदुसंघटनाचीं मूलसूत्रें अगदीं साध्या नि आटोपशीर रीतीनें मनावर ठस-विणारे शेकडों लहान नि स्वतंत्र लेख वीर सावरकरांनींच लिहिलेले आहेत. त्या लेखांपैकीं निरनिराळ्या दृष्टिकोनांतून वर्गीकरण केलेल्या निवडक लेखांचे संग्रह आजवर पुष्कळांनीं प्रसिद्धिले. पूर्वी प्रख्याती पावलेल्या 'श्रद्धानंद' मंडळाचे 'संघटन संजीवनी'पासून तों 'हिंदु संघटनाचें ध्येय नि धोरण', 'सावरकर सूत्रें', 'वीरवाणी' अशा प्रकारचे जे अनेक निवडक लेख-संग्रह आजवर प्रसिद्धिले गेले त्यांच्या सहस्त्रों प्रती विकल्या गेल्या असतांनाहि वीर सावरकरांच्या निवडक नि स्फुट लेखांच्या अेखाद्या नव्या आटोपसर संच-याची मागणी आजही सारखी चालू आहे. हिंदुसंघटनाच्या प्रचारार्थसुद्धां ही वाढती मागणी पुरविणें अेक कर्तव्यच आहे. यासाठीं हिंदुराष्ट्रवादाच्या कांहीं अत्यंत मूलभूत सूत्रांवर आणि हिंदुसंघटनार्थ अगदीं त्वरित जो हातीं घेतलाच्च पाहिजे अशा कार्यक्रमावर वीर सावरकरांनीं लिहिलेले कांहीं स्फुट पण परि-णामकारक लेख निवडून हा लहानसा नवा संचय मी संपादिला आहे.

पण ह्या संचयासाठीं अेका नव्याच दृष्टिकोनांतून मी लेखांची निवड केली. हिंदुराष्ट्रवादाची सर्व हिंदुस्थानच्या वैचारिक वातावरणांत मोठी खळबळ अुडवून देणारी पहिली अधिकृत अशी घोषणा वीर सावरकरांनीं आपल्या कर्णावती येथील हिंदुमहासभेच्या अध्यक्षीय भाषणांत सन १९३७ मध्यें केली ही गोष्ट सर्वांना ठाअूक आहे. त्या भाषणानें अुठविलेलें वादळ अजूनहि निवळलेलें नाहीं. वर्तमान-पत्रेंच नव्हेत डॉ. आंबेडकर, दुराणी, डॉ. राजेंद्रप्रसाद सारख्यांनीं आपल्या ग्रंथा-तूनहि त्याची चर्चा केली आहे. बॅ. जीनांनीं तर विरोधी भक्तीची परिसीमाच गांठली आणि येतां जातां थापा मारीत सुटले कीं, बॅ. सावरकरांनीं त्या भाषणानेच मला द्विराष्ट्रवादाची अक्कल सुचविली. पण कर्णावतीच्या त्या भाषणाचे प्रभावशाली प्रतिध्वनि भारतभर अुठावे हें सहाजिकच असलें तरी भारतांतील बहुतेक हिंदु पुढाऱ्यांना सुद्धां ही गोष्ट माहीत नाहीं कीं, हिंदु-संघटनेच्या आन्दोलनाची तत्त्वात्मक नि कार्यात्मक योजना वीर सावरकर अंदमानांतून सुटण्यापूर्वीपासूनच आंखीत होते. सन १९२४ त ते बंदींतून सुटून रत्नागिरीस स्थलबद्ध झाले. त्या दिवसापासून त्यांनीं त्या योजनेची तिच्या त्या दुहेरी स्वरूपांत कार्यवाही करण्यास प्रारंभिलें, हिंदुराष्ट्रवाद तेव्हां-पासूनच ते प्रचारवूं लागले आणि त्यांच्या कार्यक्रमाचे त्यांच्या स्थलबद्धतेच्या कक्षेंत सामावतील असे प्रत्यक्ष प्रयोगहि त्यांनीं चालविले. त्याचप्रमाणें कर्णा-वतीस हिंदुराष्ट्रवादाची अखिल भारतीय घोषणा होण्यापूर्वी चौदा वर्षें त्यांनीं त्यांतील अंगोपांगांचें विशदी-करण करणारे अनेक स्वतंत्र ग्रंथ आणि श्रद्धा-नंद, केसरी, किर्लोस्कर प्रभृति नियतकालिकांतून शतावधि स्फुट लेखहि लिहिले होते. **ह्या घटनेकडे हिंदुसमाजाचें लक्ष वेधण्यासाठीं ह्या प्रस्तुत संचयांत त्यांचे १९३७ पूर्वीचे लेखच मुख्यत: घेतलेले आहेत.**

त्यांतहि दुसरी महत्त्वाची जी गोष्ट मी ही निवड करतांना दृष्टिआड केली नाहीं ती ही कीं, वीर सावरकरांच्या हिंदुसंघटनात्मक कार्यक्रमाचें राजकीय अंगच काय तें लोकांच्या डोळ्यापुढें प्रामुख्यानें मांडलें जातें. हिंदुस्थानांतील लक्षावधि

हिंदु अद्यापहि त्यांना राज्यक्रांतीचे नेते नि राजकारणांतील अध्वर्यु म्हणूनच काय ते ओळखतात. परंतु वीर सावरकरांचा हिंदुराष्ट्रवाद अशा अेकांगी, ठिसूळ किंवा तात्पुरत्या पायावर अुभारलेला नाहीं. हिंदु राष्ट्राची प्रबळ नि प्रभावी अुभारणी करण्यासाठीं **राज्यक्रांतीप्रमाणेंच समाजक्रांतीहि केली पाहिजे.** ही क्रांति आधीं कीं ती आधीं हा प्रश्नच आजच्या परिस्थितींत अुरलेला नाहीं. किंबहुना हिंदुसंघटनात्मक अशा ह्या अेका क्रांतीवांचून दुसरी क्रांति घडणेंच कठीण; घडली तरी टिकणें तर सुतराम अशक्य ! हा सावरकर-वादाचा जो मूळ कटाक्ष तिकडे हिंदु संघटकांचें विशेष लक्ष वेधण्यासाठीं मी ह्या संचयांत त्यांच्या हिंदु राजकारणाप्रमाणेंच हिंदु समाजकारणावरीलहि अेक दोन लेख संग्रहिले आहेत.

ह्या संग्रहांतील लेखांतून **सावरकरांच्या लिखाणांतील साहित्यिक वैशिष्ट्यहि,** अेखाद्या क्षेत्रांत वाहत्या गंगेच्या प्रवाहांतील बांधलेल्या घाटांमधील स्फटिक कुंडांतूनहि गंगाजलाचें पावनत्व प्रतिबिंबावें तसें प्रतिबिंबित झालेलें आहे. यथासमय शरसंधनिलेले आवेश, कोटिक्रम, अुपरोध, अुपहास, विनोद, तेज नि प्रभाव हे सावरकर साहित्याचे विशेष ह्या दहापांच लेखांतूनहि तळपत असून ते वाचकाच्या मनाची पकड घेतात.

हिंदुराष्ट्रवादाची सूत्रें म्हणून जीं वाक्यें नाना भाषांतून अनुवादिलीं जाअून हिंदुस्थानांतील लक्षावधि हिंदुत्वनिष्ठांच्या तोंडीं आज रुळलेलीं आहेत त्यांतील बहुतेक वीस पंचवीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या या लेखांतूनच प्रथमतः अुपयोजिली गेलीं. एकेक ग्रंथ ज्यांत सामावलेला असतो अशा अेकेका वाक्यांचे त्यांचे ठांशीव मथळेच पहा !. " आ–सिंधु–सिंधु भारतभूमि हीच ज्याची पितृभू नि पुण्यभू आहे तो हिंदु ! ! " " ज्यांत स्वत्व आहे तेंच स्वराज्य !" "अर्थात्च ज्यांत हिंदुत्व अबाधित राहातें तेंच हिंदूंचें स्वराज्य !", " स्वराज्यासाठींच संघटन हवें", " संख्याबळ हेंहि बळच आहे !" " आम्हांस संख्याबळहि हवें नि गुणबळहि हवें !", " प्रत्याघाताचें धैर्य हिंदूंत नाहीं असें समजूं

नका !", "अेकटे हिंदूसुद्धां स्वराज्य मिळवूं शकतील !", "जो दर्शनानें बाटतो तो देवच्च नव्हे !", धर्माचें स्थान हृदय, पोट नव्हे", "आजचा जातिभेद जन्मजात नाहीं, तर तो आहे केवळ पोथीजात !" "अत्याचाराच्या सूडाची प्रेरणा ही केवळ प्रतिकारकच नाहीं तर परोपकारकहि आहे !" "आत्यंतिक अहिंसा हे आत्यंतिक हिंसेप्रमाणेंच पाप आहे; पुण्य नव्हे !" "सापेक्ष अहिंसा हीच काय ती धर्म्य !" 'आमची राष्ट्रभाषा—संस्कृतनिष्ठ हिंदी ! आणि देवनागरी—आमची राष्ट्रलिपी !!' "म्हण—शिवेन, स्वीकारीन !!"

"ज्या सर्व सामान्य वाचकाकरितां आणि विशेषत: जिज्ञासु अशा तरुण वर्गाकरितां हा संग्रह मी संपादिला त्यांनीं ह्या लेखांचे वरील सूत्रमय मथळे जरी पाठ केले तरी, अेकश्लोकी रामायणाप्रमाणें हिंदुराष्ट्रवादाचा ग्रंथच्या ग्रंथ त्यांच्या मनावर ठसल्यावांचून राहाणार नाहीं !

यास्तवच्च ह्या मूळ लेखांच्या लहानशा संचयाला अगदीं अन्वर्थक नांव म्हणजे "हिंदुत्वाचे पंचप्राण !"

वीस पंचवीस वर्षांपूर्वी जेव्हां हे लेख प्रथम प्रसिद्ध होत गेले तेव्हां चोहों-बाजूंनीं त्यांचे विरुद्ध कोण काहूर माजलें हें प्रसिद्धच आहे ! पण स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे चाळीस वर्षांपूर्वीचे क्रांतिकारक लेख, घोषणा नि अुद्गार हें जसे आजच्या पिढिच्या हाडींमाशीं खिळलेले आढळतात आणि लहानसहान मुलेंहि "स्वातंत्र्यलक्ष्मीकी जय"च्या गर्जना करीत रस्तोरस्तीं खेळत आहेत आणि स्वातंत्र्यसैनिक रणोरणीं लढत आहेत, तसेच पंचवीस वर्षांपूर्वीचे सावर-करांचे हे हिंदुसंघटनात्मक लेख नि हे अुद्घोष आज लाखों हिंदुत्वनिष्ठांच्या रक्तांत तरी भिनूं लागले आहेत. फार काय, असमंजसपणें किंवा अहंमन्यतेनें हिंदु संघटनाला विरोधिणाऱ्या पक्षाच्या शिबिरांतूनहि त्यांच्या शब्दाशब्दांचे नि सूत्रासूत्रांचे पडसाद अुठत आहेत ! ते मथळे, ते लेख, ती भाषाशैली आतां राष्ट्राच्या अितकी अंगवळणीं पडत चालली आहे कीं, ती प्रथम कोणी अुद्भविली, कोणी प्रचारविली ह्याचीसुद्धां लोकांना विस्मृति पडत आहे.

प्रत्येकास ती आपलीच विचारसरणी नि कार्यसरणी आहे असें वाटूं लागत आहे. आणि अेकाअर्थी ही विस्मृतिच ह्या लेखांतील अुद्दिष्टाचा विजय आहे; त्याचें साफल्य आहे. वीर सावरकरांनींच त्यांच्या अेक दोन सुप्रसिद्ध ग्रंथांत लिहिलें आहे कीं, " माझ्या ग्रंथांतून प्रचारविलेली कार्यें अितक्या तडफेनें माझ्या राष्ट्रानें पार पाडावीत, आणि माझे विचार आत्मसात करावेत कीं, हे माझे ग्रंथ शक्य तितके लवकर केवळ भूतकाळाची आठवण म्हणूनच काय ते अुरले तर अुरावेत !"


पण जोंवर त्यांचीं तीं अुद्दिष्ट कार्यें पार पडलीं नाहींत तोंवर ह्या सावरकर-वाङ्मयाच्या पौष्टिकाचें जितकें जितकें अधिक निष्ठेनें सेवन केलें जाअील तितकी तितकी आपल्या हिंदु राष्ट्राची प्रगति, पराक्रम नि प्रभाव हीं अधिकाधिक वाढत जातील अशी माझी निश्चिति असल्यानें अुदयोन्मुख हिंदु तरुणांसाठीं स्वातंत्र्यवीरांच्या लेखांचा हा अेक नवा आटोपसर संग्रह मी आज संपादित आहें !

—ग. पां. परचुरे

# अनुक्रमणिका


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| हिन्दुत्वाची व्याख्या ... ... ... | १ |
| आमची राष्ट्रभाषा ... ... ... | १४ |
| म्हण—शिवेन ! स्वीकारीन ! ... ... | ३० |
| संख्याबळ हेंहि बळच आहे ! ... ... | ३६ |
| प्रत्याघाताचें धैर्य हिंदूंत नाहीं असें समजूं नका ! ... | ४९ |
| धर्माचें स्थान हृदय आहे; पोट नव्हे ! ... ... | ५१ |
| जो दर्शनानें बाटतो तो देवच कसला ? ... | ५४ |
| स्वराज्यासाठींच संघटन हवें ! ( १ ) ... ... | ६० |
| ,, ,, ,, ( २ ) ... ... | ६८ |
| खड्गा, तुझा विजय असो ! ... ... | ७६ |
| जन्मजात जातिभेद मोडायचा म्हणजे काय करावयाचें ? ( पूर्वार्ध ) | ८३ |
| जन्मजात जातिभेद मोडायचा म्हणजे काय करावयाचें ? ( उत्तरार्ध ) | ९६ |
| सूडाचें तत्त्वज्ञान. ... ... ... | १११ |

म.ग्रं.सं. ठाणे
वि.ना. ग. २६४



" राजकारणाचें हिंदूकरण करा आणि हिंदूंचें सैनिकीकरण करा "

—स्वा. सावरकर

म. ग्रं. सं. ठाणे.

# हिंदुत्वाची व्याख्या
## आणि
# हिंदु शब्दाचा सत्प्रयोग नि अपप्रयोग.

॥ आसिंधुसिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका ॥
॥ पितृभूः पुण्यभूश्चैव स वै 'हिंदु' रिति स्मृतः ॥

हिंदु हा शब्द हिंदुसंघटनाचा केवळ पायाच होय. त्यामुळें त्या शब्दाचा अर्थ ज्या मानानें व्यापक वा आकुंचित, बळकट वा ढिला, चिरंतन वा चंचल त्या प्रमाणांतच त्या पायावर अुभारलेलें हें हिंदुसंघटनाचें प्रचंड बांधकाम व्यापक, भक्कम, टिकाअू ठरणारें आहे. हिंदुमहासभा काय नि तिनें हातीं घेतलेलें हिंदुसंघटनाचें महत्कार्य काय, त्यांचें, हिंदु कोण ह्या प्रश्नाचें निश्चित अुत्तर दिल्यावांचून, अेक पाअूलहि दिशाभूल न होतां पुढें पडणें अशक्य आहे, अनर्थावह होणारें आहे.

यास्तव हिंदुसंघटनाचें कार्य ज्यांनी ज्यांनी हातीं घेतलेलें आहे त्यांच्या अुपयोगासाठीं या अत्यंत महत्वाच्या हिंदु शब्दाविषयीं जी कांहीं माहिती आमच्या मतें प्रत्येक हिंदूला अगदीं मुखोद्गत असणें अवश्य आहे असें वाटतें ती सूत्ररूपानें या लेखांत देण्याचा आमचा अुद्देश आहे. ती देतांना कराव्या लागणाऱ्या त्या सूत्रमय विधानांचें स्पष्टीकरण नि समर्थन देण्याची सोयहि अशा एका स्फुट लेखांत करतां येणें दुर्घट असल्यामुळें आम्हीं आरंभींच वाचकांना विनवतों कीं, ज्यांना तें स्पष्टीकरण नि समर्थनहि पहावेसें वाटेल त्यांनी तें आमच्या Hindutva ह्या अिंग्रजींतील मूळ ग्रंथांत किंवा निदान मराठी भाषांतराच्या, तिसऱ्या आवृत्तींत अवश्य पाहावें. किंबहुना तो मूळ ग्रंथ वाचल्याविना या लेखांतील सूत्रमय विधानांना घाअीनें आक्षेपूं नये. कारण त्या पुस्तकाच्या वाचनाने त्या आक्षेपांतील कित्येक आक्षेप अनायासेंच निरसले जातील असें आम्हास वाटतें.

## हिंदु शब्दाचें पुरातनत्व

**( १ ) हिंदु शब्द मुसलमानांनी काढलेला नाहीं किंवा आमच्या राष्ट्रास तो प्रथमतः मुसलमानांनी लावलेला नाहीं**—ज्या काळीं हिंदु शब्दाच्या अुत्पत्तीचें नीटसें संशोधन झालें नव्हतें त्या काळची ही दुष्ट दंतकथा! ती कशी तें खालीं दिलेल्या 'हिंदु' शब्दाच्या ऐतिहासिक उत्पत्तीवरून दिसून येईल.

**( २ ) हिंदु, हिंदुस्थान, हिंद या प्राकृत शब्दांचा मूळ उगम ऋग्वेदकालीन सप्तसिंधु या आपल्या स्वतःच्या प्राचीनतम राष्ट्रीय अभिधेंतच आहे—**

**ऋग्वेदांत** 'सप्तसिन्धवः' हा शब्द दैशीक नि राष्ट्रीय अर्थी आपल्या वैदिक कालच्या पूर्वजांनी स्वतःची राष्ट्रीय अभिधा म्हणून स्वतःस लावलेला आहे.

त्या प्राचीन कालीं आपल्या शेजारचीं इराण, बाबिलोन, प्राचीन अरब प्रभृति राष्ट्रें हीं आपणांस त्या आपल्या 'सप्तसिंधु' याच राष्ट्रीय अभिधेनें ओळखीत. **पारसिकांनीं** अडीच हजार वर्षांपूर्वींच्या त्यांच्या धर्मग्रंथांत आपल्या राष्ट्रास 'हप्तहिंदु' असेंच म्हटलेलें आहे. त्या काळाच्या प्राचीन **बाबोलिनिअन** ग्रंथांतून आपल्या इकडून गेलेल्या झिरझिरीत नि सुरेख वस्त्रांना 'सिन्धु' किंवा 'सिन्धच' म्हटलेलें आहे.

अलेक्झांडरचेहि पूर्वी दोनशें वर्षें होऊन गेलेला **ग्रीक** अितिहासकार हेकाटेऑस हाही आपल्या प्राचीन राष्ट्रांस आपल्या स्वतःच्याच सिन्धु शब्दाचें ग्रीक रूप जें Indu India या नांवानेच अुल्लेखित आहे. बौद्धकालीं हिंदुस्थानांत येऊन गेलेला **चिनी** प्रवासी ह्युअेत्संग हाहि आपल्या राष्ट्रास सिन्धु ह्या शब्दाचा चिनी अपभ्रंश जो 'शिन्दु' त्याच अभिधेने संबोधिता झाला. फार काय; महंमद पैगंबर जन्मास येण्यापूर्वी आरब लोक जेव्हां शैव नि शाक्त पंथांशीं सहृदय असलेल्या अेका धर्माचे अनुयायी असत आणि जेव्हां मुसलमानी धर्माचें ठावठिकाणदेखील आरबांना ठाअूक नव्हतें तेव्हांच्या दोन **हजार वर्षांपूर्वीच्या अेका अरब ग्रंथांत** आपल्या राष्ट्राविषयीं बोलतांना हिन्द व हिन्दु हीं नांवें गौरवाने उच्चारलेलीं आहेत. उदाहरणार्थ लबी बीने अखतफ बीने तुर्कीच्या खालील ओळी पहाः—

॥ अया मुबारकल अर्जे यो शैयेनोहा मिनल हिंदे ॥
॥ वा अरा दक्कला हो मओीयो नज्जेला जिक्रतुन ॥ १
॥ व हल्ह तज्जली यतुन अैनक सहवि अरब अतुन जिक्रा ॥
॥ व हाजे हियोन लज्जेलुर रसूला मिनजा अनल 'हिन्दज्जुन' ॥

दुसरा आरब कवि, आरबांच्या मुसलमानपूर्व धर्मांचा अभिमानी असा अुमर बीने हाशीम अबुल हकम, महादेवाच्या स्तुतिपर कवितेंत लिहितोः—

॥ व अह लोलहा अजरु अरमीमन 'महादेअु' व मनाजेला अिल मुददीने मिनहुम व सेयतरु ॥ १ ॥ म अस्सेर अखलका न असानन कल्ल हुम यन हुवा नजू मुन अजाअत सुम्मा गाबुल 'हिन्दु' ॥ २ ॥ व सहबी कया माफिल मका मिल 'हिन्दे' यौमना यकूल्लना लात हज्ज न फअिन्नकतो वजरु ॥ ३ ॥

## भविष्यपुराणाचा आधार

येणेंप्रमाणें सिंधुकाठीं निवसणाऱ्या आपल्या वैदिक काळाच्या राष्ट्राची आपली स्वतःची जी अभिधा 'सप्तसिंधु' तीपासूनच आपली हप्तहिंदु, हिंदु, शिंदु, सिंधु, Indus हीं प्राचीन विशेषनांवें पडलेलीं आहेत. अुच्चार भिन्न पण मूळ शब्द सप्तसिंधु हाच. त्याची अेक साक्ष अद्यापहि जी जशीच्या तशी अुरलेली आहे ती म्हणजे सिंधुकांठच्या आपल्या राष्ट्राच्या अेका प्रातास तरी आपलें स्वतःचें प्राचीनतम **सिंधुदेश** हेंच नांव अद्यापहि जसेंच्या तसेंच राहून गेलेलें आहे.

( ३ ) हिंदु, हिंदुस्थान हीं प्राकृत रूपें सप्तसिंधु, सिंधु, सिंधुस्थान ह्या संस्कृत नि स्वकीय अशा आपल्या प्राचीन अभिधांचींच प्राकृत रूपें होत ही गोष्ट आपल्या पुरातन पंडितवर्गालाहि ठाअूक होती. तीं नांवें कांहीं आजच बादरायणसंबंधानें जोडलेलीं नाहींत. ह्याविषयीं भविष्यपुराणांतील खालील अुल्लेख जितके कौतुकावह तितकेच अुद्बोधक आहेत. सप्तसिंधूचेंच प्राकृत रूप 'हप्तहिंदु' हें होय असें त्या पुराणांतील खालील श्लोकांत सांगितलें आहेः—

॥ जानुस्थाने जैनुशब्दः सप्तसिंधुस्तथैव च ॥ हप्तहिंदुर्यावनीति पुनर्ज्ञेया गुरुण्डिका ॥ १ ॥

पुढे शालिवाहन कुलांतील राजांच्या कथा सांगतांना तें पुराण म्हणतेंः—

॥ जित्वा शकान् दुराधर्षान् चीनतार्तरिदेशजान् ॥ बाल्हीकान् कामरूपांश्च

रोमजान् खुरजान् शठान् ॥ तेषां कोशान्गृहीत्वा च दंडयोग्यानकारयत् ॥ **स्थापिता तेन मर्यादा म्लेंच्छार्याणाम् पृथक्पृथक् ॥ सिंधुस्थानमिति प्राहूराष्ट्रमार्यस्य चोत्तमम् ॥ म्लेच्छस्थानं परम् सिंधोः कृतं तेन महात्मना ॥** ( भविष्यपुराण प्रतिसर्गपर्व, अ. २ )

( भावार्थ : बाल्हीक, चीन, तार्तारादिक म्लेंच्छ शत्रूंचें पारिपत्य केल्यानंतर त्या भूपतीनें आपल्या अुत्तम अशा आर्य राष्ट्राची सिंध ही सीमा ठरवली. सिंधूच्या अलीकडील तें आमचें सिंधुस्थान व सिंधूपलीकडील तें म्लेंछस्थान होय अशी मर्यादा स्थापली. ) अटक अुल्लंघूं नये असा नियम जो प्रचलित झाला तोहि याच काळापासून. ' नागन्तव्यं त्वया भूप पैशाचे देशधूर्तके ' या भविष्यपुराणांतील श्लोकांत ही सिंधु ओलांडण्याची बंदी सांगितली आहे.

तिकडे ती सिंधु आणि अिकडे हा सिंधु हे दोनहि अुल्लंघूं नयेत; ते अुल्लंघितांच परदेशगमनाचें निषिद्ध कृत्य घडतें. ही सिंधुबंदीची सहस्र–दीड सहस्र वर्षांची पुरातन शास्त्राज्ञाहि हेंच दर्शविते कीं, त्या प्राचीन काळापासूनच आपल्या ह्या ' सिंधुस्थानाची ' मर्यादा ' आसिंधुसिंधुपर्यंता ' हीच समजली जात होती.

( ४ ) **सप्तसिंध, सिंधुदेश, सिंधुस्थान प्रभृति शब्दांचें ' हिंदु ' हें प्राकृत रूपहि आपल्याच प्राकृतीकरणाच्या नियमानुरूप आपल्या प्राकृतांत रूढावलें**—संस्कृत शब्दांतील ' स 'चा आपल्या प्राकृतांत विकल्प ' ह ' होतो. मारवाडीप्रभृति बोलींत ह्याचीं भरपूर अुदाहरणें आहेत. जसें केसरी=केहरी; सप्ताह=हप्ता; सत्तर=हत्तर; दश=दहा. अस्मि, असि, स्मः प्रभृतींचीं प्राकृत रूपें हीं याचींच प्रत्यंतरें होत. आपल्या प्राकृताप्रमाणेच पुरातन पारसी हीहि संस्कृताचीच अेक प्राकृत भाषा असल्यामुळें अनेक रूपें आपल्याप्रमाणेच तींतहि साधलेलीं सांपडतात. अेवढ्याचसाठीं तीं रूपें तिकडूनच आलीं असें होत नाहीं किंवा तेवढ्याचमुळें परकीय ठरत नाहींत. हिंदीमधील आज जीं अगदीं चंदभाटापूर्वीची जुन्यांतील जुनी कविता समजली जाते तींतसुद्धां हिंदुस्थान हा शब्द गौरवाने वापरलेला आहे.

॥ अटल थाट महिपाट अटल तारा गढ थानम् ॥ अटल नगर अजमेर अटल ' हिंदव-अस्थानम् ' ॥ १ ॥

'पृथ्वीराज रासा 'त पृथ्वीराजाचे समकालीन चंदभाट ह्यांच्या काव्यांत तर आपल्या राष्ट्राचें 'हिंदु' हें अभिधान अत्यंत अभिमानाने आपलें सारें राष्ट्र मस्तकीं मिरवूं लागलें असल्याचें दृश्य पानोपान आढळतें! हिंदुत्वाच्या अभिमानाने रसरसलेलीं हीं चरणें पाहा: —

॥ धनि (धन्य) हिंदु पृथिराज! जिने रजवट्ट अुजारिय ॥ धनि हिंदु पृथिराज! बोल कलिमझ्झ अुगारिय ॥ १ ॥ धनि हिंदु पृथिराज! जेन सुविहानह संध्यो ॥ वारवारह ग्रहिमुक्की अंतकाल सरवंध्यो ॥ २ आज भाग चहुवान धर आज भाग हिंदवान ॥ अिन जीवित दिल्लीश्वर गंज न सक्कै आन ॥ ३ ॥

## 'हिन्दु' हा शब्द राष्ट्रीयच

यानंतरच्या काळाविषयीं तर बोलणेंच नको! आर्यावर्त, भारत प्रभृति यच्चयावत् अभिधानांहूनहि 'हिंदु' नि 'हिंदुस्थान' हेच शब्द आमच्या राष्ट्राचे नि राष्ट्रीय जीवनाचे मूर्धाभिषिक्त आदर्श, अभिमान नि अभिधान होऊन बसले. प्रासादापासून पर्णकुटीपर्यंत 'मी हिंदु' ही जाणीव रसरसूं लागली. मी आर्य, मी भारतीय हे न जाणणारे लाखों लोक सांपडले असते पण मी 'हिंदु', ही जाणीव झोपडीझोपडीपर्यंत कोट्यानुकोटि हिंदूंत मुरून गेली. श्रीगुरु गोविंदसिंगांनीं तिकडे पंजाबांत आपलें जीवनकार्य स्वतःच्याच शब्दांत जें सांगितलें तें हेंच की, '॥ सकल जगतमे खालसा पंथ गाजे ॥ जगें धर्म 'हिंदु' सकल भड भाजे ॥' इकडे महाराष्ट्रीय समर्थांची तळमळ होती तीहि हीच की 'या भूमंडळाचे ठायी। 'हिंदु' ऐसा उरला नाहीं ॥' तेजबहादुरासारख्या सहस्रावधि हुतात्म्यांनीं 'हिंदु' शब्द सोड; नाहीं तर प्राण तरी सोड! अशी शत्रूची धमकी ऐकतांच प्राण सोडले, पण हा हिंदु शब्द सोडला नाहीं! लाखों वीरपुरुष अटक ते रामेश्वरापर्यंत या 'हिंदुत्वा'चे मानास्तव पिढ्यानुपिढ्या समरोसमरीं झुंजले, झगडले, रणीं राहिले. पण शेवटीं अहिंदूची पादशाही न् पादशाही पायाखालीं तुडवून जेव्हां ते हिंदुपदपादशाही स्थापिते झाले तेव्हां साऱ्या राष्ट्रभर विजयदुंदुभींनीं जी द्वाही फिरविली तीहि हीच कीं, 'बुडाला औरंग्या पापी, 'हिंदुस्थान' बळावलें ॥ अभक्तांचा क्षयो झाला आनंदवनभूवनीं ॥'

(५) वर रेखाटलेल्या हिन्दु शब्दाच्या अितिहासावरून हें

**स्पष्ट होतें कीं, हिंदु शब्द हा मूलतः नि मुख्यतः दैशिक नि राष्ट्रीय आहे. कोणत्याहि विशिष्ट धर्ममताचाच काय तो निर्देशक नव्हे:**—मूळ सप्तसिंधु हा वेदकालीन शब्दच त्या देशाचा नि त्यांत निवसणाऱ्या राष्ट्राचाच मुख्यतः द्योतक होता. सिंधु देश हें आपलें त्या बाजूच्या अेका प्रांताचें नांवहि मुख्यतः दैशिक नि राष्ट्रीयच आहे. परकीयांनी आपलें तेंच नांव त्याच अर्थी आपणांस लावलें.

## हिंदुत्व म्हणजे अेक धर्ममत नव्हे

वेद ह्या धर्म–ग्रंथापासून त्याचे अनुयायांचें नांव वैदिक हें जसें पडलें; बुद्ध ह्या नांवावरून त्या धार्मिक अनुयायांचें नांव जसें बौद्ध; जिनमताच्या अनुयायांचें जैन; नानकाच्या धर्मशिष्यांचें नांव जसें शिखः विष्णु देवतेचे अुपासक वैष्णव; लिंगपूजक ते जसे लिंगायत; तसें हिंदु हें नांव कोणत्याहि धर्मग्रंथावरून, धर्मसंस्थापकावरून वा धर्ममतावरून मुख्यतः वा मूलतः निघालेलें नसून आसिंधुसिंधु विस्तारलेल्या देशास नि त्यांत निवसणाऱ्या राष्ट्रासच मुख्यतः निर्देशणारें आहे. आणि **अनुषंगाने** त्याच्या धर्मसंस्कृतींनाहि.

यासाठींच हिंदु शब्दाची व्याख्या कोणत्याहि धर्मग्रंथाशीं वा धर्ममताशींच तेवढी बांधून टाकण्याचे यत्न दिशाभूल करणारे ठरतात. हिंदु शब्दाच्या व्याख्येचा मूल अैतिहासिक पाया आसिंधुसिंधु भारतभूमिका हीच असली पाहिजे. तो देश नि **त्यांत निपजलेल्या** धर्मांच्या नि संस्कृतींच्या बंधनांनी अनुप्राणित झालेलें राष्ट्र हेच हिंदुत्वाचे दोन प्रमुख घटक होत. म्हणूनच हिंदुत्वाची इतिहासाला शक्य तों धरून असलेली व्याख्या अशीच केली पाहिजे की,

**आसिंधुसिंधु भारतभूमिका ही ज्याची पितृभू नि पुण्यभू आहे तो हिंदु.**

यांतील पितृभू नि पुण्यभू ह्या शब्दांचा, कोणत्याहि व्याख्येंत योजलेल्या शब्दांना असतो तसा, थोडासा पारिभाषिक अर्थ आहे.

**'पितृभू'** म्हणजे जींत आपले आअीबाप तेवढेच निपजले ती, असा अर्थ नव्हे; तर प्राचीन कालापासून ज्या भूमींत परंपरेने आपले जातीय नि राष्ट्रीय पूर्वज निवसत आले ती, असा अर्थ आहे. कांहीं जण फटकन

शका घेतात कीं, आम्ही दोन पिढ्या आफ्रिकेंत आहोंत, मग आम्ही हिंदु नाहीं कीं काय ? ती शंका यामुळेंच अगदीं अुथळ ठरते. आमच्या हिंदूंनी साऱ्या पृथ्वीवर जरी अुद्यां वसाहती स्थापल्या तरी त्यांच्या प्राचीन, परंपरागत, जातीय नि राष्ट्रीय पूर्वजांची पितृभू अशी ही भारतभूमीच असणार !

'**पुण्यभू**'चा अर्थ अिंग्लिश 'Holy land' ह्या शब्दांतील अर्थ होय. ज्या भूमींत अेखाद्या धर्माचा संस्थापक ॠषि अवतार वा प्रेषित (पैगंबर) प्रकटला, त्या धर्मास अुपदेशिता झाला, त्याच्या निवासानें त्या भूमीस धर्मक्षेत्राचें पुण्यत्व आलें, ती त्या धर्माची पुण्यभू. जशी ज्यूंची वा खिश्चनांची पालेस्टाअिन, मुसलमानांची अेरेबिया. अशा अर्थींच हा पुण्यभू शब्द वापरलेला आहे, नुसत्या पवित्रभूमि या अर्थी नव्हे.

पितृभू नि पुण्यभू शब्दांच्या ह्या पारिभाषिक अर्थी, ही आसिंधुसिंधु भारतभूमिका ज्याची ज्याची पितृभूमि आणि पुण्यभूमि आहे तो तो हिंदु !

हिंदुत्वाची ही व्याख्या जितकी ऐतिहासिक तितकीच आजच्या वस्तुस्थितीला अगदीं धरून आहे. ती जितकी सत्य तितकीच इष्ट आहे; जितकी व्यापक तितकीच व्यावर्तकहि आहे.

## अपसमजाचें मूळ

हिंदुत्वाची ही व्याख्या जर अगदीं आरंभींच सांपडली असती तर शीख, जैन, फार काय आर्यसमाजीसुद्धां, जे स्वतःला हिंदु म्हणवून घेण्यास मधून-मधून बिचकत आले ते कधींहि मुळांतच बिचकते ना. अिंग्लिशांच्या राजवटी-पूर्वी आपल्या साऱ्या पंथोपपंथांना व धर्मसंघाला हिंदुत्वाच्या कक्षेंतच अेकवटावें लागलें होतें–आणि बहुधा तेंच अभिधान आपलें अत्यंत गौरवास्पद कुलभूषण म्हणून आपलें सारें राष्ट्र मिरवीत आलें. किरकोळ अपवाद सोडले असतां मुसलमानांच्या परधर्मद्वेषानें, **त्यांना** नकळत, आपलें सारें हिंदु राष्ट्र अेकजीव करण्यांत, हिंदुत्वाची जाणीव यच्चयावत् हिंदूंत रसरसवून त्यांना अेकवटण्यांत फारच मोठें साह्य केलेलें आहे. हिंदुस्थानांतील कोटि कोटि लोकांचे त्या मुसलमान राजवटीनें स्वतःच्याच सोयीसाठीं धर्मवेडाच्या निशेंत दोनच तुकडे काय ते पाडले, हिंदु आणि मुसलमान. जो जो मुसलमान नाहीं तो तो हिंदु ! ही त्यांची आडदांड व्याख्या !–पण योगायोगानें तीच अचूक ठरत गेली,

**आम्हांस** हितकारक झाली. कारण त्या योगें (अपवाद वजा जातां) जो जो मुसलमान नव्हता तो तो हिंदुत्वाच्या ध्वजाखालीं येऊन अेकवटला. परंतु इंग्रजी राजवटीपासून ह्या बहुसंख्यत्वानें डोईजड झालेल्या हिंदुराष्ट्राच्या अेकवटलेल्या गटांतच फाटाफूट ज्यायोगें होअील असे बुद्धिपुरस्सर यत्न विपक्षाकडून होअूं लागले. आणि तेव्हांपासून हिंदु कोण ही व्याख्या करण्याचेहि यत्न बुद्धिपुरस्सर आमच्याहि लोकनायकांना करावे लागले. त्या वेळीं दुर्दैवानें आरंभापासून अेक मोठी दिशाभूल झाली ती ही कीं, हिंदु शब्दाचा संबंध हिंदुधर्माशींच काय तो जोडला जाऊन **हिंदुत्वाची व्याख्या न करतां हिंदुधर्माची व्याख्या आम्ही करूं लागलों.** हिंदुत्वाची सर्वांगीण व्याख्या राष्ट्रीय नि सांस्कृतिक न करतां, त्याच्या त्या मुख्य अंगाकडे दुर्लक्ष होऊन, त्याची धार्मिक व्याख्याच जो तो करूं लागला. आणि हिंदुसमाजांतील बहुसंख्य लोक अद्यापदेखील वेदानुयायीच असल्यामुळें ती व्याख्या सहाजिकपणेंच, वेदानुयायी तो हिंदु अशी करण्यांत आली; इतकेंच नव्हे तर, बहुजन समाजांत मूर्तिपूजा, शेंडी राखणें, गोपूजन प्रभृति, हिंदूंचे जे अनेक आचार आहेत त्यांतून ज्याला जें पटेल तेंच हिंदु धर्माचें वैशिष्ट्य असें समजून, तें मानील तो हिंदु अशा अनेकांच्या अनेक व्याख्या पुढें आल्या. पण तो धर्मग्रंथ, धर्मपंथ, धर्ममत न मानणारे पण हिंदु राष्ट्राचे पूर्वापार अंगभूत असणारे अेकेक भाग त्या व्याख्येमुळेंच हिंदुत्वाबाहेर पडूं लागले! हिंदुत्व हें मुळांत हिंदूंमध्यें प्रचलित असलेल्या कोणत्याहि धर्ममताहून व्यापकतर असल्यामुळें त्याला बहुसंख्यांकाच्या धर्ममताशीं समानार्थक समजतांच अल्पसंख्यांकांना तो हिंदु शब्द अप्रिय आणि अनिष्टहि वाटूं लागला.

## विपक्षाचा डाव कसा सफल झाला ?

'हिंदु' शब्दाची व्याख्या कोणी 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त सनातन धर्म' मानणारा तो 'हिंदु' अशी केली कीं, स्मृतिपुराणादिकांना सर्वस्वीं न मानणारे किंवा मुळीच न मानणारे आर्यसमाजीयप्रभृति निव्वळ वैदिक, त्या 'हिंदु' शब्दास त्यागूं पाहत. बरें, हिंदु म्हणजे जो वेदान्तच तेवढे प्रमाण मानतो तो, अशी व्याख्या केली तर आर्यसमाजीय प्रभृति वैदिक तितका त्यायोगे हिंदु ठरे, पण म्हणूनच जैन, शीख, बौद्ध प्रभृति वेदप्रामाण्य न मानणारे पण हिंदु राष्ट्राचे रक्तबीजाचे सख्खे भाऊ भाऊ 'तर मग आम्ही मुळी हिंदु नाहींच'

म्हणून निषेधून उठत! शीख, जैन, बौद्ध, आर्यसमाज, ब्राह्मोसमाज, देवसमाज प्रभृति अनेकानेक धर्म वा पंथ मधूनमधून हिंदु शब्दास जे नाकारून उठले त्याचें मुख्य कारण हेंच होतें कीं, हिंदुत्वाची व्याख्या धार्मिक दृष्टिकोनांतूनच काय ती घडविण्याची दिशाभूल झाली. हिंदुत्व आणि हिंदुधर्म हे दोन्ही शब्द अेकच असें समजलें गेलें. या फाटाफुटीच्या मुख्य कारणांत विपक्षीयांच्या राजकीय कारस्थानांचीहि भर पडली. परिणाम असा होत चालला कीं, हिंदु शब्दाची बुद्धिपुरस्सर व्याख्या जोंवर घडविण्याचा यत्न होत नव्हता, तोंवर जे केवळ परंपरागत भावनेनेंच हिंदुराष्ट्रांत प्राचीन कालापासून सर्वस्वीं सामावलेले होते ते हिंदुत्वाची धर्मनिष्ठ व्याख्या करूं जातांच अेकेक बुद्धिपुरस्सर रागाने फुटूं लागले—त्यांना फोडण्याचा विपक्षाचा डाव सफळ लागला.

बहुसंख्यांक अशा वैदिक धर्मासच हिंदुधर्म समजणाऱ्यांनी हिंदु शब्दाची व्याख्या कोणत्याहि कुटिल हेतूनें केली नव्हती. संघांतील बहुसंख्यांकांच्या लक्षणासच त्या संघाचें लक्षण स्वाभाविकपणेंच बहुधा सर्वत्र समजलें जातें. इतकेंच नव्हे तर हिंदु राष्ट्रांतून अेकहि हिंदु फुटूं नये, उलट तें राष्ट्र अधिक अधिक संघटित व्हावें असाच त्या पूर्वाचार्यांचा, हिंदु शब्दाच्या धर्मनिष्ठ व्याख्या करण्यांत सद्हेतु होता. पण **दिशाभूल न कळत झाली. इच्छेविरुद्ध दुष्परिणाम झाला.**

परंतु हिंदुत्वाच्या लेखाच्या या मथळ्यावर दिलेल्या व्याख्येमुळें आतां त्या गैरसमजाचे मुळावरच कुऱ्हाड घातल्यासारखी होते. व्याख्या म्हटली कीं अखंडांत खंड पाडणें. अगदीं भौगोलिक प्रदेशाच्या सीमादेखील अुभयपक्षीं सामान्यच राहतात. मुसलमानी धर्मांतही असे अनेक पंथ आहेत कीं जे मुस्लिम की गैरमुस्लीम हा वाद व्याख्येनें मिटत नाहीं. अुदाहरणार्थ सध्याच पंजाबमध्यें फणफणलेला कादियानी पंथाचा वाद पाहा! मुस्लीमपणाच्या व्याख्येंत ते सामावत नाहींत म्हणून अेक पक्ष म्हणतो, सामावतात म्हणून दुसरा म्हणतो. मारहाण होण्यापर्यंत पाळी आली आहे. खिस्त्यांतहि तीच स्थिति; मार्मोन पंथियांचे अुदाहरण पाहा. त्याप्रमाणें प्रत्येक व्याख्येचा सीमान्त हा विवादास्पद असतो तसा ह्या व्याख्येचाही असला तथापि **अधिकांत अधिक सत्य, हित नि सुलभ अशी आज तरी हिंदुत्वाची तीच अेक व्याख्या उपलब्ध आहे.** तिच्यायोगें धर्मविषयक प्रश्नांच्या दुर्लंघ्य

दलदलीला साफ बगल देऊन हिंदुमात्र तितुका एकाच हिंदुध्वजाखालीं एकवटण्याचा राजमार्ग मोकळा करून दिला गेला.

## हिंदु कोण नि अहिंदु कोण ?

श्रुतिस्मृतिपुराणोक्त प्रमाण मानतात ते 'सनातनी'. केवळ श्रुति प्रमाण मानतात ते 'वैदिक'. स्वतःच्या धर्मास वैदिक धर्माची शाखा वा विकासहि न मानतां अगदीं स्वतंत्र धर्म मानणारे जैन, शीख, बौद्ध (**भारतीय बौद्ध**) प्रभृतींपैकीं कोणालाही त्याची धर्मनिष्ठा लवलेशहि न सोडतां हिंदुत्वाच्या व्याख्येप्रमाणें आपण हिंदु आहोंत हें सुखासमाधानानें मानतां येतें, किंबहुना नाकारतांच येत नाहीं. त्याचप्रमाणें मुसलमान, ख्रिस्ती ज्यू, प्रभृति जे अहिंदु आहेत ते तसे कां हेंहि निर्विवादपणें सांगतां येतें. कसें तें पाहाः—

**जैन हिंदु कां ?**—तर अगदीं वैदिक कालापासून त्यांच्या पितरांची परंपरागत पितृभू ही भारतभूमिका आहे आणि त्यांच्या तीर्थकरादिक धर्मगुरूंनीं त्यांचा धर्म ह्याच भारतभूमींत प्रकटविल्यामुळें ती त्यांची पुण्यभू-Holy Land-ही आहेच आहे. **ह्या अर्थी** नि **ह्या अर्थीच काय ते** आपण हिंदु आहोंत हें आमचे बहुसंख्य जैन बांधव समाधानपूर्वक मानतील. कारण तें ऐतिहासिक सत्य आहे, आणि त्यांच्यापैकीं ज्यांचा असा विश्वास आहे कीं त्यांचा धर्म हा वैदिक धर्माची शाखा नसून अगदीं स्वतंत्र वा अवैदिक आहे त्यांच्या त्या निष्ठेला ह्या व्याख्येमुळें मुळीच धक्का लागत नाहीं. हिंदु म्हणजेच वैदिक असा त्या शब्दाचा चुकीचा अर्थ सहजीं होत होता तेव्हां मात्र तशा स्वतंत्र धर्ममतवादी जैनांना त्या अर्थी स्वतःस हिंदु म्हणवणें हें विषम वाटणें अपरिहार्य होतें.

**शीख हिंदु कां ?**—कारण अगदीं वैदिक सप्तसिन्धूपैकींच सिंधु ते सरस्वतीपर्यंतच्या आर्यांच्या मूलस्थानांत त्यांचा परंपरागत निवास आजहि असल्यामुळें त्यांची पितृभूहि भारतभूमि आहे आणि त्यांच्या नानकादिक धर्मगुरूंनीं तो शीखधर्म प्रथम ह्याच भूमींत प्रगटल्यामुळें, त्यांच्या धर्माचें मूळच ह्या भूमींत धरलेलें असल्यामुळे, ही भारतभूमि त्यांची पुण्यभूमि आहे, Holy Land आहे ! म्हणून शीख हिंदु आहेतच आहेत; मग ते वेद मानोत वा न मानोत. मूर्तिपूजा करोत वा न करोत.

**आर्यसमाजीय हिंदु कां ?**—ते तर कोणासहि ह्या पितृभूमीच्या, अभिमानांत ममत्वांत हार जाणारे नाहींत आणि ह्या भारतभूमीला पुण्यभूमित्वाचा

मान सर्वांआधीं देतात. ते हिंदु आहेतच आहेत; मग ते पुराणें नि स्मृत्या मानोत वा न मानोत !

तीच गोष्ट **लिंगायत, राधास्वामीय** प्रभृति आमच्या यच्चयावत् धर्मांची वा धर्मपंथांची होय. फार काय **भिल्ल, संताळ, कोलेरियन** प्रभृतींपैकी जे कोणी भूत, प्रेत वा पदार्थपूजक (Animists) असतील त्यांचीदेखील परंपरागत पितृभू भारतच; आणि त्यांचे पूजापंथहि मुळापासून माहिती मिळते त्या अवधींत तरी याच भारत-भूमीस पुण्यभूहि मानीत आलेले; यास्तव तेहि हिंदुच होत. अशा प्रकारें हिंदु तितका या व्याख्येंत सहजीं सामावला जातो.

**पण मुसलमान-ख्रिस्ती-ज्यू हे हिंदु कां नाहींत ?**—तर यद्यपि त्यांपैकी कित्येक बाटलेल्यांची परंपरागत पितृभूमि ही भारतभूमिच असली तथापि त्यांचे धर्म अरबस्थान, पालेस्टाअिन प्रभृति भारतबाह्य देशांत अुपजल्यामुळें, ते त्या भारतबाह्य देशांनाच आपली Holy Land पुण्यभू मानणार. ही भूमि त्यांची पुण्यभू नाहीं म्हणून ते हिंदु नाहींत.

**तसेंच चिनी-जपानी-सयामी प्रभृतिहि पूर्णपणें हिंदु कां नाहींत ?**—तर ते धर्मानें जरी हिंदु (बौद्ध) असले, म्हणजे भारतभूमि ही जरी त्यांची पुण्यभू असली तरी भारतभूमि ही त्यांची पितृभू नाहीं. त्यांचें आमचें धर्माचें नातें. **पण राष्ट्रभाषा, वंश, अितिहास प्रभृति सर्वथा भिन्न; त्यांचें आमचें राष्ट्राचें नातें मुळापासूनच नाहीं म्हणूनच तें हिंदुधर्मांचे अंतर्गत असले तरी संपूर्ण हिंदुत्वाचे अधिकारी होऊं शकत नाहींत.** वस्तुस्थितिहि अगदीं तशीच आहे. जपानी, चिनी हे स्वतःस हिंदुधर्मांचे अनुयायी बौद्ध या नात्यानें म्हणवतील. पण हिंदुराष्ट्राचे अंगभूत राहाणार नाहींत, अंकित तर म्हणवणार नाहींतच नाहींत. **हिंदुधर्मपरिषदेंत** ते समानतेनें सामावले जाअूं शकतील—पण **हिंदुमहासभेंत**, म्हणजेच आमच्या **हिंदुराष्ट्रसभेंत** ते सामावूं शकणार नाहींत. त्यांच्या राष्ट्रसभेंत आम्ही सामावूं शकणार नाही. पण वैदिक, शीख, भारतीय बौद्ध, जैन, सनातनी प्रभृति आम्ही हिंदुत्वाचे पूर्णपणें अधिकारी असलेले आम्ही अेकराष्ट्रीयहि आहोंतच आहोंत, कारण भारतभूमि आमची नुसती पुण्यभूच नसून पितृभूहि आहे.

**शुद्धीकृतांचा प्रश्नहि** ह्या व्याख्येनें तसाच सोडवला जातो; जे पूर्वी हिंदुच होते ते शुद्ध होतांच पूर्णपणें हिंदुत्वाचे अधिकारी होतात. कारण त्यांची पितृभू नि पुण्यभू भारतभूमिच होते. परंतु जे अमेरिकन, इंग्लिश प्रभृति परराष्ट्रीय, ज्यांची पितृभू भारतभूमि नाही, ते हिंदुधर्म स्वीकारतांच **धर्मानें हिंदु होतील, पण राष्ट्रीय दृष्ट्या निराळेच राहाणारे असल्यामुळें संपूर्ण हिंदुत्वाचे अधिकारी होणार नाहींत,** कारण त्यांची पुण्यभू भारतभूमि झाली तरी पितृभू दुसरी असणार. **त्यांच्यांतील जे कोणी शरीरसंबंधानें आमच्याशीं विवाहबद्ध होतील–म्हणजेच वंश, जाति, राष्ट्र ह्या दृष्टीनें आमच्यांत रक्तबीजांनीं अेकवटून जातील किंवा हिंदुस्थानचें नागरिकत्व संपादून त्याला पितृभू मानतील ते मात्र पूर्णपणें हिंदुत्वाचे अधिकारी होतील. साऱ्या जगभर** हिंदुधर्माचा प्रचार करण्यास ही व्याख्या कोणतीहि आडकाठी घालीत नाहीं.

## अुपसंहार

अेका लेखाच्या मर्यादेंत शक्य तितक्या विस्ताराने हिंदु शब्दाची फोड करून त्याच्या प्रस्तुतच्या व्याख्येने हिंदु कोण नि अहिंदु कोण हा प्रश्न बहुतांशीं निर्विवादपणें कसा सोडवितां येतो हें दाखविलें. अर्थातच आतां तो हिंदु शब्द त्या सुनिश्चितार्थींच आपण वापरण्याची अतोनात काळजी घेतली पाहिजे. त्याचा प्रयोग योग्य अर्थी कसा नि कां करावा हें वर विशदिल्यामुळें त्याचे अपप्रयोग कसें टाळावें तेंहि अनायसेंच त्यांत दिग्दर्शिलें जात आहे. परंतु तथापिहि त्याचा एक **अत्यंत आत्मघातक अपप्रयोग** जो आपणास अगदीं कसोशीनें टाळला पाहिजे तो तेवढा स्वतंत्रपणें उल्लेखिणें भाग आहे. ज्यांना हिंदुसंघटनेची अत्यंत तळमळ आहे अशा पुढाऱ्यांचे तोंडीं, वृत्तपत्रांतून, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष हिंदुमहासभेंतील वाक्पीठावरूनहि ' हिंदु आणि जन, ' ' हिंदु आणि शीख, ' ' हिंदूंची अस्पृश्यांना सहानुभूति ' असे शब्दप्रयोग केवळ पूर्वापार संवयीमुळें झटकन् योजलेले आढळतात. वाक्यें अशीं असावयास पाहिजेत कीं ' स्पृश्यांनीं अस्पृश्यांना देवळें उघडावीं '. हिंदूंनीं अस्पृश्यांना उघडावीं हा अपप्रयोग होय; कारण दोघेही हिंदूच ! ' शिखांना शीखेतर हिंदूंची सहानुभूति आहे; पंजाबांत वैदिक नि शीख ह्यांनी अेकजुटीनें मुसलमानी आक्रमणास प्रतिकारावें ' अशीं वाक्यें पाहिजेत. शीखांना

हिंदूंची सहानुभूति आहे; शीखांनी आणि हिंदूंनी मुसलमानांस प्रतिकारावें; **हे घातक अपप्रयोग होत. कारण त्यांत जें सिद्ध करावयाचें तेंच असिद्ध होतें**; शीख नि हिंदु हे पृथक् होत, शीख हिंदु नाहींत, हें नको तेंच सूचित होतें. फार काय, वृत्तपत्रांतून अशीं वाक्यें देखील येतात कीं, 'जैनांना आम्हा हिंदूंची अशी विनंती आहे कीं, त्यांनी आपण हिंदु नाहीं असा दुराग्रह धरूं नये!' ह्या वाक्याहून वदतोव्याघाताचें उदाहरण तें दुसरें काय द्यावें! जुन्या सवयीनें गंजलेल्या लेखण्या आतां आम्ही फेकून दिल्या पाहिजेत. हिंदु हा शब्द वैदिक वा सनातनी अशा कोणत्याहि पाक्षिक अर्थी न वापरतां तो त्याच्या स्वतंत्र, व्यापक नि निश्चितार्थींच वापरावा. कालच्याच दैनिकांत पाहा: 'हिंदु व शीख हे दोनहि समाज जिन्हांशीं चर्चा करीत आहेत,' अशीं वाक्यें किती घातक आहेत बरें? पण तीं प्रत्यहीं वापरण्यांत येतात! धार्मिक दृष्टीच्या पोटभेदांस व्यक्तवणें तर जैन, शीख, वैदिक, आर्य, सनातनी हे तदर्थक विशिष्ट शब्द योजावेत. हिंदु नि आर्यसमाजी असें न म्हणतां सनातनी नि आर्यसमाजी म्हणावें.

## हिंदुत्वाची व्याख्या सरकारांतहि नोंदवून घ्यावी

त्याचप्रमाणे आपल्या लहरीसरशी शिरगणपतीमध्यें वाटेल त्यास 'हिंदु विभागांतून' फोडून वाटेल त्यास निराळें नोंदण्याचा सरकारी प्रघात, हिंदुत्वाची आपली कोणतीहि निश्चित व्याख्या नव्हती म्हणून जो अितका बळावला त्याला आळा घालण्यासाठीं ही सत्य, सोपी आणि आतां पुष्कळ संस्थांनीं मानलेली हिंदुत्वाची व्याख्याच आम्ही अेकमुखानें पुढें करावी आणि येत्या शिरगणतीचे आधीं ती नोंदवून घ्यावी, म्हणजे तुमची व्याख्याच नाहीं हें निमित्त तरी कोणास सांगता येणार नाहीं.

प्रत्येक हिंदूला हें तोंडपाठ झालें पाहिजे कीं, आसिंधुसिंधु भारतभूमिका ही ज्याची ज्याची पितृभू नि पुण्यभू आहे तो तो हिंदु!! संध्येसारखा हा मंत्र आमच्या मुलांकडून प्रातःस्मरणांत जपवला पाहिजे कीं:

॥ आसिंधु–सिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका ॥
॥ पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ॥१॥

—'सह्याद्रि', मे सन १९३६

# आमची राष्ट्रभाषा–संस्कृतनिष्ठ हिंदी.

## हिंदुस्थानी नव्हे! अुर्दू तर नव्हेच नव्हे!!

ऐक्यलंपट लोकांनीं कितीहि माघार घेतली तरी मुसलमानांचें समाधान होणें शक्य नाहीं. तेव्हां राष्ट्रीय भाषेचा नि राष्ट्रीय लिपीचा प्रश्न सोडविण्याचा अिष्टतम नि अेकच मार्ग म्हणजे हा कीं प्रत्येक हिंदूनें अशी अुघड अुघड नि बेधडक प्रतिज्ञा करावी:

**“आम्हां हिंदूंची राष्ट्रभाषा संस्कृतनिष्ठ हिंदी हीच! आणि संस्कृतनिष्ठ अशी ती नागरी लिपी हीच आम्हां हिंदूंची राष्ट्रलिपी!!”**

हिंदुस्थानची राष्ट्रभाषा हिंदी हीच करावयाची अशी चळवळ जेव्हांपासून निघाली आणि ती साऱ्या हिंदुस्थानांतील हिंदूंत जों जों फैलावत चालली, तेव्हांपासून नि तों तों भारतीय मुसलमानांनी तिला हाणून पाडण्याचा बळकट प्रयत्न चालविलेला आहे. त्यांचें अुद्दिष्ट अेकच कीं, सात कोटी मुसलमानांच्या लहरीसाठीं तेविस कोटी हिंदुंनीहि अुर्दू हीच राष्ट्रभाषा करावी. अुर्दू हिंदीहून वस्तुतःच श्रेष्ठ आहे म्हणून नव्हे–तें नांव काढणेंच कठिण! अुर्दू आपलें दारिद्र्य ज्या आरबीच्या जिवावर निवारूं अिच्छिते ती आरबी, हिंदीला असीम शब्दसंपत्तीचा पुरवठा करण्यास सज्ज असलेल्या संस्कृत भाषेपेक्षां किंवा संस्कृत भाषेअितकी संपन्न आहे म्हणून नव्हे — राणीची नि भिकारणीची श्रीमंती मुळांतच तोलनीय नाहीं; अितर कोणतेहि विशेष गुण हिंदीपेक्षां अुर्दूत अधिक आहेत म्हणूनहि नव्हे; तर अुर्दू ही मुसलमानी अल्पसंख्याकांची आवडती भाषा आहे म्हणूनच काय ती, या अेकाच कारणासाठीं, बावीस कोटी हिंदूच्या बहुसंख्य राष्ट्रानेंहि अुर्दूहून श्रेष्ठ असली तरी आपली हिंदी भाषा सोडून, ह्या अुर्दूलाच स्वतःचीही राष्ट्रभाषा मानावी हा मुसलमानांचा हट्ट! आणि तो न पुरवला तर? ‘अुर्दूला तुम्ही

राष्ट्रभाषा न मानाल तर? आम्ही हिंदीला वा अितर कोणत्याहि भाषेला राष्ट्रभाषा होअूं देणार नाहीं! आमच्या घरींदारीं कित्येक प्रांतांत ती हिंदी जरी आज मातृभाषाच असली तरीसुद्धा विसरून, बदलून, अुर्दूच चालू करू, नागरी लिपीला हात लावणें पाप मानूं, अितकेंच काय राष्ट्रभाषा म्हणून जी भाषा करणें असेल तिला नांवापुरतेसुद्धां 'हिंदी' हें नांव ठेवूं देणार नाहीं. अुर्दू हेंच नांव राष्ट्रभाषेचें असलें पाहिजे' ही मुसलमानांची या प्रकरणीं अेकमुखी मागणी प्रथमपासून चालू आहे!

## जींत ना तड ना जोड अशी 'तडजोड'

आमच्या हिंदु लोकांत अेक वर्ग असा आहे कीं, कोणतीहि 'राष्ट्रीय' चळवळ म्हटली कीं जोंवर तींत कोणीतरी मुसलमान कसाबसा तरी धरून आणून बसविला नाहीं तोंवर ती 'राष्ट्रीय' होअूंच शकत नाहीं, अशी त्यांची अेक विक्षिप्त समजूत झालेली असते. या वर्गांपैकीं अनेक जणांना जेव्हां हें आढळून आलें कीं, हिंदीला राष्ट्रभाषा नि नागरीला राष्ट्रलिपी करण्याच्या कार्यीं मुसलमानांचा वर वर्णिलेला कट्टर विरोध आहे, तेव्हां त्यांना अगदीं चैन पडेनासें झालें. हिंदीला राष्ट्रभाषा करण्याच्या कार्यीं ज्या वर्गांपैकी कित्येकांनीं फार परिश्रम घेतलेले आहेत, त्या वर्गाचे पुढारी महात्मा गांधीजी आहेत हें न सांगताहि समजण्यासारखें आहे. हिंदी नि नागरी यांचा प्रसार करण्यांत ज्या कांही राष्ट्रभक्त महोदयांनीं मनःपूर्वक यत्न चालविले त्यांत गांधीजींचाहि परिश्रम नांवाजण्यासारखाच आहे. परंतु 'राष्ट्रीय'-पणासंबंधीं त्यांची वरील विक्षिप्त समजूत असल्यामुळें आणि जें राष्ट्राच्या हिताचें, तें 'राष्ट्रीय' अशी राष्ट्रीयपणाची व्याख्या त्यांच्या गांवींहि नसल्यामुळें, अल्पसंख्य मुसलमान जो जो आततायी हट्ट धरतील तो सुद्धां पुरवून त्यांची हांजी-हांजी कल्याखांचून त्यांना राहवतच नाहीं. त्यांनी या हिंदीच्या प्रश्नाविषयींहि मुसलमानांना आंजरण्याचा नि गोंजारण्याचा, मुसलमानांचा धर्मवेडा हट्टहि पुरविण्याचा सपाटा चालवला आणि अेक तडजोड आपण होअूनच सुचविली.

## अैक्यलंपट वर्ग

वास्तविक पाहतां ज्या दोन पक्षांना कांहीअेक कार्य तर संमत असतें, पण अुपांगांविषयीं मतभेद होतो त्यामध्येंच तडजोडीचा प्रश्न येतो. कांहीं आम्ही सोडतों, कांही तुम्हीं सोडा; कांहीं जोडून कांहीं तोडून जी देवाण-घेवाण

होते तिला तडजोड म्हणतात. पण राष्ट्रभाषाप्रकरणीं मुसलमानांना तडजोड अशी नकोच आहे. अशा स्थितींत त्यांच्या मताप्रमाणें अुर्दूलाच राष्ट्रभाषा नि राष्ट्रलिपी मानणें ही अेकच तडजोड शक्य ! पण ही धडधडीत वस्तुस्थिति डोळ्याआड करून जी हिंदूंनांच काय ती अनिष्ट अशी अेक तडजोड गांधीजीप्रभृतींनी हिंदी साहित्यसंमेलनांत सुचविली. आणि ती मुसलमानांनीं फेटाळली तरीहि जणूं ती अुभयपक्षीं मान्यच झाली असा बहाणा करून तिच्या अनुरोधें हिंदीची मोडतोड करण्याचें कार्य ह्या अैक्यलंपट वर्गानें धुमधडाक्यानें चालू केलें आहे. त्यामुळें हिंदीच्या अभिमान्यांत अेकच धुसफूस माजावी हें साहजिकच होते. राष्ट्रीय भाषेचा प्रश्न हा प्रत्येक प्रांतांतील जनतेचा जिव्हाळ्याचा प्रश्न; तिचे बरेवाअीट परिणाम प्रत्येक प्रांतीय भाषेला आणि संस्कृतीलाहि भोगावे लागणार यासाठीं महाराष्ट्र जनतेलाहि या हिंदीची मोडतोड करून हिंदूंच्या भाषेवर मुस्लीम संस्कृतीची कुरघोडी करूं पाहणाऱ्या अैक्यलंपट तडजोडीच्या वादाची कांहीं माहिती असणें अगदीं आवश्यक आहे.

## वरं बुवा, 'हिंदी' नको 'हिंदुस्थानी' म्हणा !

राष्ट्रभाषा अेक करण्यासाठीं मुसलमानांचे मन वळविण्यास्तव जी तडजोड गांधीजीप्रभृती अैक्यलोलुप मंडळींनी सुचविली आहे आणि मुसलमानांनीं ती झिडकारली असतांहि जणुं काय ती त्यांनीं संमतिलीच आहे, अशा भोळ्या भावनेनें जिच्याअनुरोधें हिंदीची मोडतोड चालविली आहे ती तडजोड अशीः—ज्या अर्थीं कांहीं केल्या मुसलमान नागरी लिपी मानण्यास सिद्ध नाहींत,त्या अर्थीं अेक लिपीचा नाद सोडून द्यावा. हिंदी ही राष्ट्रभाषा हिंदूंनीं नागरींत लिहावी आणि मुसलमानांनी अलेफबेच्या अुर्दू लिपींत लिहावी. आणि दोन्ही लिप्यांना राष्ट्रीय लिपीची पदवी अर्पावी,सर्व राष्ट्रीय सरकारी लिखाण दोनहि लिपींत प्रकाशलें जावें दुसरी आंतबट्ट्याची गोष्ट म्हणजे हिंदी भाषेला संस्कृतोत्पन्नतेची नि संस्कृतनिष्ठतेची जी घाण मुसलमान लोकांना येते ती शक्य तों न्यूनवावी. यास्तव हिंदी भाषेंत संस्कृतोत्पन्न शब्दाप्रमाणेंच शतावधि अरबी, फारशी प्रभृति अुर्दू शब्दांचीहि भर घालावी. आणि तिसरी गोष्ट म्हणजे हिंदीचें नांवसुद्धा 'हिंदी' असें न ठेवतां 'हिंदी याने हिंदुस्थानी' असें ठेवावें !!

या तडजोडीवरून हें स्पष्टच दिसून येअील कीं, तींत जी काय माघार घेतली ती हिंदी भाषेचीच तोडमोड करणारी होय, हिंदूंनांच काय ती घेतलेली

आहे. तडजोड म्हटली की दोनहि पक्षांनीं देवाण–घेवाण करावयाची. पण त्याप्रमाणें मुसलमानांनीं कोणतीहि माघार घेतली नाहीं. मुसलमानांनीं हिंदीच्या या मोडतोडीच्या प्रतिमूल्यांत जो काय अुपकार आमच्यावर करावा अशी अपेक्षा हिंदूंनी धरावयाची ती अितकीच कीं, अितकी मोडतोड केल्यावर तरी मुस्लीमांनी त्या 'हिंदी याने हिंदुस्थानीला' राष्ट्रभाषा मानावी! पण ही अपेक्षा तरी मुसलमान पुरवूं अिच्छितो आहे काय? नाहीं! कदापि नाहीं! त्याची फोड अशी—

## नांवातहि अुर्दू शब्द !

हिंदीच्या नांवाची मुसलमानांना फारा दिवसाची भयंकर चीड. यासाठीं आमच्या भोळसर मंडळींनीं तिचें नांव बदलून तडजोडीचें नांव ठेवलें 'हिंदी याने हिंदुस्थानी.' ध्यानांत घ्या, हिंदी अर्थात् हिंदुस्थानी, हिंदी अथवा हिंदुस्थानी असें नांव नव्हे तर हिंदी याने हिंदुस्थानी!' हा 'याने' म्हणजे काय पदार्थ आहे याची महाराष्ट्रांतील वा मद्रासेंतील लक्षावधि हिंदूंना नि शतावधि मुसलमानांना वार्ताहि नाहीं. पण प्रत्येक शब्दसमुच्चयांत सर्वच शब्द संस्कृतोत्पन्न असतां कामा नये. नाहीं तर राष्ट्रभाषेची अराष्ट्रभाषा होअून पडायची! राष्ट्रभाषा म्हटली कीं प्रत्येक शब्दसमुच्चयांत अेक तरी अुर्दू विदेशी शब्द पाहिजे. यासाठीं तो 'याने' हा अुर्दू शब्द त्या नांवातच ठोकून टाकला. 'याने' या अुर्दू शब्दाचा अर्थ 'किंवा' 'अर्थात्.' ज्या लक्षावधि मुसलमानांची हिंदी हीच मातृभाषा मोंगल काळापासून चालत आली आहे ते हिंदीला अुर्दू लिपींत छापून 'हिंदुस्थानी' असें स्वतःच निवडलेलें नांव तिला लावीत आले आहेत. यासाठीं तिचें 'हिंदी याने हिंदुस्थानी' असें हिंदी–मुस्लीम नांव सिद्ध होतें अशी स्वतःचीच समजूत करून घेअून या अैक्यलंपट वर्गानें हिंदीचें नवें नांव ठेवलें आणि मनांत म्हणूं लागले, आतां राष्ट्रभाषेचा प्रश्न सुटला!

## देशाचेंहि नांव बदला !

पण तो प्रश्न नुसत्या नांवाचा हें त्यांच्या ध्यानांत येअीना ! हिंदुस्थान हें नांव अुर्दू लिपींत छापलेल्या हिंदीस मुसलमान स्वतः जरी आजवर लावत आले असले, तरी आतां पॅनअिस्लामिझमचें भूत अंगांत संचारल्यामुळें त्या मुसलमानांना पूर्वी त्यांनींच निवडलेलें 'हिंदुस्थानी' हें नांवसुद्धां असह्य होत

चाललेलें आहे हें आमचा हा ऐक्यलंपट वर्ग विसरला ! हिंदी या नांवाप्रमाणेंच 'हिंदुस्थानी' या नांवालाहि हिंदुत्वाची घाण येते ती येतेच असें आतां मुसलमानांचें म्हणणें आहे ! भाषेलाच काय पण ह्या देशालाहि मुस्लीम लोक आतां 'हिंदुस्थान' म्हणावयास कांकूं करूं लागले आहेत ! त्यांनीं तो वाद अघड अघड मांडला असून ते म्हणतात कीं, या देशाचें हिंदुस्थान हें नांवसुद्धां ऐक्याविघातक असल्यामुळें याला जें निर्भेळ मुस्लीम नांव 'पाकस्तान' तेंच दिलें पाहिजे ! अुर्दूत पाक म्हणजे मुस्लीम धर्मानुसार शुद्ध, नापाक म्हणजे मुस्लीम–धर्मनिषिद्ध जें 'अशुद्ध' तें. ज्या देशांत मुस्लीमांचें वर्चस्व तो पाक. यासाठीं या देशाचें हिंदुत्वाचें वर्चस्व दाखविणारें 'हिंदुस्थान' हें नांव पालटून त्याला मुस्लीम वर्चस्वाचें 'पाकस्तान' हें नांव द्यावें आपल्या महाराष्ट्रादिक अुर्दू साहित्यास सर्वस्वी अपरिचित असलेल्या प्रांतांतील लोकांना वाटेल कीं आम्ही वर दिलेली विचारसरणी विडंबनार्थक वा विपर्यस्त असावी. पण ती गोष्ट अक्षरशः खरी आहे. मुसलमानांतील आगाखान, अिक्बालसारख्या मोठमोठ्या लोकांपासून तों लाहोर–लखनौच्या पैसा–अखबारापर्यंत ( दिडकी-पत्रापर्यंत ) हिंदुस्थान शब्दावरील हे आक्षेप अुघडपणें नि कडव्या भाषेंतून चर्चिले जात असून पंजाब काश्मीर, सिंध, सरसीमा या प्रांतांचा हिंदुस्थानाचा तुकडाच्या तुकडा तोडून निदान त्याला तरी आजच्या आज 'पाकस्तान,' मुस्लीम वर्चस्वाच्या शुद्ध देश, हें नांव द्या अशी मागणी त्यांनीं सारखी चालविली आहे. अशा मनःप्रवृत्तींत असणाऱ्या मुसलमानांना हिंदी हें नांव जितकें नावडतें तितकेंच हिंदुस्थानी हें नांवहि नावडतेंच ! तेव्हां राष्ट्रभाषा अेक व्हावी या लालसेपायीं हिंदीचें नांव बदलून तिला 'हिंदी याने हिंदुस्थानी' असें धेडगुजरी नांव ठेवलें तरीसुद्धां प्रश्न कसा सुटणार ? मुसलमान म्हणतात हिंदुस्थानीसुद्धां नव्हे, 'पाकस्तानी' म्हणा !

## बाजार 'बोली' आणि राष्ट्र 'भाषा' !

यामुळेंच आमच्या अैक्यलंपट वर्गानें सुचविलेली तडजोडीची दुसरी सवलतहि मुसलमानांचें समाधान करूं शकणारी नाहीं आणि हिंदीचे तर स्वरूपच विकृत करून टाकणारी आहे. ती सवलत म्हणजे ही कीं, हिंदींत आरबी फार्सी प्रभृति अुर्दूमध्यें येणारे शतावधि विदेशी शब्द हेतुतः मिसळून द्यावे. लखनौच्या बाजारांत हिंदु–मुसलमान अेकत्र वावरतांना जी हिंदी, अुर्दू, आरबी, फार्सी,

तुर्की अिंग्रजी प्रभृति शब्दांची खिचडी करून अेकमेकांचें विचार अेकमेकांना कळवितात, ती बाजारबोलीच म्हणे राष्ट्रभाषा करावयाची !

कोणत्याहि देशाची राष्ट्रभाषा म्हणजे त्याचें सारें अुच्च साहित्य जींत व्यक्तविलें जातें ती. भारताची राष्ट्रीयभाषा म्हणजे भारताचे अत्युच्च विचार, तत्त्वज्ञान, काव्य, रसायन, वैद्यक, पदार्थविज्ञान, यांत्रशिल्प, भूगर्भ प्रभृति अनेकविध विज्ञानांचें आणि राजकीय, सामाजिक, धार्मिक जीवनाचें व्यक्तीकरण जींत होअू शकेल अशी संपन्न, प्रौढ नि प्रगत भाषा असली पाहिजे. आतां ह्या नानाविध विचारांना, भावांना नि भावनांना व्यक्तविण्याचें सामर्थ्य बाजारबोलींत का कधीं असू शकतें ? रसायन किंवा गणित किंवा वैद्यक किंवा ज्योतिष किंवा यांत्र प्रभृति विज्ञानांत लागणारे सहस्रावधि पारिभाषिक शब्द काय बाजारबोलींत सांपडूं शकतील ? जर तें सर्वस्वी अशक्य, तर ह्या राष्ट्रीय भाषेंत व्यक्त होणाऱ्या अत्युच्च अशा काव्य–तत्त्व–विज्ञानांना अवश्य असणाऱ्या सहस्रावधि पारिभाषिक नि प्रौढ, कोमल नि रुचिर, परंपरेचे नि गूढ संदर्भ सुचवणारे, अर्थवाहक नि ध्वनिमय शद्ब कोणत्या रत्नाकरांतून घ्यावयाचे ? आरबींतून ? ती स्वयमेव अत्यंत दरिद्री ! अितकी दरिद्री कीं सारें युरोपीय अर्वाचीन विज्ञान जेव्हां भाषांतरित करण्याचा चंग अतत्तुर्क कमालने बांधला, तेव्हां त्याला स्वतःलाच आरबी भाषा अितकी टाकाअू भासली कीं, तुर्कांना जर प्रगत साहित्य हवें तर ती परकी आरबी भाषा सोडून देण्यावांचून गत्यंतर नाहीं असें अुद्घोषून त्यानें तुर्कस्थानांतून तिची हकालपट्टी केली. तुर्क म्हणजे खिलाफतीचें केंद्र, आरबी ही खिलाफतीची धार्मिक भाषा. पण तुर्कांच्या स्वाभिमानाला नि प्रगतीला ती सारखीच विसंगत आहे असें पाहून तुर्कांनीं स्वतःच ज्या आरबीला निषिद्ध भाषा ठरविली, ती परकीय नि शब्ददरिद्री आरबी आमच्या हिंदुस्थानच्या स्वाभिमानाला नि प्रगतीला काय सुसंगत नि साहाय्यक समजावयाची आहे ? अर्थात, हे सहस्रावधि परिभाषिक नवेनवे शब्द आम्हाला शब्दरत्नांचा केवळ रत्नाकरच असलेली आणि हिंदीच्या प्रकृतीस सर्वथा अनुकूल, जी तिची केवळ मूळच आहे, त्या सुसंपन्न संस्कृत भाषेंतूनच घेतले पाहिजेत, साधले पाहिजेत. शब्द–प्रसवक्षमतेंत संस्कृतचा हात धरील अशी भाषा जगांत आजहि दुसरी आढळणार नाहीं ! त्या संस्कृतचा शद्बरत्नाकर नि साहित्य–क्षीरसागर दाराशीं असतां आम्ही कृपणतेची नरोटी हातीं घेअून

मरुभूमीच्या आरबी वाळवंटांत 'पाणी ! पाणी' करीत काय म्हणून भटकावें ?

## भाषेंतहि जातवारी !

मुसलमानांना संतोषावयासाठीं कांहीं शद्ब तरी आरबीमधून घ्यावे, अुरतील ते संस्कृतमधून घेअू, असें म्हणाल तर किती अरेबी शद्ब हिंदींत घुसडले म्हणजे तिला मुसलमान राष्ट्रभाषा मानण्यास सिद्ध होतील याचें अेखादें कोष्टक कोणत्याहि मुसलमानसंस्थेनें वा प्रमुख लोकांनीं तुम्हास दिलेलें आहे काय ? विधिमंडळांतून मुसलमानांना जसें जातीय विशिष्ट प्रतिनिधित्व दिलेंत, तसेंच भाषेंतहि जातवारीचें शद्बप्रतिनिधित्व मुस्लीमांना द्यावयाचें आहे कीं काय ? आणि तें शेंकडा किती दरानें ! पांच, पन्नास, पाचशें, अुर्दू आरबी शब्द हिंदींत घेअून नि तिचें नांव 'हिंदी याने हिंदुस्थानी' ठेवून भागत नाहीं ! कारण शंभरी शंभर शब्द आरबी फार्सी तुर्की प्रभृति विदेशी भाषांचे घ्याल म्हणजेच हिंदीची अुर्दू करून सोडाल, तरच मुसलमान संतोषणार आहेत ! ही त्यांची प्रतिज्ञा ते बेधडक बोलून दाखवीत असतां आपण ती अैकली न अैकलीशी केल्यानें फसण्याअितके मुसलमान दूधखुळे नाहींत. त्यांना तडजोड मुळीं नकोच ! अुर्दू हीच आपल्या स्वतःच्या बळानें आपण राष्ट्रभाषा करून सोडूं अशी आहे त्यांची बढाअीखोर धमक नि धमकावणी ! महाराष्ट्र वाचकांना त्याविषयीं अद्याप असावी तशी संकलित माहिती नि युक्तियुक्त जाणीव नसल्यामुळें त्याविषयीं कांहीं चालचलाअू पण निर्विवाद पुरावे देअूं या.

## अुर्दूचें स्वरूप

ज्या अुर्दू भाषेला मुसलमान राष्ट्रभाषा करण्याचा अितका अट्टहास करीत आहेत ती अुर्दू आहे तरी कशी याची बोटभर वानगी जरी सामान्य वाचकांना दाखविली जाअील, तरी त्यांना तिला राष्ट्रभाषा करण्यास बहुसंख्य हिंदूंनीं विरोधच कां केला पाहिजे हें ध्यानीं येअील. आज प्रचलित असलेल्या प्रत्यहींच्या सामान्य लेखांतील अुर्दूचे दोनतीन अुतारे पाहाः—

"गालिब के शायरीमे निहायत जवानी भी जगह जगह भरी है. मजामीन भी अुसने नये शामिल किये है, जिसे वह मसायले तसव्वुफ कहता है."

"अित्तिला दी जाती है के सब लोक सायलाने मजकूर की जात या

जायदाद के खिलाफ मुताल्लिक दावे रखते हो वे अिस अिश्तिहारके तारीखसे हाकिम के आगे तहरीरि अर्ज पेशकरे. अैसा न करनेपर सायले मजकूर जुमला अगराज व मोरकाजात के लिये जेरदका मजकूर बाजाब्ता बेबाक मुतसव्विर होगा. ”

आतां अुर्दू कवितेची वानगी पाहा: “ परतवे खुरसे है शबनम्को फनाकि तालीम । हमभी है अेक अिनायत की नजर होने तक ॥ फिर दिल तवाफ कूये मलामतको जाय है । पिंदारका सनम्कदा वीरां किये हुये है ॥ ’

आतां ही असली अुर्दु भाषा बंगाल बिहार ओरिसा महाराष्ट्र ते रामेश्वर पर्यंतच्या हिंदूंच्या कोट्यवधि लोकांना तर काय पण लक्षावधि मुसलमानांनाहि समजणें किती कठीण ! बहुसंख्य असणाऱ्या हिंदूंच्या भाषांना ती किती विसंगत, प्रतिकूल नि अनोळखी आहे तें काय सांगावयास पाहिजे ? वरचीं अूर्दू अवतरणें मुळांतच हिंदु जनतेला किती दुर्बोध ! पण त्यांतहि जर हें आणखी लक्षांत घेतलें कीं हीं अवतरणें, अुर्दू लिपींत, अलप्बेपेतेंतच, नुसतीं अुर्दू भाषेंतच नव्हेत तर ती अुर्दू लिपींतच छापलेलीं हवींत असा मुसलमानांचा हट्ट आहे; तर तीं अवतरणें समजण्यास तर राहोतच, पण वाचण्यासहि किती पटीने दुर्घट होअून पडतील तें आतां मराठी वाचकांना थोडें तरी कळून चुकेल.

## ही अुर्दू—ही हिंदी !

आतां अेक लहानसा उतारा दोन्ही भाषांतील चालू लिखाणाचा अेकत्र देअूं : “ अगर बर तकदीर कोअि सही मोशरिक मेरा पैदा होकर अिस्तेहकाक जाहीर करे, या मुनमिकर कब्जा बाकअि न दे या किसी किफालत मवाखजा की बजहसे कब्जे, मुर्तेहनान मोसूफमे चे खलल वाके हो तो मूर्तेहिनको यखतियार होगा. कि जुज या कुल जरे रहन मयसूद तारीखे तहरीर वासीका इजासे जायदादे मजकूराबाला व दीगर जायदाद व जात मुनमिकरसे वसूल करले और शर्ते अिनफिकाक यह है के जब जरे रहना आदा कर दूंगा तो शै मराहून अिनफिफाक करालूंगा ” हें झालें अुर्दू; पण अशा प्रकारचें हें हिंदी वहिवाटपत्र पाहा : “ समस्त धन अुक्त आधिग्रहीतासे ( मुर्तेहिन ) प्राप्त करालिया, अब कुछ शेष न रहा. आजसे अुसका स्वामित्व भूमिपर करादिया. आजसे वह आपने आपको अुक्त भूमीका स्वामी समझे. जबकभी जेठ मासमे

बन्धक धन ( जर ) चुका दें ग तो भूमीको मुक्त करालेंगे, तबतक अधिगृहीता को अधिकार होंगे कि वह स्वय भूमि जोते...अुक्त भूमीसे वृक्षोंकी लकडी लेता रहे. जो आर्थिक हानी अुसको अुठानी पडे अुसको हमसे तथा हमारी समस्त चल वा अचल संपत्तीसे प्राप्त करले ! ”

अेकाच प्रकारच्या विषयावरील या दोन लेखांवरून बहुसंख्य लोकांना कोणती भाषा त्यांतल्या त्यांत सहज समजण्यांत येअू शकते, आपली अशी अैकतांच भासते हें सामान्य वाचकांच्याहि ध्यानीं येअील. हिंदुस्थानची राष्ट्रभाषा बहुसंख्य लोकांना अनुकूल नि सुलभ तीच असावी हें जर स्वयंसिद्ध कारण असेल तर हिंदी हीच राष्ट्रभाषा झाली पाहिजे. अुर्दू ही अेक भाषा ह्या दृष्टीनें किती प्रमाणांत चांगली वा वाअीट. हा प्रश्न अिथें अगदीं अप्रस्तुत आहे. प्रत्येक प्रांतिक भाषेंत जसें चांगलें साहित्य असतें तसें तींतहि आहे आणि ती मुसलमानांची अेक पंथीय वा प्रांतीय भाषा म्हणून, अितर प्रांतिक भाषांप्रमाणें सुखेनैव चालू राहो ! पण अिथें जो प्रश्न आहे तो अितकाच कीं, हिंदुस्थानची राष्ट्रभाषा होण्यास मात्र ती अुर्दू सर्वथैव अयोग्य, अराष्ट्रीय, अप्रगत नि जन्मदरिद्री आहे. कारण तिचा अवलंब जी अरबी ती संस्कृत भाषेच्या तुलनेंत पासंगासहि पुरणारी नाही. तिची लिपि जी अलेप्बेपेते ती नागरीच्या मानाने शिकण्यांत, वाचण्यांत, छापण्यांत अगदीं अडाणी नि टाकाअू ठरणारी आहे !

## मुसलमानांचा अट्टाहास !

हिंदी भाषा नि नागरी लिपी मुसलमानांना नको आहे. ती केवळ अेवढ्या-चसाठीं कीं, ती हिंदूंच्या संस्कृतीची द्योतक होय. आणि म्हणूनच मुसलमानी संस्कृतीची द्योतक असलेली आरबीनिष्ठ अुर्दू भाषा नि अुर्दू लिपी सोडण्यास जे मुसलमान आहेत ते सिद्ध होणार नाहींत ! ही खरी वस्तुस्थिति आहे. प्रश्न राष्ट्रभाषा होण्यास योग्य कोणती नि सुलभ कोणती असा भाषिक चर्चेचा नाहीं, दोन भिन्न संस्कृतींच्या संघर्षाचा आहे. हें आपण जितकें लवकर ओळखूं तितका आपला वेळ नि शक्ति ह्यांचा केवळ भाषिक चर्चा करून मुसलमानांना वळविण्यांत अपव्यय होण्याचें टळेल. मुसलमानांनी त्यांच्यापुरती अुर्दू ठेवावी—वाद तो नाहीं. पण त्यांचा अट्टाहास ती अुर्दू भाषा नि लिपी हिंदूंवर बळाने लादण्याचा नि तिलाच राष्ट्रभाषा करून सोडण्याचा जो चालला आहे तो हाणून पाडला पाहिजे.

अगदीं सीमाप्रांतापासून घ्या. ह्या प्रांतांत मुस्लीम बहुसंख्य. त्यांचे हातीं सत्ता येतांच त्यांनीं यच्चावत् बोर्डशाळांतून हिंदी गरुमुखी शिकवेण निषिद्ध करून टाकलें. वैदिक नि शीख ह्या दोन्ही पंथांच्या हिंदु मुलांना अुर्दू भाषा नि लिपीच शिकली पाहिजे ! सरकारी काम तिच्यांतच. ( हिंदु–शीख शीखेतर दोघेहि विधिमंडळांतून दोनदां या ठरावाच्या निषेधार्थ अुठून गेले पण कोणी भीक घातली नाहीं ! ) मुसलमान बहुसंख्य, ह्यासाठीं त्यांच्या प्रांतांत त्यांची अुर्दू भाषा नि लिपीच राष्ट्रभाषा राष्ट्रलिपी मानणें युक्त. बहुधा अशा भावनेनें राष्ट्रसभा व गांधीमंडळ त्याचा निषेध करण्याचें नांवसुद्धां घेत नाहींत. पण मग त्याच न्यायें निजामच्या राज्यांत हिंदु बहुसंख्य, परंतु तिथेंहि शाळांतून हिंदूंना अुर्दूच शिकणें भाग पडतें, म्हणून त्याचा निषेध तरी गांधीमंडळानें करावयास हवा होता.

पण अुलट, नागपूरला निजामच्या निषेधाचा ठराव मराठी मंडळींनीं आणला असतां गांधी–मंडळानें तो दडपून टाकला ! काश्मीरांत मुस्लीम बहुसंख्य, यास्तव हिंदु राजानें तें राज्य सोडावें असें तोंडपुजें विधान करणाऱ्या गांधीजींना त्याच न्यायें ' निजाम व भोपाळ हीं बहुसंख्य हिंदु संस्थानें, त्यांच्या मुस्लीम नबाबांनी राज्य सोडावें ' असें सांगण्याची मात्र छाती होत नाहीं. अुलट ' भोपाळ रामराज्य आहे ' असा धडधडीत खोटा नि खोडसाळ बहाणा करण्यास गांधीजींना जसा संकोच वाटला नाहीं तसाच हा प्रकार !

## अेक ध्यानांत ठेवण्यासारखें भाषण !

सीमाप्रांतांत हिंदी निषिद्ध करण्याच्या ठरावावर विधिमंडळांत बोलतांना अेका हिंदु सभासदानें मुसलमानांना सांगितलें, ' या प्रांतांत तुम्ही मुस्लीम बहुसंख्य म्हणून अुर्दूच राष्ट्रभाषा असली पाहिजे, हिंदु मुलांनींसुद्धां तीच शिकली पाहिजे म्हणून म्हणाल तर ज्या प्रांतांत हिंदु बहुसंख्य तेथें ते अुर्दू भाषा शिकविणें निषिद्ध करतील, मुस्लीम मुलांना हिंदीच शिकणें भाग पडतील याचा विचार करा !' ह्या त्या हिंदु सभासदाच्या धमकावणीला मुस्लीम पुढाऱ्यानें अुत्तर दिलें, ' ज्या प्रांतांत हिंदु बहुसंख्य त्या प्रांतांतसुद्धां शाळांतून अुर्दूला निषिद्ध करण्याची हिंदूंची छातीच होणार नाहीं ! हिंदी निषिद्ध करण्याची मुस्लीमांत धमक आहे. अुर्दू निषिद्ध करण्याची हिंदूंत धमक नाहीं !' त्या मुस्लीम पुढाऱ्याचें हें मनोगत प्रत्येक हिंदूनें आपल्या हृदयावर कोरून

ठेवावयास हवें. पाणी जर कुठें मुरत असेल तर तेथेंच. तो मुस्लीम पुढारी कडु असलें तरी अगदीं खरें तेंच बोलला! त्याचा पुरावाहि लागोलाग मिळाला बहारमध्यें! बहारमध्ये शेंकडा अैशींवर हिंदु संख्या. पण मुस्लीमांनीं ठराव आणला, सरकारी कामकाज अुर्दू भाषा नि लिपींतच चालू राहावें आणि मुसलमान रागावतील या भीतीने हिंदूंनीं तो विरोधिला नाहीं!!! तीच स्थिति बंगालची होत आहे!

## बंगालमध्यें अुर्दूचें बंड

आमच्या अिकडचे कांहीं अर्धवट लोक भाषाशुद्धीच्या विरोधाचे प्रसंगी लिहून जातात कीं 'मुस्लीम जनतेनें अुर्दूचें आक्रमण चालविलें आहे हेंच खोटें. बंगाल्यांत पाहा, सारी मुस्लीम जनता बंगालीलाच आपली मातृभाषा मानीत आहे.' त्यांना अजूनहि पत्ताच नाहीं कीं खिलाफत चळवळीपासून बंगल्यांतील बहुसंख्य मुसलमानांची भाषा अुर्दूच करून टाकण्याची केवढी चळवळ चालली आहे! डाक्का विश्वविद्यालयांत मुसलमानांनीं वाद काढला कीं बंगाली **क्रमिक पुस्तकांतील बंगाली** बहुसंख्य शब्द अुर्दूच असावे, आणि तशी क्रमिक पुस्तकें निघत आहेत! अितिहास शब्द नको 'तवारीख' हवी. 'विकास' नको 'तरक्की' हवी. 'देश, राष्ट्र, पुष्कळ' असे साधे शब्दसुद्धां पालटून 'मुल्क, कौम, निहायत' हवेत! त्याच्याहि पुढें जाअून शब्दच काय पण अर्थहि वादग्रस्त विषय झाला. रवींद्रांच्या साहित्यावर मुस्लीमांनीं आघात चालविले आहेत; अुपमासुद्धां मुस्लीम संस्कृतीच्या हव्यात. 'भीमासारखा बलवान' असेंच नेहमीं कां म्हणतां, 'रुस्तुमसारखा बलवान' म्हणा. विक्रम चंद्रगुप्ताचेच धडे कां? स्पेन–विजेत्या तारीकचे धडे घाला. गेल्या महिन्यांत कलकत्ता विश्वविद्यालयाचा महोत्सव झाला. मुस्लीम विद्यार्थ्यांनीं 'वंदे मातरम्' राष्ट्रगीत आरंभिलें जातांच दंगल चालू केली! विद्येची अधिष्ठात्री देवता सरस्वती ध्वजावर चित्रिली होती–मूर्तिपूजा! 'बुदपरस्ती!' म्हणून गिल्ला चालू करून तें चित्र नि ध्वज काढून टाका असा त्यांनीं अट्टाहास मांडला!

## भूषण कवीवर संक्रांत

मुसलमान संस्कृतीचा छाप साऱ्या बंगाली साहित्यावर मारण्यास अुद्युक्त झालेल्या बंगाली मुसलमानांना, सरसीमा प्रांतांत हिंदु संस्कृतीचा छाप हिंदू-पुरता तरी ठेवा ही त्या प्रांतांतील हिंदूंची मागणी मात्र असह्य होते. बहुसंख्य

हिंदु असलेल्या भोपाळ संस्थानांत वा हैद्राबाद संस्थानांतील शाळांतून हिंदु मुलांनाहि अुर्दू भाषा नि अुर्दू लिपीच शिकविली जाते! हा मुसलमानांचा हट्ट पाहा नि कांहीं हिंदूंची परधार्जिणी नि भ्याड वृत्ति पाहा. अेका मुसलमानानें गांधीजींना पत्र टाकलें कीं 'भूषणाचे' काव्यांत मुसलमानांची निंदा आहे. लगोलग गांधीजींनीं काय केलें? भूषण काव्य वाचलें? नाहीं. तेच म्हणतात, मीं भूषण स्वतः वाचलला नाहीं! त्यांना शिवाजीचें चरित्रहि माहीत नव्हतें. पण स्वतःच त्या विषयांत हास्यास्पद अज्ञान असणाऱ्या गांधीजींनीं. त्या अेका मुसलमानाच्या पत्रासरशीं भूषणासारख्या कवीचें प्रख्यात काव्य निषिद्ध ठरवावें आणि क्रमिक हिंदी पुस्तकांतून त्याचे अुतारे घेअूं नयेत म्हणून फतवा सोडावा! अिंदूर हिंदु संस्थान, हिंदु बहुसंख्य पण तेथील सरकारी न्यायालयांतील सारें कामकाज अजूनहि अुर्दू भाषा-लिपींत चालतें!

## खोटी शेखी

परंतु सगळयांत दुबळा नि दुधखुळा कोटिक्रम म्हणजे आपले शब्द मारून जे अुर्दू शब्द मराठी-हिंदींत घुसले आहेत त्यांना आपल्या मानहानीचें द्योतक न मानतां अुलट आपल्या पराक्रमाचे विजयध्वज अशी कांहीं हिंदु लेखकांनींच शेखी मिरवावी हा होय! चीत पडलेल्यानें माझेंच नाक वर म्हणून म्हणण्याचा कोडगेपणा करावा! खरें पाहतां 'कबूल, हजर, कायदा' प्रभृति हे आपल्या भाषेंत आपले शब्द मारून घुसलेले सारे अुर्दू शब्द आपल्या अेका काळीं झालेल्या पराजयाचे अुरले सुरले अवशेष. शक्य तों त्या पराजयाच्या स्मारकांना अुच्छेदणें हेंच आमचें कर्तव्य, पण अुर्दू शब्द बहिष्कारावे असें म्हणतांच मुसलमान रागावतील ही धास्ती खाल्लेले लोक त्यांना काढण्यास कचरतात आणि ती भीती असल्या दुधखुळ्या कोटिक्रमाआड दडवूं पाहतात कीं आमच्या भाषेंत घुसलेले मुसलमानी शब्द म्हणजे आम्हीं पाडाव करून आणलेले मुसलमानी बंदीवान, आमच्या मुसलमानावर मिळविलेल्या विजयाचें द्योतक, छिनावून आणलेलीं शत्रूंचीं 'निशाणें' होत! ते अुर्दू शब्द वापरणेंच स्वाभिमान! असें जर समजावयाचें तर मग आज आपले आअी, भाअू, बहीण, पत्नी हे शब्दसुद्धां न वापरतां जी शिक्षित मंडळी संभाषणांत 'माझी मदर सिक आहे, वाअिफ माहेरीं गेली आहे, घरीं कुक करायला कोणी नाहीं' अशी अिंग्रजी शब्दांनीं बुजबुजाटलली बटलरी भाषा वापरतात, ती सारी

चटोर मंडळी अिंग्लिश भाषेवरहि मोठे दिग्विजय मिळवीत चालली आहेत म्हणावयाची ! कारण ती मंडळी ह्या अनेक अिंग्लिश शब्दांना पाडाव करून मराठींत आणीत आहेत. अिंग्लिश भाषेवर चढाअी करून आमचा न्हावी 'हेअर कटिंग सलून' ला पाडाव करून आणीत आहे, तर आमचा धोबी 'वॉशिंग कंपनी' चा पाडाव करीत आहे ! अिंग्रजांच्या राजकीय वर्चस्वामुळें बोकाळेल्या आमच्या दास्य-वृत्तीचीं हीं चिन्हें आहेत, अिंग्रजी भाषेची हिंदी मराठीवर झालेली ही कुरघोडी आहे, का मराठीनें अिंग्लिश भाषेचे छिनून आणलेले हे ध्वज आहेत ?

## अितिहासांतील अुदाहरणें

तीच गोष्ट मुस्लीम वर्चस्वाच्या काळांत बळावलेल्या अुर्दू शब्दांची ! पुण्याच्या साऱ्या पेठांचीं नांवें मुसलमानी होतीं. पुणें जळल्यानंतर बसविलें तेव्हां पेशव्यांनीं पुण्याच्या पेठांची शुक्रवार, शनिवार प्रभृति आजचीं स्वकीय नांवें ठेवलीं, हा काय पेशव्यांचा पराजय झाला ? तीं मुस्लीम नांवेंच आज त्या पेठांना राहतीं तर तीं का मराठीचीं विजयचिन्हें ठरतीं ? सिंहगड औरंगजेबानें घेतला तेव्हां त्याचें नांव 'बक्षिंदाबक्ष' ठेवलें. मराठ्यांनीं तो गडच तेवढा परत जिंकला नाहीं, तर तें मुसलमानी नांवसुद्धां पुसून टाकून त्याला आजहि सिंहगडच म्हणत आहेत-हा काय मराठीचा पराजय झाला ? जर सिंहगडाला आजहि 'बक्षिंदाबक्ष' नांव रूढावलेलें असतें तर तो काय मुस्लीमांचा छिनून आणलेला विजयध्वज समजला जाता ? नाशिकला मोंगलांनीं कागदोपत्रीं गुलशनाबाद, काशी-नालंदेला अिसलामाबाद प्रभृति नांवें दिलीं-हिंदूंनीं तीं मानलीं नाहींत; नाशिक, काशी, प्रयाग हीं स्वकीय नांवेंच तगविलीं-हा हिंदु संस्कृतीचा पराजय म्हणावयाचा. आणि अुलटपक्षीं देवगिरीला मुस्लीमांनी जें दौलताबाद नांव दिलें, तें आजहि तसेंच चालतें-हा हिंदु संस्कृतीचा विजय समजावयाचा ? दौलताबाद हें नांव मुसलमानांच्या भाषिक विजयाचें स्मारक का हिंदूंच्या ? दौलताबादला टाकून आम्ही जर देवगिरीच म्हणूं लागलों तर आमच्या हिंदुभाषेचा तो काय अपमान समजावयाचा ? दौलताबाद शब्द वापरल्यानें देवगिरी शब्दाचा पाडाव झाला आहे हादेखील सिद्ध करून दाखविण्याअितका गूढ प्रश्न आहे नाहीं ? आज तोंडीं खिळलेलें 'हजर, शिवाय' हे मुस्लीम शब्द टाकून अुपस्थित, वांचून

वा विना हे शब्द आम्हीं वापरले तर ती काय मराठी भाषेची नि तिच्या विजयाची अवहेलना होओील ? शिवाजी महाराजांनीं पुरस्कारिलेल्या म्लेंच्छ शब्दांच्या बहिष्कार–प्रवृत्तीमुळें शेंकडों अुर्दू शब्दांची मराठी भाषेंतून हकालपट्टी झाली—म्हणजे शिवाजी–प्रभृतींनी मराठी भाषा मुस्लीमांच्या हातीं सोंपवून पराजित करून टाकली असें समजावयाचें तर ! ! अुलट सिंधमध्यें हिंदूंना स्वतःची लिपीसुद्धा सांभाळविली नाहीं. आज हिंदूंचीं रामायण-भारतादि धर्मपुस्तकेंच काय पण गायत्रीमंत्रसुद्धां छापण्याचा तर बहुधा अुर्दू लिपींत अुजवीकडून डावीकडे छापावा लागतो—म्हणजे सिंधच्या हिंदूंनीं मुसलमानांची अुर्दू लिपी पाडाव करून आणली म्हणावयाची ! आणि सिंधच्या हिंदूंनीं मुस्लीमांवर मिळविलेल्या प्रचंड सांस्कृतिक विजयाचा तो ध्वजच समजावयाचा ? दास्यविकृत मनोवृत्तीचें हें अुदाहरण किती विचित्र आहे तें पाहा ! अुलटी खोपडी म्हणतात ती ही !

## चर्चेचा सारांश

( अ ) अेका बाजूनें अुर्दूसच राष्ट्रभाषा नि राष्ट्रलिपी करावयाची नि हिंदूवर ती बळानें लादावयाची असा मुसलमानांचा अट्टहास, नि दुसऱ्या बाजूनें मुसलमान रागावतील ह्या धास्तीनें नि मूळच्याच परधार्जिण्या प्रवृत्तीमुळें अुर्दूला अुघड नि कट्टर विरोध न करण्याचें कांहीं हिंदूंचें भ्याड धोरणः— ह्यामुळें हिंदुस्थानभर अुर्दू ही वरचढ झाल्यावांचून राहणार नाहीं. काश्मीर, सीमाप्रांत, पंजाब, सिंध, बंगाल, भोपाळ, हैद्राबाद, बिहार प्रभृति अनेक प्रांतांतून अुर्दू लिपि नि अुर्दू भाषा हीच राष्ट्रभाषा-लिपि होअून बसेल. सरकारी कामकाज तर आजहि ह्या बहुतेक स्थळीं तींतच चालतें; जर हिंदूनीं अुर्दूला कट्टर विरोध केला नाहीं तर मुस्लीमांच्या कट्टरपणाचा विजय निश्चित आहे.

( आ ) हिंदी नागरीला राष्ट्रभाषा–लिपी मानावयास मुसलमानांचा हा जो कट्टर विरोध आहे त्याचें मूळ केवळ भाषिक प्रश्नांत नाहीं. त्यांना हिंदुस्थानचें पाकस्थान करावयाचें आहे आणि त्या ध्येयाच्या वेडांतला अुर्दूस राष्ट्रभाषा–लिपी करून मुस्लीम संस्कृतीची वरचढ नि हिंदुसंस्कृतीचा पाडाव करणें हा अेक त्यांचा आनुषंगिक नि अपरिहार्य कार्यक्रम आहे. हा दोन विरोधी संस्कृतींचा संघर्ष आहे. तिथें नुसतें ‘ हिंदीमध्यें आम्ही शेपन्नास अुर्दू

शब्द घेतों, या !' अशा वैदूगिरीचें ओखद पुरें पडणारें नाहीं. नुसतें 'हिंदी याने हिंदुस्थानी' म्हणूनहि भागणार नाहीं.

( अि ) यास्तव हिंदूंनी त्या संघर्षास अुघडपणें नि जय्यतपणें सिद्ध झालेंच पाहिजे. अैक्यलंपट वर्गानेंहि लिपीचे प्रकरणीं अैक्य घडवून आणणें अशक्य हें मान्य केलेंच आहे. त्यांनींहि हात टेंकले. नागरी नि अुर्दू अशा दोन लिप्या राहतील हें गृहीत धरलें आणि आपल्यापुरतें नागरीस राष्ट्रलिपी करून सोड-ण्याचे यत्न चालविले आहेत. तेंच धोरण अिष्ट नि शक्य. त्याच धोरणानें आतां राष्ट्रभाषेचाहि प्रश्न सोडविणें अवश्य. मुसलमान आपली भाषा सुखेनैव अुर्दू ठेवोत. आम्हीं हिंदूंनी स्पष्ट घोषणा केली पाहिजे कीं, आमची हिंदूंची राष्ट्र-भाषा हिंदीच राहणार, हिंदूपुरताच हा प्रश्न आम्ही सोडविणार. मुसलमानांची हांजी हांजी करण्याचें आम्हांला कांहींअेक कारण नाहीं. या हिंदुस्थानांत बहुसंख्य जनता बावीस कोटी—हिंदु आहेत. त्यांची जी भाषा ती हिंदीच राष्ट्रभाषा होय. बहुसंख्याकांशीं भाषिक व्यवहारसंबंध ठेवण्याची अल्पसंख्या-कांनाच अधिक आवश्यकता, अैक्यासाठीं त्यांनीं तळमळलें पाहिजे. आमच्यावर अुपकार करण्यासाठीं नव्हे, तर त्यांना हवें असल्यास त्यांनीं अैक्य करावें. **'याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावांचून, विरोधाल तर तुमच्याविरुद्धहि हिंदु राष्ट्र आपलें भवितव्य बनेल तसें घडवील ?'** हिंदु–मुस्लीम अैक्याचें सर्वच प्रकरणीं लागू असणारें हेंच सूत्र ! भाषेच्या प्रकरणींहि तेंच लागू. जोंवर बहुसंख्य हिंदु अेकीसाठीं अल्पसंख्य मुसलमा-नांच्या पाया पडत आहेत, तोंवर हिंदुस्थानचें पाकस्तान करण्याच्या अेकाच अटीवर काय ते मुस्लीम लोक अेकीला हो म्हणाले तर म्हणतील ! ही भाषिक प्रश्नींहि अुघड अुघड नि अपरिहार्य वस्तुस्थिति आहे !

( अी ) आम्हां हिंदूंची राष्ट्रभाषा हिंदी हें ठामपणें ठरवून टाकलें, मुसल-मानी संमतीचा अवजड लंगर जो तिच्या गळ्यांत अडकविला जात आहे तो अेकदांचा तोडून टाकला कीं सारी कटकैट चटदिशीं मिटून जाअील. आम्हां हिंदूंच्या राष्ट्रभाषेच्या हिंदी विश्वविद्यालयावर आमच्या हिंदु संस्कृतीची जी अधिष्ठात्री देवता सरस्वती तिचाच ध्वज निःसंकोचपणें नि निर्मुक्तपणें फडकत राहील. संस्कृतशब्दरत्नाकरांतून तिला हवे ते ते नवेनवे पारिभाषिक शब्द अनिरुद्ध-पणें लाभूं शकतील. तिच्या मूळ प्रकृतीचा विकास तिच्या आवडीप्रमाणें,

तिला शोभेल अशाच, सुश्रीक नि सुश्लिष्ट प्रमाणांत, होअूं लागेल. आमच्या हिंदु संस्कृतीचें हृद्गत ती निर्भयपणें प्रकटवूं लागेल, त्या सरस्वतीचा 'ध्वज मुसलमानांना न आवडला तर त्यांनीं आपलीं निराळीं अुर्दू विद्यापीठें काढावीं!' त्याची चिंता काय? अुर्दूचे नि हिंदीचे पाय अेकांत्र अेक अडकविल्यानें दोहोंचीहि प्रगति खुंटते, कटकट माजते. मुसलमानांनीं म्हटलें तरीहि 'हिंदी याने हिंदुस्थानी'ची ब्याद आम्हांस आतां नको आहे.

(अु) बहुसंख्याकांना जी सुलभ नि अनुकूल तीच राष्ट्रभाषा होअूं शकते. यास्तवच बहुसंख्य हिंदूंच्या हिंदुस्थानांत जी संस्कृतनिष्ठ असेल तीच राष्ट्रभाषेचें स्थान सहजीं पटकावील. याकारणें ती जितकी संस्कृतनिष्ठ तितकें हिंदीचें राष्ट्रभाषाक्षमत्व अधिकच वाढेल. तेव्हां हिंदीप्रांतांत जो भाषाशुद्धीचा अभिमानी असा पक्ष आहे त्यानें आतां हिंदीला पूर्णपणें संस्कृतनिष्ठच करण्याचा आणि तिच्यांतून अुरल्यासुरल्या पूर्वींच्या मुस्लीम वर्चस्वाच्या द्योतक असणाऱ्या झाडून साऱ्या अुर्दु विदेशी शब्दांना खड्यासारखें निवडून बहिष्कारण्याचा अुघड अुघड चंग बांधावा, अनवश्यक असा अेकहि अिंग्लिश वा अुर्दू शब्द हिंदींत वावरूं देअूं नये. असें अगदीं ताणून धरल्यावांचून विदेशीयांच्या ह्या भाषीय आक्रमणाच्या रस्सीखेचींत आपला डाव आपणास जिंकतां येणार नाहीं. अुलटपक्षीं अुर्दूत शक्य तितके आरबी, फारशी, तुर्की, अिंग्लिश छपन्न विदेशी भाषांची खिचडी जी मुसलमान करूं निघाले आहेत तें जितकें त्यांना परवडतेंसें भासत आहे तितकेंच आपल्याहि पथ्यावरच पडलें आहे. कारण अुर्दूत आरबीप्रभृति हिंदूंना अनोळखी नि अुद्वेगजनक शब्द जितके अधिक येत चालतील तितकी ती बहुसंख्य हिंदूंना अधिक दुर्बोध नि अप्रिय होत जाअून बंगाल ते मद्रासपर्यंत तिला राष्ट्रभाषा करण्यास सामान्य जनताहि आपण होअूनच विरोधूं लागेल, हिंदीच त्यांना त्यांतल्या त्यांत जवळची, आपली नि सोपी वाटूं लागेल.

या सर्व कारणांसाठीं हा राष्ट्रीय भाषेचा नि राष्ट्रीय लिपीचा प्रश्न सोडविण्याचा अिष्टतम नि अेकच मार्ग म्हणजे हा कीं प्रत्येक हिंदूने अशी अुघड अुघड नि बेधडक प्रतिज्ञा करावी:—

'आम्हां हिंदूंची राष्ट्रभाषा संस्कृतनिष्ठ हिंदी हीच: आणि संस्कृतनिष्ठ अशी ती नागरी लिपि हीच आम्हां हिंदूंची राष्ट्रलिपि!!'

—सह्याद्रि जून, १९३७.

# म्हण-शिवेन! स्वीकारीन!!

## म्हण्—शिवेन!

अस्पृश्योद्धारचाच प्रश्न घ्या; हे सात कोटि आपले हिंदु, रक्ताचे, धर्माचे, राष्ट्राचे बंधु, ह्यांस आपण तो अबदुल रशीद, तो औरंगजेब, ते पूर्व बंगाल्यांत हिंदूंच्या कत्तली करणारे अितर विधर्मीय धर्मोन्मत्त यांना जितके जवळ करितों, त्यांना जसें आणि जेथपर्यंत घरांत येऊं देतों, तेथपर्यंत आणि तसेंदेखील वागवीत नाहीं. ते धर्मशत्रू घरांत आले असते तर त्यांस तुम्हीं गादीवर बसवून 'या खानसाहेब' म्हणून मांडीशीं मांडी लाविली असतीत. पण जरी या अस्पृश्य हिंदूंतील अगदीं संत, सालस, सरळ, विठोबाचा वारकरी स्नान करून घराशीं आला तरी त्याला आम्ही आंत घेणार नाहीं, त्याची सावलीदेखील घेणार नाहीं! हीं सात कोटी आम्हां मनुष्यांसारखीं मनुष्यें. आम्हीं कुत्र्यामांजरांसारख्या गदळ प्राण्यांस, म्हशी गायींसारख्या पशूंस शिवूं, पण त्यांस शिवत नाहीं! त्यायोगें हा सात कोटी हिंदुसमाज आपल्या पक्षास असून नसून सारखाच झालेला आहे; अितकेंच नव्हे; तर त्याहून भयंकर संकट आपणावर कोसळण्यास कारणीभूत होणारा आहे. कारण त्यांच्यावर जो अमानुष बहिष्कार आम्ही टाकला, त्यामुळें ते आपल्यास अुपयोगी पडत नाहींत. अुलट शत्रूंस आपल्या घरांत भेद पाडण्यास सुलभ साधन होतात. आणि अंतीं वाटून आपले शत्रूच होअून आपल्या अपरिमित हानीस कारणीभूत होतात! ह्यासाठीं—आणि **विशेषत: न्यायासाठीं** त्यांस त्यांचे मनुष्यत्वाचे अधिकार **आपण होअून** जर आपण देअूं तर आपल्या हिंदु समाजावर आघात करण्यासाठीं विधर्मीयांनीं अुचललेल्या भ्रष्टीकरणाच्या तरवारीची धार अर्धी अधिक बोथट होअून जाअील. मग अर्धे अस्पृश्य आम्ही घेतों म्हणून म्हणणारी अल्लींची जीभ, आणि सगळे अस्पृश्य आमचेच आहेत म्हणून अधिकारी सांगणारी निजामी आणि सिंधी मौलवींची धृष्टता ठिकच्या ठिकाणीं लुली पडेल. खिस्त्यांचीं अर्धीं अधिक मिशनें ओस पडतील आणि हें सर्व

अत्यंत दूरवर परिणाम करणारें महत्कार्य करण्यास कांहीं तुरुंगांत जावें लागेल काय? मुळींच नाहीं! फांशी? नांव नको! कांहीं लाखों रुपयांचा निधि अुभवावा लागणार आहे? नाहीं! कवडीचा खर्च नाहीं. अेक दिवसहि कारागृह पाहणें नको. केवळ अिच्छा धरा म्हणजे तें महत्कार्य आपोआप झालें! केवळ मनांत निश्चय करा 'मी महारास शिवणार!' बस, या अेका अुच्चारासरशीं श्रद्धानंदांचा भयंकर सूड तुम्हीं अर्धा अधिक अुगवूं शकाल! कुत्र्यास शिवतोस, सापास दूध पाजितोस, अुंदिराचें रक्त प्रत्यहीं पिणाऱ्या मांजरास ताटांत तोंड घालूं देतोस—तर मग हे हिंदु! या माणसासारख्या माणसास, या तुझ्या रामाची पूजा करणाऱ्या तुझ्या देशबंधूस—या **तुझ्या महारास** शिवण्याची तेवढी तुला अितकी कसली लाज वाटते! सोड ती लाज. त्या लाजेचीच तुला वाटूं दे लाज आणि या श्रद्धानंदांच्या हृदयांतून त्या हत्याऱ्याच्या गोळीसरशीं बाहेर पडलेल्या रक्ताच्या चिळकांडीची शपथ घेअून म्हण कीं, 'शिवेन, मी महारास शिवेन, मी अस्पृश्यास निदान सार्वजनिक कार्यांत तरी माझ्याजवळ बसूं देईन!'

बस्, इच्छा केलीस, इतका नुसते हात पुढें करून महारास शिवलास कीं, हा अस्पृश्यतेचा इतका अत्यंत महत्वाचा प्रश्न फटकन् सुटला! शाळेंतून, नगरसंस्थेंतून, सभांतून, सार्वजनिक मार्गावरून अस्पृश्य हिंदूस नुसतें शिवायचें कीं श्रद्धानंदाचा सूड अुगविला गेलाच! अितकें महत्कार्य आणि तें साध्य करण्याचा हा अितका सोपा अुपाय!

तर चल म्हण, 'शिवेन! जो मी शत्रूच्यापुढें 'या साहेब! या महाराज!' म्हणून लाळ घोटण्यास लाजत नाहीं. तो मी माझ्या हिंदु बंधूंस शिवण्यास लाजणार नाहीं. आतां या क्षणीं अुठेन आणि माझ्या महारचांभारादिक हीन दीन हिंदु बंधूंच्या पाठीवर प्रेमानें हात फिरवीन! मग आकाशांतून वज्र जरी पडावयाचें असलें तरी पडो!'

पुरः अितका निश्चय करून तूं बाहेर पड आणि त्या हीन दीन हिंदु बंधूंच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरव कीं, त्या अेका हात फिरवण्यानें तूं या हिंदु जातीचें भाग्यचें भाग्य परिणामकारकपणें फिरवूं शकतील आणि तुझ्यावर या सत्कृत्यासाठीं आकाशांतून वज्र नाहींच पण पारिजातकाच्या फुलांचा वर्षाव पडेल!

## म्हण् स्वीकारीन ! !

आणि तीच गोष्ट या संघटनात्मक कार्याच्या अेका अत्यंत महत्त्वाच्या अुपांगाची आहे. आपल्या पूर्वार्जित घरांत, पूर्वी जे छलबलानें हिसडून नेले गेले, त्या आपल्या रक्ताच्या आणि राष्ट्राच्या बंधूंस ते आपल्या समाअीक समाजकुटुंबांत सप्रायश्चित्त आले असतां त्यांस ममत्वानें आपलें म्हणणें हें तें दुसरें अुपांग होय. हीच शुद्धि. जिच्यासाठीं श्रद्धानंद मुख्यतः मारले गेले. जिचा आपण अंगिकार केला असतां मुसलमान खिश्चनादिक अशेष विधर्मीयांचा भ्रष्टीकरणाचा व्यवसाय ठार बुडालाच पाहिजे, तीच ही शुद्धि. ज्या चळवळीनें **आधींच आज दहावीस वर्षांत लाखों लोक हिंदुसमाजांत आणि राष्ट्रांत परत समाविष्ट करून घेतले,** तीच ही शुद्धि. आजपर्यंत प्रतिवर्षी लाख लाख लोक हिंदु समाजांतून हिसडून नेले जात. असा क्रम अव्याहत अेक क्षहस्त्रांवर वर्षे चालला. लाखांनीं या आपल्या राष्ट्रमातेचीं पोटचीं पोरें या भ्रष्टीकरणाच्या प्लेगास बळीं पडत आलीं; पण त्यांतून अेकासहि वांचवून परत घरीं आणील अशी औषधि आजपर्यंत निघाली नव्हती. परन्तु भ्रष्टीकरणाच्या प्रतिवर्षी लक्षावधि जीवांचा संहार करणाऱ्या घातक प्लेगावर अेक अमोघ औषधि आतां सांपडली आहे. ती ही शुद्धि. ही संजीवनी या आपल्या हिंदुजातीच्या देवसेनेंतील कोणी सैनिक सहसा भ्रष्टीकरणाच्या बाणानें विद्ध न होअूं न देतां पूर्वीप्रमाणें लाखांनीं प्रतिवर्षी होणारा संहार टाळते. अितकेंच नाहीं; तर पूर्वी संहार झालेल्या त्या आपल्या धर्ममृत सैनिकाच्या लाखों प्रेतांस प्रतिवर्षी पुनः जिवंत करीत आहे, म्हणूनच या सवाअी संजीवनीची विद्या श्रद्धानंदांनीं देवगुरुपुत्र कचाप्रमाणें आपल्या देवशिबिरांत आणिल्यापासून विधर्मीयांच्या पोटांत धस्स झालें आहे. ते गडबडले आहेत. श्रद्धानंद मारले गेले कां ? कीं शुद्धि मरावी ! श्रद्धानंद मारले जाण्याचा खरा सूड व्यावयाचा असेल तर श्रद्धानंद मेले तरी शुद्धि मेली नाहीं. हेंच सिद्ध केलें पाहिजे.

आणि हें सिद्ध करण्यास कांहीं अेक विशेष त्रास, हिंदु बंधुहो ! तुम्हांस घेणें नको. प्रामाणिकपणें जे हिंदु राष्ट्रांत परावर्तित होअून येअूं अिच्छित असतील त्यांची पुनः प्रस्थापना करून त्यांस ममत्वानें वागविणें, त्यांस आपले म्हणणें, त्यांचा मनःपूर्वक स्वीकार करणें. अितकें केलें कीं पुरे. अेक वेळ

शुद्धि करण्यास पैसा आणि प्रयत्न यांचें पाठबळ लागेल. तें देण्यास संस्था झाल्या आहेत, होतील. तें काम तुमच्यांतील राष्ट्रनिष्ठ प्रचारक आणि धुरंधर पुरुष करीत आहेत. तुम्हां आम्हां सामान्य लोकांना—प्रत्येक हिंदुमात्रा तुला, त्याची विशेष चिंता नको. तूं केवळ अितकें कर, केवळ अितकें मनांत आण कीं, मी शुद्धीकृत हिंदूचा स्वीकार करणार ! पुरे, हे प्रत्येक हिंदुमात्रा, तूं समाजांत जिथें कुठें असशील त्याचे आजूबाजूस तुझी दृष्टि पोहोंचेल तोंवर अितकें बघ कीं, कोणी हिंदु अनाथ विधर्मीयांच्या पंजांत तर फसत नाहीं ना ? कोणी हिंदु स्त्री अेक पाअूल चुकलें म्हणून पापभीतीनें भांबावून आपल्या हिंदु अपत्यासह अनंत पावलांच्या घसरणीवर बळानें कोसळून घेअून धर्मांतराच्या नरकांत पडत नाहीं ना ? असें दिसेल तर त्वरित हिंदु समाजास आणि हिंदुसभांस ती बातमी कळीव. तुझ्या भाग्यीं त्या स्त्रीस धीर देअून किंवा त्या अनाथास हात देअून धर्मांतराच्या गर्तेपासून परत फिरवणें शक्य नसेल तर निदान नुसती बातमी तरी कळीव. जे शुद्ध झालेले असतील त्यांचा हात प्रेमानें हातांत धर, 'बरें आहे ना' अितकें ममत्वानें विचार. संक्रांतीस, दसऱ्यास, दिवाळीस त्यांना नुसतें भेटून रामराम कर आणि फुकटचें सोनें वाट; त्यांस कोणीं हिणविलें तर त्यांचा पक्ष घेअून नुसतें अितकें म्हण कीं, "चुकी कोणाकडून घडत नाहीं ! पापप्रवणता हा मनुष्यस्वभाव आहे. **प्रायश्चित्त हा मनुष्यधर्म आहे.** आमचीं पापें अजून लपलेलीं आहेत म्हणून ज्यांचीं उघडकीस आलीं त्यांची प्रमाणाबाहेर निंदा करणें हेंच खरें पतितत्व ! पतित ? जो हिंदु पतितपावनाच्या मंदिरांत पुनः शिरला तो पावन झालाच. तो माझ्या अितकाच रक्ताच्या बिंदूपर्यंत हिंदु झालाच !" पुरे अितकें जरी, हे प्रत्येक हिंदुमात्रा, तूं करशील तरी शुद्धीचें कार्य तुझ्यापुरतें तूं केलेंस असें होअील. याला पैसा नको, केवळ प्रेम हवें. बॉंब नकोत, 'मशीनगन्स' नकोत, सेना नको, कामगार नको, प्रयत्न नको, केवळ शुद्धीकृतास मी 'स्वीकारीन' अितकें म्हण कीं कार्य झालें.

आम्हांस अेका अत्यंत प्रामाणिक शुद्धीकृताचें पत्र आलें आहे त्यांत ते लिहितात, "संक्रांतीचा मला मिशनरींनीं हिंदुधर्मांत प्रविष्ठ झालों म्हणून राग न मानितां तिळगुळ धाडला. माझ्या मुलांस दहा दहा रुपयांचा खाअू धाडला. दर आठवड्यास माझी विचारपूस लांब लांबून ते करितात,

यांतील मर्म मी जाणून आहे. परन्तु ते त्यांच्या धर्माच्या ध्वजाखालीं आणण्यासाठीं जर परकीयांशीं इतकें गोड बोलतात, तर आमच्या हिंदु धर्माच्या ध्वजाखालीं आपण सर्व उभे असतां आमच्या स्वजनांनीं परस्पर तरी किती गोड बोललें पाहिजे ! पण ! मी आणि माझीं मुलें मार्गानें चाललों कीं, माझे हिंदु बंधु तिरस्कारानें हंसतात आणि आडवाटेनें निघून जातात. कोणाच्या ओटीवर आम्हांला अजून बसतां येत नाहीं. सणावारीं सुखाचा शब्ददेखील कोणी येअून विचारीत नाहीं. अितकें जरी आहे तरी मीसुद्धां हिंदु पूर्वजांच्या वास्तूंत येअून राहिलों आहे, या अेका आत्मिक समाधानापुढें मला हीं विपक्षाचीं प्रलोभनें आणि स्वपक्षाचा तिरस्कार यांचें कांहींच वाटत नाहीं. 'मी हिंदु आहे' या भावनेचें सुख मला उपभोगितां येतें हें मला पुरे आहे."

आतां शुद्धीकृतांच्या या सामाजिक यातना दूर करण्याचें सर्वस्वी तुमच्या अिच्छेवर, केवळ अिच्छेवरच अवलंबून नाहीं काय ? त्यांची विचारपूस करण्यास, सणावारीं आपल्या समाजांत त्यांस ममत्व वाटावें अशा रीतीनें त्यांस 'बसा' म्हणण्यास, संक्रांतीस चार तिळगुळाचे दाणे हातावर ठेवून "गोड बोला" म्हणून हंसतमुखानें त्यांस विनविण्यास तुमची कवडी तरी खर्च होणार आहे काय ? यांत अेक क्षणभरदेखील तुरुगांत अुभें राहण्याचें भय आहे काय ? नाहीं ! केवळ 'तुम्हांस आम्हीं स्वीकारलें' असें म्हणावयाचें कीं, लाखों शुद्धीकृत तुमचे झाले—जे कोटी कोटी अजून पतित आहेत ते "शुद्धीकृतांस तुम्ही स्वीकारतां" असें पाहतांच आपण होअून तुमच्यांत आलेच !

अितकें तरी केवळ तुमच्या हातांत आहेना ? यांत अिंग्रज आड येत नाहीं, दारिद्र्य आड येत नाहीं, मरणाचें भय आड येत नाहीं, फांशीं आड येत नाहीं, कांही नाहीं, तर नुसतें म्हण, 'मीं शिवेन—मीं स्वीकारीन.' हे हिंदुमात्रा ! तूं अेकेकटा जेथें असशील तेथें—अितरांची वाट न पाहतां म्हण कीं, मीं माझ्या कोटि कोटि अस्पृश्यांस शिवेन, मी शुद्धीकृतांस स्वीकारीन—कीं "अस्पृश्योद्धार आणि शुद्धि" हीं दोन्ही अत्यंत महत्वाचीं राष्ट्रकार्यें सिद्धीस गेलीं असें समज !

म्हण कीं, जो माझा हात मी कुत्र्याचे पाठीवर प्रेमानें फिरवितों तो माझा हात मी भ्रातृप्रेमानें माझ्या अस्पृश्य गणल्या गेलेल्या हिंदुधर्मीयांचें—माझ्या

रक्ताच्या, राष्ट्राच्या भावांचे पाठीवरून फिरवीन ! म्हण शिवेन ! कीं अस्पृश्यता मेली.

आणि निश्चय कर मी शुद्धीकृत हिंदूस ममत्वानें 'तूं माझा' म्हणून म्हणेन. म्हण स्वीकारीन ! कीं शुद्धि दृढमूल झालीच !

अितकें महाग कर्तव्य अितकें स्वस्त कधींहि झालें नव्हतें. म्हणून अितकें तरी कर. हें सर्वस्वी तुझ्या हातचें आहे ! म्हण–शिवेन ! नि स्वीकारीन !

श्रद्धानंद ३-२-२७

# संख्याबल, हेंहि बळच आहे ! !

**असाराणां हि वस्तूनां संहतिः कार्यसाधिका ।**
**तृणैराबध्यते रज्जुस्तेन नागोपि बद्ध्यते ॥**

हिंदु संघटनावर येन केन प्रकारेण कांहीं तरी आक्षेप काढून त्याला विरोध करण्याची चटक ज्या कांहीं लोकांना लागली आहे, त्यांपैकीं कांहींजण अस्पृश्यतानिवारण आणि शुद्धि या संघटनाच्या दोन महत्त्वाच्या अुपांगांवर अितर सर्व आक्षेपांचीं तोंडें बंद झालीं म्हणजे असा अेक मेणघुणा आक्षेप काढीत असतात कीं, "अहो अस्पृश्य बाटले आणि हिंदुसमाज कमी झाला किंवा पतितांना परावर्तित करण्याचें शुद्धिकार्य अंगीकृत न केल्यानें हिंदुसमाज वृद्धिंगत न झाला तरी काय बिघडलें ? नुसत्या संख्येंत काय आहे ? आपण जे थोडेबहुत अजून हिंदु आहोंत, त्यांचीच अुत्तम प्रकारची उन्नति करवूं म्हणजे झालें. मूठभर अिंग्रज आज जगावर राज्य करीत आहेत. तेव्हां संख्येंत खरें बळ नसून समाजांतील व्यक्तींच्या अंगांतील तेजादिक गुणांतच सर्व बळ आहे. म्हणून हिंदु समाजांतील लोक परधर्मांत जातात म्हणून निष्कारण आरडाओरड न करतां जातील ते सुखेनैव जाअूं द्यात आणि राहतील तेवढ्यांचीच उन्नति करीत रहा."

येथपर्यंत या आक्षेपकांची भाषा अेकरूप असते; परंतु यापुढें त्यांच्यांतील कांहीं लोक आपलीं तोंडें थोडींशीं फिरवून पुढें बोलूं लागतात. जे आक्षेपक 'जुनें तें सोनें' असें समजणारे जुन्या रूढीचे अंध अनुयायी असतात, ते म्हणतात 'अशा रीतीनें हिंदु समाजाची संख्या घटते या भयाचा बागुलबोवा निरर्थक ठरत असल्यानें आणि नुसत्या संख्येंत कांहीं अर्थ नसल्यानें तुम्ही अस्पृश्यतानिवारणाच्या आणि शुद्धीच्या नव्या रूढि पाडण्याचा खटाटोप सोडून द्या.' या लोकांच्या संख्येंत कांहीं अर्थ नाहीं, या सिद्धांतावरून काढिलेला अुपसिद्धांत निदान विसंगत तरी नसतो. परंतु या आक्षेपांत जे कांहीं लोक आयुष्यांत अितर सर्व प्रकरणीं रूढीस धाब्यावर बसावयास कमी करीत

नसतात अितकेंच नव्हे तर रामायण किंवा महाभारत हे अितिहासात्मक ग्रंथ नसून केवळ आध्यात्मिक रूपकें आहेत, शिवाजी, प्रताप अित्यादि आधुनिक राष्ट्रपुरुष तर काय पण राम कृष्ण यांनाहि–जर मी त्यांचे काळांत असतों तर ( आणि जरी त्या खरोखरच देहधारी व्यक्ती असतीलच तरीहि ) त्यांनाहि—तुम्हीं रावण, कंस, अफजुल अित्यादिकांची हत्या केलीत आणि शस्त्र धारण केलेंत ही गोष्ट हिंसात्मक आणि पापास्पद केलीत म्हणून दोष दिला असता, असें म्हणण्याइतके जुन्याचे आणि शास्त्रांचें आणि रूढीचे कट्टर विरोधक असतात ते, संख्येंत कांहीं अर्थ नाहीं या सिद्धांतावरून, अस्पृश्यतानिवारणा-विरुद्ध अेक अक्षरहि न बोलतां, केवळ शुद्धीविरुद्ध मात्र त्या आक्षेपाचा अुपयोग करितात आणि म्हणतात, 'अहो संख्येंत काय आहे ! जे हिंदु परधर्मांत गेले किंवा जात आहेत ते जाअीनात. त्यांना परत घेण्याची नसती उठाठेव करून परधर्मीय–आणि विशेषतः मुसलमान समाजाची मनें कां दुखवितां ? बाटवूं द्यात ना त्यांना हिंदूंस. त्यांच्या बाटविण्याच्या तडाख्यांतून जे आपण अुरलों आहोंत किंवा अुरूं, त्यांची शारीरिक, मानसिक, आत्मिक अित्यादि सर्व प्रकारची अुन्नति आपण केली कीं, पुरे ! नुसत्या संख्येंत काय आहे ? खरें बळ गुणांत आहे म्हणून सोडा ती शुद्धि आणि तें संघटन '

या आक्षेपकांतील वर वर्णिलेल्या दोन पोटजातीपैकीं जो पक्ष रूढीचा अंध अनुयायी असल्यानें अस्पृश्यता आणि शुद्धि या दोन्ही चळवळीविरुद्ध बोलतो, त्याचा तो आक्षेप कितीहि भ्रामक असला तरी निदान सुसंगत असतो. परंतु या दुसऱ्या पक्षाचा, संख्येच्या बळांत कांहीं अर्थ नाहीं, हा आक्षेप जेव्हां केवळ शुद्धीविरुद्धच आणण्यांत येतो आणि तोही विशेषतः मुसलमानांना हिंदु करून घेण्याविषयीं तीव्रतेनें पुढें आणण्यांत येतो तेव्हां तो केवळ भ्रामक असतो, अितकेंच नव्हे तर अगदीं मेणघुणा असतो. कारण या वर्गांतील लोक अस्पृश्यतानिवारणासाठीं अकांडतांडव करीत असतात. अितकेंच नव्हे तर त्यांच्यांतील कांहीं लोक अस्पृश्यांबरोबर प्रकटपणें अन्नपानादिक व्यवहारहि करतात. त्यांना सुधारणेचा बाअू वाटत नसतो. ते प्रचलित राजकारणांत मुरलेले असतात. मुसलमान, खिश्चन अितकेंच काय पण जगांतले प्रत्येक समाज आणि संस्कृति आपआपली संख्या वाढविण्याच्या खटपटींत आहेत हें त्यांस अवगत असतें. परंतु अितकें असूनहि ते जेव्हां केवळ शुद्धीविरुद्धच

काय तें ‘ संख्येंत काय आहे ’ म्हणून रडगाणें गाअूं लागतात, त्यांतहि मुसलमान चिडतात म्हणून ‘ शुद्धि सोडा ’ या ध्रुवपदाच्या ठेक्यावर जेव्हां तें रडगाणें गातात, तेव्हां त्यांचा तो आक्षेप जवळजवळ अप्रामाणिकच असतो. मुसलमानांस कसबसें आपल्या पक्षांत ओढून आणण्यासाठीं योजलेली ही अेक युक्ति असते. पण ती इतकी आत्मघातकी असते कीं, तिचे भयंकर परिणाम गेलीं सहा वर्षं हिंदुसमाजास भोगावे लागल्यानें त्याची अपरिमित हानी झालेली आहे. आणि तरीहि अजून जेव्हां “ नुसत्या संख्येंत काय आहे ” म्हणून हे लोक साळसूदपणें अुपदेशीत शुद्धीविरुद्ध लोकांचा बुद्धिभेद करण्याचें अमंगल कार्य करण्यास मागें पुढें पाहात नाहींत, तेव्हां त्यांच्या या कोटिक्रमाचा अेकदां पुरता समाचार घेअून टाकणें आतां अगदीं अवश्य झालें आहे.

संख्येंत काय आहे : सोडा ती शुद्धि : या आक्षेपास आम्हीं दर्शविलेल्या हिंदूंतील दोन वर्गांप्रमाणेंच हसननिझामीआदिकरून मुसलमानहि अुपदेश देत असतात. हें प्रथमतः ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. हसननिझामीआदि लबाड प्रचारक आपण स्वतः मुसलमानांची संख्या वाढविण्याचें काम अव्याहत आणि अनेक सुष्ट दुष्ट अुपायांनीं चालवीत असतां केवळ हिंदूंस मात्र जेव्हां शिष्टपणाचा आव घालून अुपदेश देतात कीं, “ हिंदूंनों, शुद्ध करून घेण्याच्या भानगडींत पडून आम्हां मुसलमानांचें व्यर्थ वैर कां संपादन करतां? तुम्ही अजूनहि बावीस कोटि आहांत! आहांत त्यांचीच अुन्नति आणि गुणवर्धन करा म्हणजे झालें. आणखी शुद्धीच्या झंजाटास कां मागें लावून घेतां? संख्येंत तें काय आहे?” तेव्हां या त्यांच्या मार्जारसाधुत्वांतील मर्म अिसापनीतींतल्या त्या कोंबडीसारख्या भाबड्या प्राण्याच्याहि ध्यानांत येण्यासारखें असतें. पण तरीहि तें ध्यानांत आलें नाहीं असें भासवून मुसलमानांच्या रोषास भिणारे आणि स्वकीयांच्याविरुद्ध जें तोंडास येअील तें बकणें म्हणजेच साधुपणा होय अशी घातक समजूत करून घेतलेले हिंदूंतीलच कांहीं लोक त्या विपक्षाच्या ढोंगी कोटिक्रमाचीच री ओढून हिंदूंस सांगतात, “ अरे, खरेंच संख्येंत काय आहे! आपलें गुणबळ वाढवा! ”

परंतु नुसत्या संख्येंत जर खरेंच कांहीं अेक नसेल तर मग हे थोर पुरुष हें आपलें नवाविष्कृत महान् तत्त्व प्रथमतः त्यांच्या आवडत्या मुसलमान

आणि ख्रिश्चन बंधूंस कां शिकवीत नाहींत? अेखाद्या वैद्यापाशीं अेखाद्या घातक रोगावर रामबाण औषध असेल तर तें औषध ज्यांस तो रोग झालेला नाहीं किंवा होतो आहे किंवा नाहीं याचें निदानहि निश्चित ठरलेलें नाहीं, त्याचे गळीं बळावळानें ओतीत बसण्यापेक्षां त्या वैद्यानें जे त्या रोगानें इतके पछाडले गेलेले आहेत कीं, त्यांस त्यांतून वाचविण्यासाठीं त्वरित कांहीं औषध न मिळालें तर त्या रोगास ते सर्वस्वी बळी पडण्याचें संकट ओढवणार हें निश्चितपणें दिसत आहे, त्यांचे घरीं प्रथम जाऊन त्यांस त्या मात्रेचे वळसे देणें हें अधिक भूतदयेचें आणि समयोचित कृत्य होईल नव्हे काय? हिंदूंच्या शुद्धीचें बिचारीचें काय: आठवड्यास कुठें दहा बारा लोक देखील साऱ्या हिंदुस्थानांत संख्याबळासाठीं शुद्ध केले जात नाहींत. हें लहानसें हिंदूंच्या डोळ्यांतील कुसळ आपल्या सूक्ष्म दृष्टीस दिसतें आणि तें काढण्यास आपण डोळ्यांचें विच्छेदन ( operation ) करण्यासाठीं हें तात्त्विक शल्य खुपसूं लागले आहांत हे आपले उपकार आहेतच. पण आमचें आपणांस सांगणें आहे कीं, त्या आमच्या मुसलमान बंधूंच्या आणि मिशनऱ्यांच्या डोळ्यांत तें संख्याबळ वाढविण्याच्या लालसेचें भलें मोठें मुसळ तें पाहा. तें कसें अगदीं कासाविस झालेले आहेत. तर त्यांस प्रथम त्या यातनेपासून मुक्त करण्याचा प्रयत्न आपल्यासारख्या भूतदयेच्या भोक्त्यांनीं करावा. आमच्या डोळयांत शिरलेल्या या शुद्धीच्या कुसळाची कळ आम्ही थोडा वेळ सोसूं. पण आमच्या मुसलमानादिक बंधूंच्या डोळ्यांतील त्या तंझीम आणि तबलिघ आणि मिशनांच्या बहालअेवढ्या मुसळांच्या कळेनें ते पहा अगदीं विव्हळ होत आहेत. लवकर उपाय न झाल्यास त्यांचे बुद्धीचे डोळे अगदीं धर्मांध होणारे आहेत—झालेच आहेत. तर अुपकारी गृहस्थ हो, प्रथम आपण आपली रामबाण औषधि घेऊन तिकडे धांवा आणि त्यांस सांगा कीं, 'वेड्यानो, संख्याबळ म्हणजे कांहीं खरें बळ नव्हे, गुणबळ हेंच खरें बळ आहे. सोडा ती तंझीम आणि बंद करा तीं मिशनें !' ते पहा गुजराथेंत आगाखानी मुसलमान हिंदूंना बाटवून आपलें संख्याबळ वाढविण्याच्या रोगानें अितके पछाडले आहेत कीं, हजारों, लाखों रुपये खर्चून हिंदु धर्मावर अवास्तव आणि दुष्ट आरोप करणारीं चोपडी सहस्रांनीं वांटीत आणि भाबड्या हिंदूंतील शेंकडों अर्भकांस मुसलमान करीत हिंडत आहेत. तें हसन निजामीचें जाळें पहा: वेश्यांकडून देखील नीच वासनांच्या साधनाचाहि अुपयोग करून हिंदूंस मुसलमान बनविण्यास कचरत नाहींत. त्या

सिंध बंगल्यांतील मुसलमानांच्या टोळ्या पहाः तरवारीनें, सुरीनें, बलात्कारानें हिंदु कुमारिका भ्रष्टवून हिंदु मुलें पळवून दर आठवड्यास केवढा अुत्पात करीत आहेत. न्यायालयेंदेखील त्यांस शिक्षा देअून थकत आलीं. तीं दिल्लीचीं मुसलमानी परिषदांतील भाषणें आणि ठराव पहाः महमदअलीपासून तों गांवगुंडापर्यंत प्रत्येक मुसलमानानें निदान दहा बारा हिंदूंना तरी बाटविलेंच पाहिजे, म्हणून अक्रोश करीत आहेत—कारण मुसलमानांची संख्या हिंदुस्थानांत हिंदूंहून अधिक केली पाहिजे ! दोन वर्षांत सात कोटि मुसलमानांचे पंधरा कोटि करूं, पंधराचे सत्रा कोटि करूं, सत्राचे वीस कोटि करूं म्हणजे अधिक अधिकार–हिंदुस्थानचें स्वामित्व–राज्यच आपल्या मुल्मानी हातांत येअील ! ही स्पष्ट भाषा, या स्पष्ट प्रतिज्ञा, चालल्या आहेत ! हीं मिशनें पहा– मुंबअी कलकत्त्यासारख्या मोठमोठ्या नगरांपासून तों आसाम, छोटा नागपूर येथल्या जंगलापर्यंत हिंदूंना खिश्चन करण्याचा आणि खिश्चनांची संख्या या वर्षीं अितकी वाढली म्हणून अिंग्लंड अमेरिकेंत अुत्सव करण्याचा त्यांचा धूम धडाका चालला आहे. **प्रत्येक वर्षीं कमींत कमी दहा लाख लोक खिश्चन समाज खाअून पचवून सारखा वृद्धिंगत होत आहे.** आणि ते दहा लाख काय सद्गुणाचे अगदीं मूर्तिमंत पुतळे तेवढेच निवडून त्यांस आपल्या समाजांत ते अंतर्भूत करून घेतात कीं काय ? छट् ! दुष्काळांतील मरणाचें दारीं बसलेल्या बायाबापड्यांपासून तों दहा दहादां शिक्षा आणि सश्रम कारावास भोगून ज्यांच्या पायांस चोरीसाठीं पडलेल्या बेड्यांचे घट्टे पडले आहेत अशा सज्जनांपर्यंत जो हातीं सांपडेल त्या हिंदूस धर, कीं कर खिश्चन, असा सपाटा त्यांचा चालला आहे.

हें काय आपणांस दिसत नाहीं ? हिंदूंच्या डोळ्यांतील आठवड्याकांठीं दहा पांच परधर्मीय लोकांस शुद्ध करून घेण्याचें हें शुद्धिचें लहानसें कुसळ ज्या आपल्या दृष्टीच्या टापूंत धूमकेतूसारखें विस्तार पावून दिसूं शकतें, त्या तुमच्या दृष्टीस हें मुसलमानांच्या आणि मिशनरींच्या संख्या वाढविणाऱ्या अट्टहासाचें डोंगराअेवढें मुसळ दिसत नाहीं, असें होणें शक्य नाहीं. मग आपण त्यांच्या तबलीघ परिषदांतून आणि मिशन हॉलमधून जाअून कां व्याख्यानें देत नाहीं कीं 'संख्याबळ तुच्छ आहे, वेड्यांनो ! तुम्ही नुसती संख्या कशास वाढवितां ! येअूं द्या हिंदूंना तुमच्यांतले लोक शुद्ध करून. तुमची संख्या कमी झाली तर

अुरतील त्यांचें गुणबळ वाढविण्याचें कार्य तुम्हांस अधिकच आटोपसर आणि सुखावह होअील !'

हे जिना पहा, ते अबदुल रहीम पहा, ते गझनवी पहा, हा कारागृहांतून चोरीच्या दहा शिक्षा भोगून अकरावी चोरी करण्याची संधि साधितां येअीतों खिलाफतचा स्वयंसेवक होअून भटकणारा गांवगुंड पहा—जो तो मुसलमान, " संख्या ! संख्या !" म्हणून गर्जत आहे. आमची संख्या अधिक आहे म्हणून पंजाबांत वा बंगाल्यांत आम्हांस हक्काच्या अधिक जागा द्या ! आमची संख्या कमी आहे म्हणून मुंबअी, मद्रासकडे विशिष्ट हितसंरक्षणार्थ अधिक जागा द्या ! गांवांत आमची संख्या अितकी म्हणून लोकलबोर्डात जागा द्या, नगरांत अितकी संख्या आहे म्हणून नगरसंस्थेंत, अिलाख्यांत संख्या अितकी म्हणून विधिमंडळांत अधिक जागा द्या. गव्हरनराच्या जागेपासून तों पट्टेवाल्यापर्यंत आमची संख्या अितकी, म्हणून अितक्या आमच्या जागा राखून ठेवा ! म्हणून जिकडे तिकडे मुसलमानी तोंडांतून, डोक्यांतून, मनांतून " संख्या ! संख्या वाढवा ! संख्या ! " असा अेकसारखा चाललेला गडगडाट आपल्या, शुद्धीची बारीक पिपाणी अैकूं येअील अितक्या सूक्ष्म तंतूनीं गोठलेल्या कानांस अैकूं येत नाहीं का ? मग त्यांस आपण जाअून आपलें हें अमोलिक तत्त्व कां उपदेशीत नाहीं ? मुसलमान माझे बंधु आहेत, ख्रिश्चन माझे स्नेही आहेत म्हणून म्हणणाऱ्या भूतदये ! संख्याबळाच्या वेडानें पिसाळून गेलेल्या या भूतांकडे तुझ्या कृपेचा फेरा थोडा कां वळवीत नाहींस ? प्रत्यहीं संख्याबळाचे नांवावर हिंदूंचीं मुलें आणि कुमारिका त्यांच्यांतील गुंडांकडून पळवून नेल्याच्या बातम्या प्रत्येक पत्रांत आणि खटले कित्येक न्यायालयांत येत असतां तुझ्या पत्रांतून किंवा तोंडांतून त्याचा अुल्लेख देखील होत नाहीं हें कसें ? हिंदूवरच्च तुझी अेवढी कृपा कां ! थोडी दया कर आणि हिंदूंच्या बोकांडींच्च असें येतां जातां न बसतां, त्या संख्याबळाच्या वेडानें जर्जर झालेल्या तंझीम—तबलीघकडे आपला थोडा कटाक्ष टाक ! हे वैद्यराज, कृपा करून आमचा आपणांस थोडासा विसर पडूं द्या !

नुसत्या संख्याबळांत काय आहे, असें म्हणणाऱ्या धूर्तांना अेकदां खडसावून सांगणें भाग आहे कीं, तुमच्या म्हणण्याप्रमाणें शुद्धि ही नुसत्या संख्याबळाचे वाढीसाठीं आहे असें गृहीत धरलें तरीहि ती अवश्यच्च आहे.

कारण संख्याबळ हेंहि बळच आहे. प्रथमतः हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, जर समाज असेल तरच त्याच्यांत गुणबळ वाढविण्याचा प्रश्न उद्भवतो. परधर्मीयांच्या सहस्र वर्षें चालत आलेल्या आणि प्रतिकार न केला तर आणखी अनेक वर्षें चालू पाहणाऱ्या प्रबळ दंडेलीनें अेकेक करून सर्व हिंदु परधर्मांत लुटून नेले गेले, तर मग गुणबळ वाढविणार तरी कोणामध्यें? गुणाला अधिष्ठानच जर नाहींसें झालें; जर हिंदु समाजच अुरला नाहीं, तर अुन्नति तरी कोणाची करावयाची? जे अुरतील त्यांची म्हणाल, तर अुरले आहेत तेंहि गेले, त्यांच्याप्रमाणेंच–प्रतिकार न केला तर–नष्ट किंवा भ्रष्ट होअून जाणार. दुसरें कारण असें आहे कीं, कोणत्याहि व्यक्तीच्या किंवा समाजाच्या गुणाबळाच्या वाढीला मर्यादा आहे. मुंगीला शारीरिक आणि मानसिक वाटेल तितका खुराक चारला, तरी ती हत्ती होअूं शकणार नाहीं. गवताची काडी कितीहि खत घातलें तरी गवताची काडीच राहणार. तिला जर हत्तीला बांधावयाचें असेल तर गुणवर्धनाची मर्यादा संपूनहि जें बळ तिला संपादन करणें गुणवर्धनाच्या नैसर्गिक कक्षेच्या बाहेर असल्यानें अशक्य होतें, तें संख्याबळानें पुरें करून घ्यावें लागतें. गवताची काडी जरी काडीच राहिली तरी तशा अनेक काड्या, काथ्याचीं अनेक तुसें आणि दोऱ्यांचीं जुडगीं अेकत्र करून म्हणजे त्यांचें संख्याबळ वाढवूनच, त्याचा अेक संघटित नाडा किंवा दोरखंड बनवितां येतो आणि तो मात्र हत्तीला बांधूं शकतो. भाताचें अेकच रोपटें लावून त्याचें गुणवर्धन करण्याकरितां किती जरी प्रयत्न केला तरी त्याचेपासून अेका कुटुंबाचें तर राहोच पण अेका मनुष्याचें पोट भरण्याअितके दाणे उत्पन्न होणें दुर्घट आहे. पण तशीं अनेक रोपटीं लावून शेती केली तर तत्काल खंडीभर भात उत्पन्न करतां येतें त्यांच्या संख्याबळाचे वर्धनानेंच उदरपोषणाची कामगिरी त्यांचेकडून करून घेतां येते. जर अेखादे सज्जन गृहस्थ म्हणाले कीं, 'अरे, पोतीं भरभरून तांदूळ अेकत्र करण्याच्या खटपटींत कां पडतोस? खुळा आहेस. संख्याबळ तुच्छ आहे. हा अेक तांदुळाचा दाणा मी घेतों, त्याचे गुणवर्धनाकडे लक्ष पुरवितों आणि त्याचा तपेलीभर भात करून तुला देतों, थांब–नेअूं देत ते बाकीचे पोतीं पोतीं दाणे चोरांना. नाहींतर ते चोर रागावतील' तर त्याचे ते गुणवर्धनाचे प्रयोग यशस्वी होअून त्या तांदुळाच्या अेका दाण्याचा तपेलीभर भात होणें जितकें दुर्घट आहे, तितकेंच वाटवूं द्यात जे बाटविले जातील त्यांना, आपण आपले जे अुरत

राहतील त्यांच्या गुणवर्धनाकडेच सर्व लक्ष देऊं असें म्हणणाऱ्यांचें हें तत्त्वज्ञानहि पोंचट आणि वेडसर आहे.

आणि म्हणूनच मोठमोठ्या दसहत्यारी अवतारांनासुद्धां संख्याबळाचा पाठिंबा घेतल्यावांचून आपल्या विपक्षीय समाजाशीं टक्कर देतां आली नाहीं. एवढे अेकबाणी, अवतारी रामचंद्र; पण वानरांचें संख्यादळ त्यांस पाठीशीं घ्यावें लागलें तेव्हां लंकेवर स्वारी करतां आली. वानरांसारख्या असंस्कृत योनींतील प्राण्यांचेहि पाठबळ त्यांना घ्यावें लागलें—ते स्वतः अवतारी असून ! नुसतें गुणबळ संख्याबळावांचून अितकें पगु आहे. रावण तरी शरीरगुणवर्धनाची पराकाष्ठा होता. वीस हात आणि दहा शिरें ! पण हजारों राक्षसांचे संख्याबळावांचून लंका त्यास लढवितां आली अितके दिवस देखील लढवितां आली नसती. सुदर्शनधारी कृष्ण-पण अेकट्यांना महाभारत लढवितां आलें नाहीं. सव्यासाची अर्जुनापासून तों राक्षसी घटोत्कचापर्यंत शेंकडों जणांचें आणि लक्षावधि सैनिकांचें संख्याबळ अेकत्र करावें लागलें. गुणोत्कर्ष पावलेल्या श्रीकृष्णासारख्या विभूतींनाहि संख्याबळाची अगदींच अुपेक्षा करविली नाहीं. तो महंमद पैगंबर पहा, मक्केंत अेकटा होता तरी तो पैगंबरच होता. पण संख्याबळापुढें अितका दीन होता कीं, निमाज चोरून पढावा लागे. पण दास, दरिद्री, जे गुणी अवगुणी मिळतील ते अनुयायी जुळवीत जेव्हां तो मदिनेचें संख्याबळ पाठीशीं घेअूं शकला, तेव्हां मक्केंत प्रकट निमाज पढूं शकला. त्यासहि संख्याबळाची जाणीव होती म्हणूनच वाटेल त्या आमिषानें मुसलमान समाजाचें संख्याबळ वाढण्यासाठीं तो त्यांचें गुणबळ वाढविण्याअितकाच झटला. मुसलमानी अितिहास तर संख्याबळाच्या लालसेच्या लाल शाअींतच लिहिलेला आहे. आफ्रिकेंत कोणताहि भाग जिंकिला गेला कीं, मुसलमान विजेता जी खंडणी मागे ती अर्धे पैसे आणि अर्ध्या त्या जित जातींच्या बायका घेअून वसूल करण्यांत येअी. कारण त्या बायकांत मोजून घेतलेल्या खंडणीची लूट त्या मुसलमानी सेनेच्या शिपायांत वाटली जाअून तीपासून मुसलमानी संतति वाढे—संख्याबळ वाढे. चोर, पोर अशांनाहि बलात्कारानें वा लालचीनें जें अजून मुसलमान वा खिश्चन करून घेण्यांत येतें, तें कांहीं तत्काल त्या व्यक्तीचें गुणवर्धन करण्यासाठीं किंवा तशा नीच माणसांस समाजांत घेतल्यानें समाजाचें गुणवर्धन होतें म्हणून नव्हे; तर मुख्यतः संख्यावर्धन होतें म्हणूनच होय.

आणि आज जें त्यांचें कोटि कोटि अनुयायी, जिथें त्यांचा अेकहि अनुयायी दिसत नव्हता तिथें दिसत आहेत आणि डोअीजड झालेले आहेत, ते त्यांच्या संख्यावर्धनाकडेहि पूर्ण लक्ष देणाऱ्या धोरणामुळेंच होत हें कोण नाकारूं शकेल ? जर हें संख्याबळ वाढविण्याचें चढाअू धोरण न स्वीकारिता, तर महंमद पैगंबर मरेतों अेकटा महंमदच राहिला असता. आज वीस कोटि मुसलमान जे जगभर विखुरले आहेत ते क्वचितच दिसले असते. गेल्या महायुद्धांत जर्मन लोक काय सैनिकगुणबळांत अीतर विपक्षीय राष्ट्राहून कमी होते ? शास्त्र, शस्त्र, आणि शूरता यांत व्यक्तिशः वा समजशः ते कांकणभर अधिकच होतें. पण त्यांच्यावर जी त्यांच्या विपक्षानें कुरघोडी केली ती मुख्यतः संख्याबळानेंच नव्हती काय ? अमेरिका युद्धांत पडल्यानें संयुक्तराष्ट्राचें संख्याबळ अेकाअेकीं जर्मनीच्या अेकाकी संख्याबळापेक्षां अवांक्याबाहेर अधिकता पावलें हेंच त्या पराजयाचें अेक प्रमुख कारण आहे. अशी धडधडीत वस्तुस्थिति दिसत असतां आणि विपक्षीय लोक संख्याबळ वाढविण्याचे आटोकाट यत्न करीत असतां हिंदूंस तेवढें सांगणें कीं, “संख्येंत काय आहे ! घाटूं द्या ! लुटूं द्या ! तुम्हीं आपले जे अुरतील त्यांचें गुणबळ वाढवा म्हणजे झालें !” ही आत्मवंचनेची पराकाष्ठा नव्हे काय ? पाळण्यापाशीं आजीबाअी सांगतात त्या गोष्टींतील तो विशाल राक्षस—अेकेका मुठींत दहा दहा माणसें धरणारा !—त्या राक्षसावर विश्वास ठेवणाऱ्या अल्लड मुलालादेखील हें कळतें कीं तो राक्षस मुठींत सर्व कांहीं मावणार नाहीं आणि त्याचा समाचार घेण्यास कांहीं तरी अुरूंच !—पण संख्याबळाच्या महत्त्वाची ही अितकी साधी गोष्टदेखील या प्रतिष्ठित आणि सुज्ञ अल्लडांस कळूं नये ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे ? किंवा आश्चार्याचीहि नाहीं. मुसलमानांस संतुष्ट ठेवावयाचें तर शुद्धीविरुद्ध कांहीं तरी बोललेंच पाहिजे. शुद्धीविरुद्ध न्याय्य अधिकाराच्या दृष्टीनें तर आतां कांहींच बोलणें शक्य नाहीं. तेव्हां या पुष्पित वाचेनें तरी तिचा निषेध केला गेला तर पहावें म्हणून हीं असलीं धडधडीत मेणघुणीं विधानें केलीं जातात कीं, हिंदूंनो जाअूं द्या ती शुद्धी ! हें पहा, संख्येंत काय आहे ! कोटि कोटि बाटले तर बाटूं द्यात. आपण आपले मूठभर जे राहूं तेच गुणबळानें वाढून वाढून वाढून—**जणुं काय तोंवर इतर लोक गुणबळांत कमी कमीच होत जाणार आहेत !** तेहि गुणबळांत वाढतच जाणार आणि समान गुणांची झोंबीं जुंपली म्हणजे अखेर संख्याब-

ळाच्या प्रश्नावरच मुख्यत्वेंकरून राष्ट्राच्या **नि समाजाच्या जीवनमरणाचा प्रश्न अवलंबून राहणार.**

परंतु त्यांतहि जर कोणी असें म्हणत असता कीं, आम्हांस नुसतें संख्याबळच वाढवावयाचें आहे तर एक वेळ हें उत्तर शोभतें कीं, आम्हांस नुसत्या संख्याबळानें सर्वत्र काम भागणार नाहीं. गुणबळाकडेहि दृष्टि दिलीच पाहिजे. परंतु शुद्धीची चळवळ किंवा अस्पृश्यतानिवारणाची खटपट ही केवळ संख्याबळाचे वर्धनासाठींच चाललेली आहे हें या आक्षेपकांस कोणीं सांगितलें ?

## संख्याबळच तेवढें आम्हांस पाहिजे आहे आणि गुणबळ नको आहे हें तुम्हांस कोणीं सांगितलें ?

गुणबळानें बरीच श्रेष्ठ अशी एक शंभर लोकांची टोळी घेतली, ज्यांत प्रत्येक मनुष्य श्रीकृष्णासारखा चतुर आणि भीमासारखा बलवान् आहे असें गृहीत धरलें, तरीहि जर त्यांच्यावर या गुणबळांत व्यक्तिशः पुष्कळ कमी असणाऱ्या एक हजार लोकांची टोळी तुटून पडली तर त्यांचा फन्ना उडाल्यावांचून राहणार नाहीं. टोळ, मनुष्यापेक्षां गुणबळांत किती कनिष्ठ—यःकश्चित् कीट. परंतु जेव्हां तशा, असाराणाम् हि वस्तूनां संहतिः—त्या टोळांच्या अगणित, संख्येची संहत धाड मनुष्यांवर पडते तेव्हां गांवेंच्या गावें आणि प्रांतचे प्रांत ओसाड करून निघून जाते. शिवाजी, रामदास गुणबळाचे—दैवी गुणबळाचे पुतळे होते—पण अफजुल्लापासून तों औरंगजेबाच्या सेनेपर्यंत त्यांस अेकट्यांस कांहीं तोंड देववलें नाहीं. पुंडपाळेगारापर्यंत हजारों साधारण माणसांचें संख्याबळ अेकत्र करूनच तें कार्य संपादावें लागलें. ही धडधडीत दिसणारी गोष्ट डोळ्याआड करण्याची अेकच चलाखी, हे शुद्धिसंघटनावरील बकवादी आक्षेपक करीत नाहींत, तर त्यांच्या "संख्याबळांत काय आहे, गुणबळ वाढवा" या कावेबाज किंवा भाबड्या अुपदेशांत आणखी अेक हेत्वाभास भरलेला असतो. तो हा कीं, संघटनाच्या पुरस्कर्त्यांना गुणबळ जणुं काय नकोच आहे; केवळ संख्याबळ वाढविण्याच्या मागें लागूनच त्यांची खटपट चाललेली आहे ! पण आक्षेपकांत जे कोणी ही गोष्ट खरीच आहे असें मानण्याअितके भोळे असतील त्यांस आम्हीं आश्वासन देतों कीं, संघटनाच्या चळवळीचें प्रमुखांतील प्रमुख ध्येय म्हणजे वैय्यक्तिक आणि

राष्ट्रीय गुणबळ वाढविणें हेंच आहे. आम्हांस आपल्या हिंदु राष्ट्राचें संख्याबळ तर वाढवावयाचें आहेच पण आम्हांस त्यांचें राष्ट्रीय गुणबळहि वाढविणें आहे.

'संघटन' हा शब्द गुणबळवाचक नाहीं काय? राष्ट्रीय गुणांत श्रेष्ठांतील श्रेष्ठ प्रवृत्तींत संघटनाची गणना केलीच पाहिजे. ज्या हिंदूंत हिंदुत्व भावनेनें स्वराष्ट्रभावनेनें प्रेरित झालेलें संघटन होत आहे त्यांचें राष्ट्रीय गुणबळ वाढत आहे. दुसरी गोष्ट अस्पृश्योद्धाराची घ्या. नुसतें संख्याबळ वाढवावें म्हणून कांहीं अस्पृश्यतानिवारण चाललेलें नाहीं. त्याचें कार्य तुमच्या डोळ्यासमोर आहे. बेळगांवच्या राष्ट्रीय सभेंत अस्पृश्यतानिवारण केलें पाहिजे म्हणून ठराव झाला. परंतु त्यांतील हजारों लोकांतील कितींनीं त्याप्रमाणें अस्पृश्यता सोडली? खादींत मढलेल्या लोकांचा विरोध, जेंव्हां प्रत्यक्ष अस्पृश्यांत मिसळण्याचा प्रसंग येअी तेव्हां, मुकटा नेसलेल्या सोंवळ्या भिक्षुकांहून कमी तीव्र नव्हता हें प्रत्येक अस्पृश्यतानिवारकास माहीत आहे. पण तीच चळवळ हिंदुसंघटनाचे पुरस्कर्त्यांनीं हातीं घेतांच केवढा फरक झाला हें पहा. अनेक ठिकाणीं संघटनाच्या वतीनें अस्पृश्यांच्या शाळा चालल्या आहेत; त्यांचीं महारवाड्यांत जाअून भजनें होत आहेत; त्यांच्यावर होणाऱ्या जमीनदारांदिकांच्या छळापासून त्यांची सुटका करण्यासाठीं न्यायालयांत त्याची दाद फुकट लावून दिली जात आहे; त्यांच्यासाठीं प्रशस्त भूमि खरेदी करून सुंदर झोंपड्या बांधून प्रत्येकींत आरोग्य आणि स्वच्छतावर्धक साधनें ठेवून त्यांच्या स्वतंत्र वसाहती वसविण्यांत येत आहेत. दुष्ट आहारापासून त्यांस निवृत्त करण्यांत येत आहे. सार्वजनिक सभांतून, नगरसंस्थांतून त्यांचा प्रवेश करवून दिल्यानें त्यांच्या राष्ट्रीय भावनेचा आणि अनुभवाचा विकास होत आहे. त्यांच्या हक्कांच्या स्थापनेसाठीं जुटीनें सत्याग्रह केले जात आहेत. या सर्व चळवळी जीं हिंदुसंघटनाची पुरस्कर्तीं माणसें करीत आहेत, तीं काय त्या अस्पृश्यांचें गुणबळ वाढवीत नाहींत? नगरेंचीं नगरें आणि गावेंचीं गांवें आज वरील चळवळी प्रत्यक्ष आचरणांत आणून अस्पृश्यांचे पूर्ण स्पृश्य करून सोडीत आहेत. आणि त्या त्या मानानें शिक्षणाच्या, स्वाभिमानाच्या, राष्ट्रीय भावनेच्या, स्वच्छतेच्या, आरोग्याच्या, संघटितपणाच्या गुणांचा विकास त्या पूर्वास्पृश्यांत होत आहे. तीच स्थिती हिंदु संघटनानें हातीं घेतलेल्या शारीरिक बळाच्या प्रयत्नांची होय. ही हिंदु जागृति झाल्यापासून ठिकठिकाणीं नव्या व्यायाम शाळा उघ-

डल्या जात आहेत. आणि हजारांनीं विद्यार्थी त्यांत सांघिक आणि सैनिक शिक्षण घेत आहेत. ही काय शारीरिक गुणबळाची वाढ नव्हे? तीच स्थिति स्पृश्य वर्गाच्या अंतःसुधारणेची. बालविवाह बंद करावयास हिंदु संघटन झटतें; जातीजातींतील मूर्ख मत्सर आणि भेदभाव दूर करून हिंदुमात्र तितका अेकतेच्या राष्ट्रीय भावनेनें अुत्स्फूर्त करण्यास झटतें; गीताजयंति, शिवजयंति अित्यादि साजरे करून राष्ट्रीय वृत्ति आणि थोरपण हिंदु जनतेंत संचरवितें; देवालय सुधाराची चळवळ करतें; कुंभमेळे आणि अितर यात्रोत्सव यांत सुव्यवस्था ठेवून मोठमोठ्या विद्वानां-कडून धर्माचें, तेजाचें, अितिहासांचें शिक्षण लाखों लोकांत प्रसृत करतें—हे सर्व काम हिंदु राष्ट्रांत गुणबळ वाढविण्यासाठींच करण्यांत येत नाहीं काय ? शुद्धीची चळवळ म्हणजे तर संख्याबळ आणि गुणबळ हिंदु समाजांत अेकसमयावच्छेदेंकरून वृद्धिंगत करणारी परमौषधि होय. जेव्हां परधर्मात केवळ हिंदुसमाजाच्या कूपमंडूकवृत्तीनें, अहिंदूच्या बलात्कारानें राहिलेला अेक मनुष्य परत हिंदुसमाजांत स्थापित करण्यांत येतो, तेव्हां त्या अेका झटक्या-सरशीं हिंदुसमाजांतील अनेक दुर्गुणांवर अेकसहा आघात करण्यांत येतो आणि त्या मानानें तितकें गुणबळ वाढतें. शुद्धीकृत मनुष्यांत त्या संस्कारानेंच हिंदु पूर्वजांविषयीं, हिंदुस्थान देशाविषयीं, हिंदु संस्कृतीविषयीं ममत्वबुद्धि आणि पूज्यबुद्धि अुत्पन्न होते, हा त्याचा राष्ट्रीय गुणविकास होतो. हिंदु समाजांतील पूर्वीची कूपमंडूकवृत्ति त्या मानानें नष्ट होते अतिरेकी जातिभेदाचीं बंधनें त्या मानानें सैल होतात, हिंदुमात्र तितका आपला बंधु आहे ही भावना अुदय पावते, जुन्या रूढींचे पाश राष्ट्राला घातक होअूं लागतांच ते तोडून टाकणारें धैर्य अुत्पन्न होते, अुभ्या समाजांत खळबळ सुरू होअून प्रस्तुतच्या जातीय संकटाची माहिती आणि जाणीव अुत्पन्न होते—मागचें आणि आतांचे यांची तुलना करण्याची ' विलक्षण बुद्धि जागृत होते हिंदु-त्वाचे रक्षणार्थ लढण्याची वीरवृत्ति वाढते. त्या प्रत्येक परिणामानें हिंदु समाजांतील अनेक दुर्गुणांचा अस्त होण्यास आणि राष्ट्रीय गुणांचा विकास होण्यास अमोलिक साहाय्य होत असतें. गांवांत किंवा नगरांत अेकादां नवीन शुद्धिसमारंभ झाल्याबरोबर जी खळबळ अुडते ती ज्यांनीं पाहिली असेल, त्यांना हें तत्काळ पटेल कीं, राजकारणाच्या दहा सभांनीं समाजांतील वरच्या थरांतहि जी चळवळ आणि राष्ट्रीय जागृति अुत्पन्न होत नाहीं, ती अेका शुद्धिसमारंभानें अुत्पन्न होअून शेवटच्या थरापर्यंत कुळवाडी, कुणबी, महार-

मांगापर्यंत सामाजिक भावनेचा धक्का पोंचविला जात असतो. हें सर्व राष्ट्रीय गुणवर्धनाचें कार्यच नव्हे काय ? हिंदुसंघटना अनाथालय काढतें; त्यांत आजपर्यंत जीं दुर्दैवी अर्भकें मृत्यूच्या जबड्यांत जन्मतःच ढकललीं गेलीं असती किंवा भूकभूक करीत भटकत फिरलीं असतीं, त्यांचीं शारीरिक, सैनिक मानसिक आणि आत्मिक जोपासना केली जाते. त्यांस शिक्षण देण्यांत येतें. हिंदुत्वाच्या आमच्या अभिमानाची जाणीव त्यांच्यांत उत्पन्न केली जाते हें सर्व हिंदु समाजाचें गुणबळ वाढविण्यास कारणीभूत होते कीं घालविण्यास ? अशा अनेक राष्ट्रीय गुणवर्धक चळवळी ज्या हिंदु संघटनाच्या पुरस्कर्त्यांनीं चालविलेल्या आहेत आणि परदेशगमनापासून तों शुद्धीपर्यंत ज्या शेकडों सुधारणा त्यांनीं हिंदुसमाजांत आज नुसत्या ठराव करून नव्हे, तर प्रत्यक्ष आचारांत आणून प्रसृत केलेल्या आहेत, त्या त्यास हिंदु राष्ट्राचें गुणबळ हेंहि वाढविलें पाहिजे हें कळतें आहे म्हणूनच होय. त्यास ती गोष्ट शिकविण्यासाठीं कोणा अर्धवट गुरूची आवश्यकता नाहीं.

आम्हांस गुणबळ तर हवेंच आहे. पण आम्हांस संख्याबळहि हवें आहे. आमचें हिन्दु राष्ट्र आम्हीं संख्येनेंहि घटूं देणार नाहीं; गुणानेंहि घटूं देणार नाहीं. अस्पृश्यतानिवारण आणि शुद्धि या दुहेरी साधनांनीं आम्हीं आमचें संख्याबळहि वाढवूं आणि गुणबळहि वाढवूं. आणि केवळ गुणबळ पंगु आहे, केवळ संख्याबळ अंध आहे, हें सामाजिक सत्य तुमच्यापेक्षां आम्हांस पक्केपणीं कळलें आहे, " नुसत्या संख्याबळांत काय आहे " हें शहाणपण आम्हांस शिकविण्याची तसदी आपण घेऊं नये. अगदीं रहावतच नसेल तर तें शहाणपण मुसलमानादिक आपल्या भाईबंदांना जुम्मा–मशिदींत जाऊन शिकवा. त्यांस त्याची खरोखर फार आवश्यकता आहे. अर्थातच जुम्मा मशिदीची पायरी, हें शहाणपण शिकविण्यासाठीं, चढण्याचें तुम्हांस धैर्य होत असेल तर !!!

—श्रद्धानंद १७–२–२७

म. ग्रं. सं. गां.

# प्रत्याघाताचें धैर्य हिंदूंत नाहीं असें समजूं नका !

नाहीं! हिंदुधर्म क्लैब्याची गाथा नाहीं. हिंदुधर्म निःसंशय सात्त्विक क्षमाशील आहे. हिंदुधर्म निःसंशय क्रोधशील आहे. 'क्लैब्यं मा स्म गमः पार्थ' ही हिंदुधर्माची गर्जना आहे. 'अहिंसा परमो धर्मः' ही ज्या हिंदुधर्माची व्याख्या आहे त्याच हिंदुधर्माची अगत्याची व तेजस्वी आज्ञा आहे कीं, "आततायिनमायान्तं हन्यादेवविचारयन्" आणि या दोन्ही आज्ञांचा समन्वय हिंदुधर्मच अुत्तमप्रकारें लावूं शकतो. हिंसेच्या आणि अहिंसेच्या अर्थांचा आजकालच्या गांधीजीसारख्या अर्धवट आचार्यांनीं जो गोंधळ माजविला आहे, त्यामुळें तीं वचनें परस्पर विरोधी दिसोत; परंतु हिंदुधर्माचे मर्मज्ञ आचार्य, पूर्वीपासून या शब्दाचा जो अर्थ करीत आले तो ध्यानांत धरिला असतां, 'तस्मादुत्तिष्ठ कौंतेय, युद्धाय कृतनिश्चयः' हें गर्जत आपले सुदर्शन अुंच अुभविणारा कंसकंदन कृष्ण आणि त्याची ती गीता अशीं दोन्ही हिंदुधर्माचीं आणि राष्ट्राचीं प्रमुखतम आराध्य दैवतें कां झालीं हे सर्वांचे ध्यानांत येण्यासारखें आहे.

प्रस्तुत इतकेंच सांगणें पुरे आहे कीं, रावणाला वधून श्रीराम विजयी झाले असतां सीतादेवी जेव्हां त्यांचेकडे परत आली तेव्हां लोकरीतीप्रमाणें तिला स्वीकारावें कीं स्वीकारूं नये, अशा विपण्ण शंकेनें ग्रस्त होअून रामचंद्र म्हणाले होते, "सीते तूं परत जा, तुझ्या प्राप्तीसाठीं मी रावण मारिला नाहीं; तर रावणानें रघुकुलाचा जो घोर अुपमर्द केला त्याचा सूड अुगविण्यासाठीं मारिला! सर्प जो डसतो तो सीते, रक्त पिण्यासाठीं डसत नाहीं, तर पुच्छाघाताचे वैर अुगविण्यासाठीं होय!" हें सांगणाऱ्या श्रीरामास हिंदुधर्म आदर्शपुरुष म्हणून पूजित असतो.

आणि ज्या युधिष्ठिराचें अुदाहरण गांधीजींनीं आपल्या नेहमींच्या गोंधळ्या प्रवृत्तीनें हिंदु लोकांस या वेळेस अुदाहरणीय म्हणून अुपमान योजिलें आहे, त्या युधिष्ठिरानेंच तर अठरा दिवस महाभारत लढविलें! अर्जुनाला कर्ण मारावयाला

अुशीर झाला, तेव्हां हा 'क्षमेचा पुतळा' संतापानें लाल होअून त्याच्या पौरुषास धिक्कारिता झाला ! त्याचें नांवच 'क्षमास्थिर' नसून 'युधिष्ठिर' आहे–म्हणजे क्षमेच्या भागूबाई व्याख्येनें विचलित न होतां युद्धामध्यें स्थिर राहाणारा ! त्या युधिष्ठिराची अुपमा गांधीजींच्या लेखांत दिली आहे !–हें सिद्ध करण्यासाठीं कीं, हिंदु लोकांना 'आत्यंतिक क्षमा' हाच धर्म आहे ! आत्यंतिक क्षमेचा पुतळा म्हणून युधिष्ठिराचें अुपमान अशा प्रसंगीं हिंदु लोकांपुढें ठेवणें म्हणजे स्वतःच्या वाक्याविरुद्ध स्वतःच अर्थ व्यक्त करणें होय. शकाराच्या अुपमा देखील इतक्या अनर्थक आणि हास्यास्पद नसत !

**हिंदु हा मुसलमानासारखा वेडगळ कडवा नाहीं; पण हिंदु कडवा आहे. हिंदु मुसलमानासारखा धर्मोन्मत्त वीर नाहीं; पण हिंदु धर्मवीर आहे. नाहींतर तो ह्या जीवनकलहांत आजवर जगलाच नसता !** जुन्या अितिहासाच्या गोष्टी सोडल्या तरी प्रत्यक्ष ह्या गेल्या दहावीस वर्षांतच अेक नाहीं, दोन नाहीं, शेंकडों हिंदु तरुण असे निघाले नाहींत काय कीं ज्यांनीं हिंदुस्थानचे स्वातंत्र्यार्थ हंसत हंसत फांसावर आरोहण केलें ? गव्हरनर जनरलांना हजारो गोऱ्या सैनिकांच्या नागव्या तरवारींचे पहाऱ्यांतून हत्तीवरील हौद्यांत आहत केलें ? अठरा अठरा वर्षांच्या मुलांनीं ! ज्या डिंगराच्या देशभक्तीची आणि अतुल धैर्याची स्तुति चर्चिल आणि लॉयिड जॉर्ज यांनीं करून त्यास रोमच्या अत्यंत श्रेष्ठ हुतात्म्याशीं तुललें, तो मदनलाल डिंगरा हिंदूच होता हें कोणी विसरूं नये. हिंदूंमध्यें स्वातंत्र्याच्या ध्येयासाठीं फांसावर मरणारे किंवा अदमानांत मृत्यूच्या जबड्यांत असतां क्रांतिगीतें आणि स्वातंत्र्यस्तोत्रें गाणारे शेंकडों तरुण आणि वृद्ध लोक निघाले, आजकाल निघताहेत !

श्रद्धानंद १०–२–२७

# धर्माचें स्थान हृदय आहे, पोट नव्हे.

वास्तविक पाहातां कोण्याही हिंदूनें मुसलमानाचें किंवा खिस्त्याचें अन्न खाल्लें किंवा पाणी घेतलें म्हणजे तो बाटतो ही कल्पनाच खुळी आहे. कारण धर्माचें स्थान पोट नसून हृदय हें आहे. ज्या मनुष्याच्या हृदयांत हिंदु धर्माची भक्ति कधींच मावळलेली नसेल तो मुसलमानाचे घरीं एकदां सोडून एक सहस्र वेळां जरी जेवला, तरी तो बाटला असें होत नाहीं. मुसलमानादिक लोक हिंदूंचें अन्न चुकूनच नव्हे तर लुबाडून घेऊन देखील खातात आणि पुन्हां मुसलमानाचे मुसलमान रहातात. किंबहुना हिंदूंच्या अन्नावर परस्पर उपजीविका करून पुन्हां वेळ पडतांच त्याच हिंदूस 'काफर' म्हणून म्हणणें हा त्यांच्यांत एक कुलाचारच पडत चाललेला आहे. मग मुसलमानाच्या अन्नानें हिंदूंचा धर्मच नष्ट व्हावा अितकी हिंदुसमाजाची पचनशक्ति क्षीण कां असावी ? आतां ती पचनशक्ति आपण अगस्तिसारखी सर्व जगत् पचविण्याअितकी तेजस्वी आणि प्रदीप्त केली पाहिजे. ह्या दृष्टीनें पहातां केवळ अन्नोदकासाठींच बाटलेला म्हणून समजल्या गेलेल्या मनुष्यास शुद्ध करण्याचेंच कांहींअेक कारण नाहीं. पण आज जरी आपणांस ही गोष्ट क्षुल्लक वाटते–आणि तशीच ती वाटावी हेंच आपल्या वाढत्या बळाचें निदर्शक आहे–तरी जोंवर समाजांतील हजारों लोकांच्या मनांतून त्या खुळया कल्पनेचें बीं उखडलें गेलेलें नाहीं तोंवर कांहीं दिवस हे शुद्धिसमारंभही केले पाहिजेत. या कारणापेक्षांही अेका अधिक महत्त्वाच्या कारणासाठींहि समारंभ केले पाहिजेत. इतकेंच नव्हे तर त्यांची चांगली प्रसिद्धीही करीत राहिलें पाहिजे. कारण हिंदूंच्या मनांत, आजपर्यंत कोणाचा पाण्याचा थेंब तोंडांत पडला कीं, मनुष्य जन्मभरच नव्हे तर पिढ्यानपिढ्या बाटतो ही खुळी समजूत जशी बद्धमूल झालेली आहे, तशीच मुसलमानादिक अहिंदु समाजांतहीं उलट्या स्वरूपाची अेक घातक समजूत दृढतर झालेली असते कीं, कोणत्याही हिंदूस वेडसरपणांत किंवा उपासमारींत गांठून त्यास दोन घांस अन्न मुसलमानी हाताने खावविलें कीं, तो मनुष्य, हिंदु लोक आपण

होअूनच मुसलमान झाला, असें समजून त्यास आपल्या मुसलमानी वा ख्रिश्चन समाजाच्या हातीं सोंपवून देतात.

आतां आपल्याला अन्नोदक व्यवहाराचें कांहीं महत्त्व वाटत नाहीं. हेंच आपल्या ह्या विषयांत झालेल्या समाजहितकारक विचारक्रांतीचें निदर्शक आहे. आणि म्हणूनच अन्नव्यवहारानें धर्म बाटतो ही समजूत खुळी आहे म्हणून समजणारी **ही विचारक्रांति मुसलमानादिक सर्व अहिंदूंस घोषित करण्यासाठीं तरी कांहीं दिवस शुद्धीकरणाचे संस्कार चालू ठेवले पाहिजेत.** ह्या शुद्धीकरणानें मुसलमानादिकांस लवकरच कळून येईल कीं, ते हिंदूंस बाटविण्यासाठीं म्हणून जें अन्न वांटीत बसतात तें आतां व्यर्थ जाणार आहे! त्यांचें अन्न खाअून तें पचवून टाकण्याअितका हिंदूंचा जठराग्नि प्रदीप्त झालेला आहे. असा अनुभव दोन तीन वर्षें त्या अहिंदु समाजास येत गेला कीं, ते पुन्हां हिंदूंस दुष्काळ, उपासमार, वेड अशा आपत्तींत गांठून त्यांस बाटविण्याचे दुष्ट हेतूनें पोषीत बसण्याचे विफल श्रम आपोआप करीतनासे होतील. आतां ते दिवस गेले कीं, अेक दिवस हिंदूंस दोन तुकडे चारले कीं तो आणि त्याची संतति मुसलमान होअी! आतां हिंदूंस अितक्या स्वस्त मूल्यावर विकत घेतां येणें शक्य नाहीं हें अेकदां मुसलमानादिकांच्या पूर्ण प्रत्ययास आले म्हणजे मिशनरींच्या धंद्यासदेखील पार अुतरती कळा लागलीच म्हणून समजा. अमेरिकनादि लोक मग अशा विफल साधनावर कोट्यवधि रुपये खर्चणार नाहींत. **आज हिंदु पोसला–दहा वर्षें पोसला; तरी संधि सांपडतांच तो आपला अेक तुळशीपत्र खाले कीं, पुन्हां हिंदूचा हिंदु होतो, असें पक्केपणीं कळलें कीं, ते पाद्री आणि पीर आपलीं भ्रष्टाकाराचीं दुकानें भराभर आटोपूं लागतील. आम्हीं तर प्रत्येक हिंदूला अुग्रडपणें सांगतों कीं, जर निरुपाय होअील तर चापून मुसलमानांचे घरीं खा, पाणी प्या. इंग्रजांचे घरीं खा, पाणी प्या; सर्व जगाच्या घरीं खा, पाणी प्या; आणि जेवण झाल्यावर लगेच मुखशुद्धीसाठीं अेक तुळशीचें पान तोंडांत टाका कीं, तुमची मुखशुद्धीच नव्हे तर आत्मशुद्धिहि होऊन आणि अन्न पार पचवून टाकून तुम्ही पुन्हां हिंदूंचे हिंदूच रहाल. आजवर सर्व जगानें हिंदूंचें खाल्लें, हिंदूंना लुटलें.** आतां तुम्ही सर्व जगा-

कडून ती फेड करून घ्या, सर्व जगाचें अन्न खा आणि पुन्हा हिंदूंचे हिंदू रहा ! ! खाण्यापिण्यानें हिंदुधर्मीय बाटणार तरी कसा ? कारण हिंदुधर्माचें वसतिस्थान तुमच्या पोटांत नसून रक्तांत आहे. बीजांत आहे, हृदयांत आहे, आत्म्यांत आहे आणि तें हिंदु रक्त, हृदय, बीज आणि आत्मा मुसलमानादिकांच्या पाण्याच्या एका पेल्यांत तर काय पण अभ्या समुद्रांतही बुडून जाणें अशक्य आहे. ज्या रामनामाच्या आधारानें भवसमुद्रावर शिळा तरल्या त्या रामनामाचे उच्चारासरशीं, जर तो उच्चार पश्चात्तप्त अंतःकरणाचा असेल तर, महत्पापें देखील भस्म होतील तिथें मुसलमानी भाताच्या एका घांसाची कथा काय !

—श्रद्धानंद, २५–८–२७

# जो दर्शनानें बाटतो तो देवच कसला !

**मुंबअीच्या** ब्राह्मणसभेनें आपल्या गणपतीपुढें अस्पृश्य हिंदुबंधूंचा मेळा येअूं द्यावा म्हणून जो दि. २८ आगस्टच्या सभेंत ठराव केला, त्या योगें अुभ्या महाराष्ट्रांत प्रत्येक संघटनाच्या पुरस्कर्त्यास मनःपूर्वक आनंद झालेला आहे. वास्तविक पहातां सभेनें हा ठराव केला यांत अितकें कांहींच आश्चर्य नाहीं. कारण कोंकणासारख्या ज्या प्रदेशास, नेक्टाय कॉलरीनें–चढावलेले, हे मुंबअीचे कित्येक बी. अे. आणि अेम्. अे. कित्येक शिक्षित आणि अशिक्षित ब्राह्मण अिराणी अुपहारगृहांत चहा पीत पीत " मागासलेला आणि पुराणवेडा प्रदेश " म्हणून तुच्छवीत असतात, त्याच कोंकणांतील रत्नागिरीसारख्या ठिकाणीं आतां संघटन चळवळीमुळें अस्पृश्यांचे मेळे सार्वजनिक गणपतीचे दर्शनास तर काय, पण पालखीभोंवती लगटून पहारा देण्यासही येअूं शकतात आणि नाशिकसारख्या धर्माचें आगर मानलेल्या तीर्थक्षेत्रीं आज तीन वर्षें ब्राह्मणादिक स्पृश्यांच्या सर्व गणपतींच्या पुढें अस्पृश्यांचा गणपति, हजारों लोकांच्या मिरवणुकींत प्रेमभरानें चालविलेला असतो. अशा स्थितींत अिराणी अुपहारगृहांतून चहा पिणाऱ्या, ट्रामवे आणि आगगाड्या यांतून रात्रंदिवस बिऱ्हाड पडलेल्या आणि मुकट्यास किंवा संध्येच्या पळीस, जुने ब्राह्मण अस्पृश्यास समजतात त्याहूनही अधिक अस्पृश्य समजणाऱ्या, शेकडों अर्धवट ब्राह्मणांनीं आणि अनेक प्रामाणिक सुधारकांनीं गजबजलेल्या मुंबअीस अस्पृश्यांचा मेळा गणपतीच्या नुसत्या दर्शनासही येअूं द्यावा कीं नाहीं, ह्या प्रश्नाचा विचार करावा लागावा हेंच लज्जास्पद होतें ! अस्पृश्यांस देवदर्शन करूं दिलें तर म्हणे देव विटाळतो ! हें विधान तत्त्वज्ञानाचा ज्या जातींत अुदय झाला म्हणून जगांत यशोदुंदुभि निनादत आहे, त्या ब्राह्मण जातींत चर्चेस घेणें भाग पडावें हीच खरी लज्जेची गोष्ट आहे ! ब्रह्मज्ञान झालें तो ब्राह्मण ना ? मग ज्यास ब्रह्मज्ञान झालें, त्यानेंच भक्ताच्या दर्शनानें देव विटाळतो असें म्हणणें म्हणजे डोळसानें दिवस असून रात्र आहे, असें म्हणण्या-

अितर्केंच हास्यास्पद नाहीं काय ? आणि जर ब्रह्मज्ञानावांचूनही ब्राह्मणत्व येअूं शकतें असें म्हणाल, तर मग त्या नामधारी ब्राह्मणांत आणि अस्पृश्यांत देहेंद्रियादिक मनुष्यत्वाची अितर गमेकें, साधारणच असल्यानें महत्त्वाचा फरक असा कोणचा राहिला ? ब्रह्मज्ञान किंवा शील किंवा अुत्कट लोकहिततत्परत्व अंगीं नसतांही, ब्राह्मण म्हणवून घेअूं अिच्छिणाऱ्यांत आणि साधारण अस्पृश्यांत मग जो अेकच फरक अुरतो, तो हा कीं, पहिल्याचें हृदय अहंकारानें दगडाहून कठिण झालेलें असतें आणि दुसऱ्याचें तितक्या प्रमाणांत तरी तसें कठिण झालेलें नसतें. अस्पृश्य हिंदु पापी नसला तरी, आपण पतित आहोंत म्हणून भावीत असल्यानें स्वभावतःच लीन होतो; तर वरील नांवाचा ब्राह्मण पतित असूनही आपण मोठे पावक आहोंत म्हणून भावीत असल्यानें स्वभावतःच अुद्धट आणि म्हणूनच अस्पृश्यांहूनही अस्पृश्य झालेला असतो !

तसें नसतें तर दर्शनानें देव बाटतो हा प्रश्नच ब्राह्मणांत अुपस्थित झाला नसता. देव, तो बाटेल तरी कसा ! अहो अस्पृश्यांच्या स्पर्शानें देव जर बाटता, तर ज्या दिवशीं त्यानें अस्पृश्यांस अुत्पन्न केलें त्याच दिवशीं त्यांच्या स्पर्शानें तो बाटला आहे ! देवाचें सर्वांत आवडतें नांव पतितपावन हें आहे. मग त्याच्या स्पर्शानें पतितच पावन होतील का पतितांच्या स्पर्शानें तो पावनच पतित होअील ? आपला देव खराच का असा शेणामेणाचा आहे कीं, पाप्याच्या अुत्तप्त तामसी हाताच्या स्पर्शाची अुष्णता लागतांच तो वितळून जावा ! महाराज, ही आपल्या देवाची आपण निर्भर्त्सना करीत आहां कीं, ती अैकतांच नास्तिकांसहि लाज वाटावी ! नाहीं : आपल्या हिंदूंचा देव असा शेणामेणाचा केलेला नाहीं. त्याची मूर्ति, त्याचें चित्र शेणामेणाचें असेल, पण तो भगवान पतिताच्या स्पर्शानें पतित होणारा नसून, आपल्या दिव्य स्पर्शानें पतितांसच पावन करणारा आहे. म्हणूनच त्यास देव म्हणतात. 'तो अच्छेद्योयम्, अदाह्योयम्, अक्लेद्योशोष्यअेवच !' असा आहे. तो शस्त्रानें छाटला जात नाहीं, तसाच तो स्पर्शानें बाटला जात नाहीं.

आपण ब्राह्मण स्वतःस भूदेव म्हणवितां आणि त्याच तोंडानें पुनः म्हणतां कीं, महाराच्या स्पर्शानेंच नव्हे, तर नुसत्या दर्शनानें तुम्हीं आणि तुम्हां भूदेवांचा देवही बाटेल म्हणून ! देव पतितपावनः तुम्हीहि पतितपावन असावयास पाहिजे. पतित तुम्हांस स्पर्श करतांच, तोच पावन झाला पाहिजे.

मग अुलट तुम्हीच त्याच्या स्पर्शास कसे भितां, दर्शनानें स्वतःच पतित व्हाल ही भीति कशी बाळगतां ? अग्नीला थंडी शिवली म्हणजे अग्नि का थंड होतो ! होत असेल तर तो अग्नीच नव्हे. दिव्याला स्पर्शतांच अंधकार दिव्य होतो का दिवा आंधळा होतो ? होत असेल, तर तो दिवाच नव्हे. गंगेस ओहोळ शिवला तर गंगा का अपवित्र होते ? होत असेल तर "गंगा-गंगेति यो ब्रूयात् योजनानां शतैरपि मुच्यते सर्वपापेभ्यो" ही स्मृति खोटी ठरली पाहिजे ! ओहळाला पावन करील तीच भागीरथी, तसा पतितांच्या दर्शनानें जो पतितासच पवित्र करतो तोच भगवान ! तोच आपल्या ब्राह्मण ज्ञातीच्या पितृपितामहांनीं, "वेदैस्सांगपदक्रमोपनिषदैः" गायिला आहे ! श्रीहरीचा स्पर्श होतांच गजेंद्रासारखे पशुही अुद्धरले, ही कथा प्रमाण मानणाऱ्यांनीं महारामांगादिकासारखे **प्रतिलोम विवाहापासून ज्यांची उत्पत्ति स्मृतींत दिली आहे** असे आपल्या रक्ताचे, आपल्या बीजाचे आपल्या हिंदु धर्माचे आणि आपल्या हिंदु देशाचे बांधव आपले सख्खेभाऊ ह्यांना देवाच्या दर्शनासही–स्पर्शहि दूरच, पण दर्शनासही–प्रतिबंध करावा ही केवढी खेदाची आणि अज्ञ दंभाची गोष्ट आहे !

नुसता शुद्धतेचा प्रश्न असेल तर मग ब्राह्मणादिक स्पृश्यांत जे पापी आहेत त्यांनाही मंदिरांत मज्जाव असावा, महारादिकांतील पाप्यांसही असावा आणि ब्राह्मणादिकांतील सुज्ञात, सुशील आणि सज्जन गृहस्थास दर्शन जसें घडतें तसें महारादिकांतील सज्जनांसही घडूं द्यावें. कारण महारादिकांतही असे धर्मभीरु लोक आणि सच्छील आणि वारकरी आणि धारकरी शूर आहेत कीं, ज्यांच्या पायाची धूळ स्पृश्यांतील अनेक सूर्याजी पिसाळांनीं आपल्या मस्तकीं धारण करावी. तेव्हां महार किंवा मांग किंवा चांभार म्हणून जातीवर अस्पृश्यतेचा छाप अशुद्धतेच्या निमित्तानें मारतां येणार नाहीं. अशुद्धतेचाच प्रश्न असेल तर त्या मेळ्यांतील प्रत्येक महार मुलगा प्रातःकाळीं सर्वांसमक्ष अगदीं अुत्तमां-तील अुत्तम साबण लावून स्नान करील, धुवून वस्त्रें नेसेल आणि ज्याच्या प्रभावानें "शतजन्मकृतं पापं विनश्यति न संशयः ।" तें रामनाम जपून तो तुमच्या गणपति मंदिरांत प्रवेश करील; मग तर झालें ना ?–ज्या गणपती मंदिरांत पारोशा चोरापोरांनाही ब्राह्मण म्हणवून घेतांच प्रवेश मिळतो आणि ज्यांच्या दर्शनानें गणपति बाटत नाहीं, त्या गणपति मंडपांत अशा सुस्नात

महार बंधूंचें प्रेमळ भजन करविलें तर आकाशांतून वज्राघात कोसळणार नाहीं किंवा भूकंपही अुसळणार नाहीं, हें प्रतिज्ञेवर सांगण्यास कांहीं प्रत्यवाय वाटत नाहीं.

महारांची तर गोष्टच राहो; पण अगदीं ज्यांची माता प्रत्यहीं सकाळीं सार्वजनिक मलक्षालनाचें अत्यंत लोकोपकारक कृत्य करीत असते अशा भंग्याचा अेक मुलगा रत्नागिरीच्या " पूर्वास्पृश्यांच्या " मेळ्याचा धुरीण आहे. त्याचा अुच्चार, त्याचा आचार, त्याचा विचार आणि त्याची बुद्धिमत्ता पाहून, सांगितलें तरी, तो भंग्याचा असावा म्हणून विचारण्यास लोक कचरतात. तो भंगी बालक परवांच्या गणेश चतुर्थीस रत्नागिरीच्या सार्वजनिक गणपतीच्याच नव्हे तर ब्राह्मणांच्या विशिष्ट गणपतीसही मिरवीत आणणाऱ्या मिरवणुकींत पालखीस लागून त्या मेळ्यांत भजन करीत होता ! रात्रीं अुत्सवांत सर्व समाजांत, मुख्य देवालयाचे अंगणांत आणि ओट्यांत हिंदुत्वाचे जयजयकार हजारों स्पृश्यांचे खांद्याशीं खांदा लावून करीत होता. दिंड्यांतून सरमिसळ भजनांत दंग होता; पण ' भंग्यास ' दर्शन घेअूं दिलें म्हणून गणपति अजून रागावलेले दिसत नाहींत, किंवा रत्नागिरीवर आकाशांतून अेखादी वीज कोसळली नाहीं किंवा भूमि फाटून दुभंग होवून रत्नागिरीला गिळती झाली नाहीं !

वास्तविक पहातां अस्पृश्यतेच्या हानिकारकपणाचा अितका खल गेल्या दोन तीन वर्षांत झाला आहे कीं, तिचें समर्थन करण्यास समर्थ असा अेकही कोटिक्रम कोणापाशींहि अुरलेला नाहीं. अजून कित्येक प्रामाणिक हिंदूंनाही जर अस्पृश्यास शिवणें कठीण वाटत असेल, तर तें युक्तिसंगत वा तात्विक अुपपत्तीचे आधारानें नसून, केवळ संवयीच्या प्रभावानेंच होय. जशी विडीची संवय लागली म्हणजे ती वाईट म्हणून पटते, तरी ती सोडवत नाहीं ! केवळ रुढी म्हणून ती अस्पृश्यता असावी असें वाटतें; स्मृति म्हणून नव्हे.

पण कोणी म्हणेलच कीं स्मृति तशा आहेत कीं नाहीं, तर त्यास अितकेंच अुत्तर पुरे कीं, अशाही आहेत कीं, " न वदेद्यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि ! " मग किती ब्राह्मणांच्या मुलांनीं आणि मराठ्यांनीं अिंग्रजी शिकणें सोडलें आहे ? म्लेंच्छ च्या दास्यांत राहणाऱ्या, मुसलमानांस आपल्या मुलीबाळी पळवूं देणाऱ्या आपलीं देवळें आणि सिंहासनें परकी उन्माद पायाखालीं तुडवीत असतां

कुत्र्यासारख्या शेंपट्या हालवीत नि तुकडे चघळीत जिवंत रहाणाऱ्या अशा प्रत्यहीं साहेबांच्या कचेरींत शालजोडीतले खाणाऱ्या कारकूनापासून तों शालजोडी पांघरून कॉलेजांतून युरोपियनास वेदविक्रय करणाऱ्या महामहोपाध्यायापर्यंत या पिढींतल्या कोणाहि हिंदूस स्मृतीचें नांव काढण्याचा लवलेश तरी अधिकार आहे काय? अस्पृश्यांच्याविषयीं स्मृतीची आठवण होतांच आपण प्रांजलपणें आपल्या आत्म्यास विचारावें कीं, आज सकाळपासून संध्याकाळपर्यंत मी किती कर्मे स्मृतीला भिऊन केलीं! म्हणजे प्रत्येक स्मृतिभक्ताच्या हेंहि निदर्शनास येईल कीं, अस्पृश्यता पाळा म्हणून म्हणणाऱ्या प्रत्येक स्मृतिश्लोकामागें अस्पृश्यता सोडा म्हणून सांगणाऱ्या स्मृतिश्लोकांचें आधार हात धुवून पाठीस लागलेले आहेत.

ब्राह्मण हो, क्षत्रिय हो, हे सात कोटी आपल्या धर्माचे आणि रक्ताचे भाऊ आज देवाची पूजा करावयास म्हणून आंत येऊं द्या, अशी करुण प्रार्थना करीत आहेत! न्यायासाठीं, प्रेमासाठीं त्यांना आंत घ्या! कुत्र्यास आपण शिवतों, तोंडाशीं तोंड लावितों—हीं आमच्यासारखीच मनुष्यें आहेत, आपल्या हिंदुधर्माच्या विठ्ठलाचे वारकरी आहेत! पण जर प्रेमानें नसेल तर निदान भयानें तरी त्यांस देवदर्शन घेऊं द्या. आज ते तुमच्या देवाचें भजन करावयाचा सत्याग्रह करूं पहात आहेत, पण उद्यां दुष्ट म्लेंच्छाच्या पाखंडास बळी पडून, ते देवाचे **भंजन** करण्याचा शस्त्राग्रह करण्यास सिद्ध होतील, हें ध्यानांत धरा! परधर्मीय त्याच्या बुद्धिभेद करीत आहेत. आठ कोटी मुसलमान आणि खिश्चन झाले, तसे अठरा कोटी मूर्तिभंजक उत्पन्न करावयाचे आहेत काय? जो अस्पृश्य ह्या छळानें बाटेल तो, त्याच्या आणि आपल्या हिंदु राष्ट्राच्या आत्म्याचाहि घात करावयास चुकणार नाहीं! हें किती सांगावें. किती प्रकारांनीं सांगावें! ज्यास तुम्हीं आपला देव समजतां त्याची भक्ती वाढविण्याचें तुमचें कर्तव्य आहे, कीं घटविण्याचें!

केनियांत परधर्मी आणि परदेशी युरोपियन तुम्हांस अस्पृश्य समजतात; त्यांचेवर तुम्ही जळफळतां! तें न्याय्यच आहे. पण मग त्याच तोंडानें त्याच कोटिक्रमास उलटवून, ह्या तुमच्या स्वधर्मीयांस स्वदेशांतच अस्पृश्य म्हणून तुम्ही जेव्हां धिक्कारतां, तेव्हां परमेश्वर तुमच्या या अहंकारी भोंदूपणानें संतुष्टच होत असेल नाहीं का? हा अन्याय श्रुतिस्मृतीला संमतच आहे नाहीं? याचा कांहीं

विचार करा. **आतां कसल्या स्मृति आणि श्रुति !** स्मृतीचें आणि श्रुतीचें अस्तित्वच लुप्त होण्याचा, हिंदुराष्ट्र नामशेष होण्याचा प्रसंग जेथें आला आहे, तेथें **ज्या ज्या अुपायानें त्यांचें रक्षण करतां येअील, हें हिंदुराष्ट्र जिवंत आणि विवर्धमान ठेवतां येअील, तें तें साधन स्मार्त आणि श्रौत आहेच आहे.** जुन्या स्मृति अनुकूल आहेतच. पण नसल्या तरी नवीन करावयास पाहिजे होत्या. राष्ट्रासाठीं स्मृति आहेत; ज्यांनीं राष्ट्रनाश होतो त्या स्मृतिच नव्हत. तो स्मृतिभ्रंम होय! धारणा करीत नाहीं तो धर्मच नव्हे, तो विधर्म होय.

देव पतितपावन आहे, म्हणून पतिताला त्याचें दर्शन घेअूं द्या, न्यायासाठीं घेअूं द्या. अस्पृश्य आपल्या हिंदुधर्माचे भाअू म्हणून घेअूं द्या, परधर्माच्या पंजांत फसून, त्यांनीं नरकांत पडूं नये म्हणून तरी त्यांस देवदर्शन घडूं द्या. देवाचे नुसते दुरून दर्शन ! **अस्पृश्यांची ही मागणीहि** ज्यास अधिक वाटते, तो मनुष्यच खरा खरा अस्पृश्य होय आणि पतित होय ! मग त्याला चारी वेद मुखोद्गत कां असेनात !

**माणसांत अेक वेळ अस्पृश्यत्व असूं शकेल ! देवास दर्शनाची अस्पृश्यता ! भक्ताच्या दर्शनानें देव बाटतो ! थोतांड ! थोतांड ! हिंदुमात्र हिंदु देवतेच्या दर्शनाचा अधिकारी आहे ! कारण जो दर्शनानें बाटतो तो देवच नव्हे !**

—श्रद्धानंद, ८–९–२०

# स्वराज्यासाठींच संघटन हवें.

## [ भाग १ ला ]

## ज्यांत स्वत्व राहतें, तेंच स्व–राज्य होय !

हिंदुसंघटनाविषयीं पुष्कळ प्रामाणिक लोकदेखील ही शंका घेतात कीं, "जातिविषयक भावना प्रबळ करविणारी ही संघटनाची चळवळ राष्ट्रीय भावनेस हानिकारक तर होणार नाहीं ना ? हिंदुमुसलमानादिक सर्व धर्मांचे आणि जातींचे लोक जोंवर अेकत्र होअून राष्ट्रीय जीवन जगविण्यास किंवा त्या जीवनाचे प्राप्तीसाठीं झगडत मरण्यास सिद्ध झालेले नाहींत तोंवर स्वराज्य मिळणें अशक्य असल्यानें, मुसलमानांस ज्यायोगें दुःख होतें अशा कोणत्याहि हिंदवी ( हिंदुजातिविशिष्ट ) चळवळी काढून हिंदुस्थानांतील निर-निराळ्या जातींत वैमनस्य अुत्पन्न करण्याचें प्रयत्न राष्ट्रघातकीच होणारे आहेत. स्वराज्यासाठीं ही संघटनविषयक चळवळ सोडणें हें राजनीतीचे दृष्टीनेंही अत्यंत शहाणपणाचें आहे. कारण कांहीं दिवस जर आपण मुसलमानांच्या वाटेल त्या मागण्या मान्य केल्या आणि त्यांस रुचतील त्याच अटीप्रमाणें वागलों तर हिंदुमुसलमानांची अेकी साध्य होअून स्वराज्य प्रस्थापित करतां येअील. तें महान् ध्येय आपल्या राष्ट्रास इतकें लाभकारक आहे कीं, त्याच्या प्राप्तीसाठीं वाटेल त्या तडजोडीचें आणि पडेल त्या स्वार्थत्यागाचें मूल्य हें स्वस्तेंच होणारें आहे. तेव्हां स्वराज्य हिंदुमुसलमानांच्या अेकीवर अवलंबून असल्यानें आणि हिंदु–मुसलमानांची अेकी हिंदु संघटनानें बिघडण्याचा निश्चित संभव असल्यानें स्वराज्यासाठीं आपण हिंदुसंघटन सोडून दिलें पाहिजे. राजनीतीच्या दृष्टीनेंहि हें आपल्या राष्ट्रास हितावह होणारें आहे."

वरील शंकेनें विचलित झालेले जे लोक प्रामाणिकपणें हिंदुसंघटनावर अुपर्युक्त आक्षेप आणितात, त्यांस हिंदुसंघटनाचे पक्षपाती तितक्याच प्रामाणिकपणानें चटकन् अुत्तर देतात कीं, 'तुम्ही स्वराज्यप्राप्तीचे मार्गांत येतें म्हणून संघटन त्याज्य म्हणतां, पण ही तुमची समजूत मुळांतच लटकी आहे.

आम्हांस अेक वेळ स्वराज्य न मिळालें तरी चालेल पण आम्हांस संघटन हवें आहे!' हिंदुसंघटनाचे अभिमानी पुढारी हे वारंवार लिहितांना बोलतांना आढळून येतात कीं, स्वराज्य हें हिंदुमुसलमानांच्या अेकीवर अवलंबून आहे हें अगदीं खरें आहे. परंतु त्या अेकीसाठीं ज्या हिंदुत्वविघातक अटी मुसलमान घालीत आहेत, त्या आम्हीं कधींहि मानणार नाहीं. मग त्यापायीं आम्हांस स्वराज्य आणखी सहस्र वर्षे न मिळालें तरी चालेल!

केव्हां केव्हां अेखादा प्रश्नच असा चकवून घातलेला असतो कीं, त्याचें अुत्तर, त्या प्रश्नांतील हेत्वाभासामुळेंच हटकून चुकलेलेंच यावें. पठाण लोकांस कारागारांत असाच अेक प्रश्न विचारून फसवितांना आम्हीं कित्येक विनोदी लोकांस पाहिलें आहे. नवीन पठाण बंदीवान येतांच त्यास अितर बंदिवानाप्रमाणें नांव गांव विचारून झटकन् विचारलें जाई कीं, "तूं कोण? पठाण कीं मुसलमान?" अर्थात् तो नवागत बंदी झटकन् सांगे, 'मी पठाण!' 'तर मग तूं मुसलमान नाहींस तर?' असें विचारतांच तो मनुष्य सहजच गोंधळे आणि आजूबाजूस हंशा पिके. पठाणपण आणि मुसलमानीपण हीं सहसा परस्परविरुद्ध नसल्यानें, 'मी दोन्हीहि आहें' हें खरें अुत्तर, त्या प्रश्नांतील हेत्वाभासामुळें सहसा सुचेनासें होअून हटकून चुकींचें अुत्तर येअी. मुलांतहि असा अेक खेळ असतोच. प्रथम त्यास दहा पांच प्रश्न तूं शहाणा कीं वेडा, पुरुष कीं बायको, अित्यादि पूर्वार्धेअिष्ट असलेल्या अुत्तरांचे विचारीत चटकन् विचारलें की, तूं गाढव कीं गद्धा, कीं तो चटकन् सांगतो कीं मी गाढव! आणि अगदीं चाणाक्षपणें पूर्वार्ध टाळण्याचें ध्यानांत आलें तर अुत्तरार्ध तरी तोंडांतून निघून जातोच कीं, "गाढव नाहीं, गद्धा"!

"स्वराज्य हवें कीं संघटन" हा प्रश्नहि अशाच प्रकारच्या हेत्वाभासानें दूषित झालेला आहे. आणि म्हणूनच त्याचें अुत्तर बहुतेक संघटनावादी लोक चटकन् देअून बसतात कीं "संघटन! स्वराज्य मिळालें नाहीं तरी चालेल पण आम्हीं संघटन सोडणार नाहीं!" अर्थात् "स्वराज्य हवें कीं संघटन" या प्रश्नांतील हेत्वभासामुळेंच "**स्वराज्य नको, संघटन हवें,**" **हें चुकीचें अुत्तर** सहजच देण्यांत येतें आणि त्या अुत्तरांतील चुकीही अप्रिय वाटत असतांहि, ध्यानांत येत असतांहि, ती टाळावी कशी हें ज्यांचें

स्वराज्यावरहि आणि संघटनावरहि अुत्कट प्रेम आहे अशा पुष्कळ प्रामाणिक माणसांस सहसा अुमगत नाहीं.

परंतु 'स्वराज्य हवें कीं संघटन' या प्रश्नांतील हेत्वाभास स्पष्टपणें विवृत केला असतां, वरील अुत्तरांतील हा विचारविभ्रम सहज टाळतां येतो. 'स्वराज्य हवें कीं संघटन' या प्रश्नाचें सरळ अुत्तर हें आहे कीं, या दोहों-मध्यें 'हें कीं तें' असला मूलतः विरोधच नाहीं. संघटन हें साधन आणि स्वराज्य हें साध्य आहे. 'स्वराज्य कीं संघटन' हा प्रश्न नसून सध्यांच्या परिस्थितींत संघटन केलें तरच स्वराज्य मिळणें शक्य आहे. **आम्हांस स्वराज्य आणि संघटन हीं दोन्हीहि हवीं आहेत.** कारण आम्हां हिंदूंस अभिप्रेत असलेलें स्वराज्य, हिंदु संघटनावांचून मिळणें शक्यच नाहीं. हें पूर्वींहि कांहीं विचारवंत देशभक्तांच्या ध्यानांत आलेलेंच होतें–आज तें मध्याह्नींच्या दिवसाअितकें सुस्पष्टपणें प्रत्येक हिंदूच्या प्रत्ययास येत आहे.

कारण ज्या स्वराज्याकरितां आम्हीं धडपडत आहों, ज्या स्वराज्याकरितां सत्तावनच्या क्रांतियुद्धापासून शेंकडों, सहस्रों क्रांतिकारक हिंदु वीर सशस्त्र प्रतिकार करीत रणांत मेले, फांशीवर लटकले, अंदमानांत सडले, कारागारांत पडले, देशोधडीं लागले, ज्या स्वराज्याकरितां राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून तों असहयोगाच्या आंदोलनापर्यंत शेंकडों नेमस्त आणि हिंदु पुढारी निःशस्त्र प्रतिकार करीत आणि लोकमान्यांपासून गांधीजींपर्यंत खटपटत आले तें स्वराज्य म्हणजे हिंदुस्थान देशाचें अेकराष्ट्रीय, स्वायत्त, लोकसत्ताक आणि स्वतंत्र राज्य हेंच होय. या स्वराज्यांत हिंदी नागरिक असलेल्या प्रत्येक स्त्री–पुरुषांचें जातिपंथनिर्विशेष असलेलें स्वत्व राखिलें जाईल. प्रत्येक धर्मास आणि जातीस, तदितर धर्मास आणि जातीस आपआपल्या संख्याप्रमाणें जे न्याय्य अधिकार अुपभोगितां येतात, ते समानत्वें बजावतां येतील. हें स्वराज्य केवळ हिंदूंचेंहि नसेल, तें अहिंदूंचेंहि नसेल; तर तें प्रत्येक हिंदी मनुष्याचें असेल आणि त्यांत प्रत्येकास आपलें न्याय्य स्वत्व न गमावतां नांदतां येईल.

या स्वरूपाचेंच स्वराज्य तुम्हांस अभिप्रेत आहे ना ? मग हिंदु संघटनाचें ध्येयहि याच स्वरूपाचें स्वराज्य हें आहे. यामुळें "**संघटन कीं स्वराज्य**" **हा वैकल्पिक प्रश्नच चुकीचा ठरत असून, स्वराज्यासाठींच संघटन हवें हें सिद्ध होत आहे.**

स्वराज्याचें स्वरूप असें असलें पाहिजे असें तुम्ही म्हणतां ना कीं, त्यांत हिंदु किंवा मुसलमान अशी कोणतीही धार्मिक भेदाभेदाची कल्पना न शिवतां त्याचें स्वरूप केवळ हिंदीपणाचें असावें आणि त्यांत मुसलमानादिक प्रत्येक धर्म–पंथ–जातिमात्राचें स्वत्व समप्रमाणानें आणि यथान्याय राखिलें जावें ? ठीक तर, जर या स्वराज्यांत प्रत्येक धर्मपंथाचें स्वत्व राखिलें जाणार आहे, तर मग त्यांत हिंदुधर्माचेंहि स्वत्व योग्यप्रमाणाने आणि यथान्याय राखिलें गेलें पाहिजे, नाहीं काय ! अितकेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील लोकसंख्येचा दोन तृतीयांश भाग ज्या हिंदूंचा आहे, त्यांचें स्वत्व ज्या स्वराज्यांत अितर अत्यल्प किंवा अल्प अशा अहिंदु समाजाच्या स्वत्वाच्या अतिरेकी मागण्यांस बळी दिलें जातें, तें स्वराज्यच नव्हे–तुम्हीं म्हणतां त्या व्याख्येप्रमाणेंदेखील तें स्वराज्यच नव्हे हें मानलेंच पाहिजे, नाहीं काय ? तर मग या प्रमेयावरून दुसरें प्रमेयहि आपोआपच अनुमानिलें जातें कीं नाहीं कीं, अशा रीतीनें हिंदूंचें स्वत्व इतर अहिंदु समाजांच्या अवास्तव आणि अवाच्या सवा मागण्यांस आम्ही बळीं देवूं देणार नाहीं आणि अुलटपक्षीं त्या आमच्या अहिंदु राष्ट्रबंधूंच्या न्याय्य मागण्यांचा प्रतिकार न करितां जे पंथ–स्वातंत्र्याचे अधिकार आम्हीं भोगूं इच्छितों तेच इतरांसहि उपभोगूं दिल्यावांचून आम्हीं राहणार नाहीं म्हणून प्रतिज्ञाबद्ध असलेलें हिंदुसंघटन हें त्या स्वराज्याच्या विरुद्ध जात नाहीं; इतकेंच नव्हे तर त्याच्या सिद्धीसाठीं प्राणपणानें झटत आहे. "संघटन स्वराज्यास हानिकारक आहे काय" हा प्रश्न हेत्वाभासानें अितका दुष्ट झालेला आहे कीं, संघटनावांचून स्वराज्य शक्य नाहीं हें अुलट विधानच काय तें त्याचें यथार्थ अुत्तर होअूं शकावें. कारण वर विवरण केल्याप्रमाणें ज्यांत हिंदूंचें स्वत्व हें निदान अितरांच्या स्वत्वाअितकें तरी अबाधित राहूं शकेल तेंच स्वराज्य अभिप्रेत असल्यानें त्याच हेतूसाठीं यत्न करीत असलेलें संघटन त्याच स्वराज्याचें अेक अत्यंत अुपकारक साधन आहे, हें सिद्ध होत आहे. संघटनाचा हेतु साध्य झाला कीं स्वराज्याची प्राप्ति झालीच. कारण तो हेतु अितर कोणताहि नसून स्वयमेव स्वराज्य हाच होय.

परंतु ज्याअर्थी स्वराज्य हें ज्यांत आमचें हिंदूंचें स्वत्व स्थिर आणि अभंग राहून अितर राष्ट्रीय बंधूंशीं आम्हांस सहनागरिकत्व भोगतां येअील तें स्वराज्य होय, त्याअर्थी स्वराज्याच्या प्राप्तीसाठीं मुसलमानांशीं वाटेल त्या अटींवरहि कां होअीना पण अेकी करावी या नेभळट धोरणाचा हिंदु संघटन तिरस्कार

करितें; खिलाफतीसारख्या त्यांच्या निर्भेळ धार्मिक असणाऱ्या, अितकेंच नव्हे तर ज्यांतील मूलतत्व हिंदीराष्ट्रीयभावास अत्यंत हानिकारक आहे अशा चळवळीहि केवळ मुसलमानांस प्रसन्न ठेवण्याकरितां अंगिकारिल्या जाव्या हें हिंदुसंघटनास आत्मघातकी वाटतें, तें यासाठींच. आमच्या खलिफाशीं लढणें हें आमच्या मुसलमानी धर्माविरुद्ध आहे, हें राष्ट्रीयभावास अत्यंत घातक असलेलें तत्त्व त्या खिलाफतीच्या बुडाशीं होतें. अुद्यां स्वराज्यप्राप्तीनंतर हिंदुस्थानची तुर्कस्थानशीं किंवा अजूनहि खलिफा असलेल्या मोरोक्कोशीं लढाअी जुंपली तर याच तत्वानें प्रस्फुरित झालेले हिंदी मुसलमान ह्या तत्त्वाची हीच तल्वार याच हिंदुस्थानचे पोटांत खुपसून तुर्कस्थानच्या किंवा मोरोक्कोच्या पक्षास मिळून हिंदुस्थानांत स्वराज्याशीं बंड करून अुठण्यास सज्ज होणार! असल्या राष्ट्रघातक आणि धर्मवेडाच्या चळवळीसहि हिंदूंनीं लाखों रुपये देअून आणि शेंकडों जणांना कारावासांत धाडून साह्य करावें—कां तर म्हणे त्यायोगें मुसलमान संतुष्ट होतील, त्यामुळें अेकी होअील आणि त्या अेकीनें स्वराज्य प्राप्त करितां येअील! आज जुन्या मशिदींवरून प्रार्थनेच्या वेळेस वाद्यें बंद करा, अुद्यां सदोदित बंद करा, परवां नव्या मशिदीवरूनहि बंद करा, आणि तेरवां गांवांतील बहुतेक राजमार्गांवर नवीन मशीद झाल्यानें वाद्यें वाजविण्याचा तुमचा हक्क आमूलतःच मृतप्राय होअूं द्या. अितकेंच नव्हे, वाद्यें ज्या अर्थीं आमच्या निमाजास अडथळा करितात म्हणून बंद करावयाचीं त्याचप्रमाणें आणि त्याच अर्थीं तुम्हीं तुमच्या घरांतहि शंख, तास, टाळ आणि घंटा मोठ्यानें वाजवूं नका, भजनें देखील संथानें करूं नका; कारण आमच्या शेजारच्या घरीं किंवा मशिदींत निमाज पढतांना त्या गोंगाटानें चित्त व्यग्र होतें! आम्हां मुसलमानांची एकी हवी तर, ही अट आहे—काल्पनिक नव्हे तर अुत्तर हिंदुस्थानांत प्रत्यहीं अशा अटी मुसलमानांनीं घातल्याविषयींच्या आणि हिंदूंच्या घरांत दंडेलीनें घुसून त्या पाळविल्याच्या वास्तविक वार्ता येत आहेत. बंगालमध्यें तर खेडेगांवांतून हिंदु वस्तीस तुमच्या अमुक अमुक कन्यका मुसलमानांस देत असाल तर एकी होईल, नाहीं तर तुम्हांस लुटून कुटून नष्ट करण्यांत येईल म्हणून मुसलमानांकडून अुघड अुघड सूचना दिल्या जात आहेत आणि त्यांची भयंकर पूर्तताहि कित्येक ठिकाणीं झालेली असून, त्या त्या हिंदु कन्यकांस बळानें ओढून नेण्यांत आलें आणि ती ती हिंदूंची वस्ती मारहाणीनें आणि जाळपोळ करून त्रस्त करण्यांत आली, हें

'श्रद्धानंदां' तून वेळोवेळीं प्रसिद्ध झालेलेंच आहे. आणि हा अत्याचार आम्हीं काय म्हणून सोसावा, तर म्हणे त्यायोगें 'अेकी' होओील-आणि त्या अेकीनें स्वराज्य मिळेल! मलबारच्या कत्तलीविषयीं आम्हीं मूग गिळून बसावें, लारखाना बंगाल-कोहाट येथें प्रत्यहीं घडणाऱ्या राक्षसी दंग्यांच्या आणि धर्मवेड्या आततायीपणाच्या छळाविषयीं नुसत्या शब्दानेंहि प्रतिकार किंवा स्पष्ट निंदा न करतां हिंदूहि दोषी आहेत म्हणून अत्यंत असत्य आणि भ्याडपणाचीं विधानें गांधींजीसारख्यानीं करावीं-कां तर त्यायोगें अेकी होओील आणि तीमुळें स्वराज्य मिळेल! मुसलमानांनीं हिंदूंना भ्रष्ट करणें हा त्यांचा धर्मच आहे, करूं द्या त्यांना भ्रष्ट. पण तुम्हीं हिंदूंनीं मात्र शुद्धी करतां कामा नये. तसें केलेंत तर आणि तुमच्या वतीनें न्यायालयांत जरी तुमचा हक्क प्रस्थापित झाला, तरी आम्ही लारखान्याप्रमाणें तुमचीं डोकीं सडकून जाळपोळ करीत दंगे करूं-तें सर्व तुम्हीं हिंदूंनीं 'अेकी' हवी तर सहन केलें पाहिजे. आम्हांस आज पांच जागा विधिमंडळांत अधिक द्या, अुद्यां पन्नास द्या, परवां सिंध-सारखे प्रांतचेप्रांत आम्हांस स्वतंत्रपणें तोडून द्या-कारण आम्ही 'मुसलमान' आहोंत, आम्हांस हिंदूहून विशिष्ट अधिकार दिले पाहिजेत. नाहीं तर! अेकी होणार नाहीं-अेकी नाहीं झाली तर स्वराज्य मिळणार नाहीं! त्याच्याहि पुढें जाअून, जे शब्द अैकतांच कोणाहि अस्सल हिंदूचें रक्त संतापानें भडकून जावें, किंवा लज्जेनें गारठून जावें ते निर्लज्ज शब्द अुच्चारण्यास न कचरतां कांहीं लोक, कांहीं कॉंग्रेसी हिंदु लोक, असें स्पष्टपणें म्हणतांना आम्हीं अैकलें आहेत कीं, फार काय अेकीसाठीं "हिंदूंनीं मुसलमान देखील व्हावें! आणि स्वराज्य मिळवावें!"

स्वराज्य अशा अटीवरच जर मिळत असेल तर त्याला आग लागो आणि स्वराज्य मिळविण्यासाठीं हिंदूंनीं मुसलमान देखील व्हावें म्हणून म्हणणारी ती जिव्हा झडून पडो! ज्या स्वराज्यासाठीं हिंदूंना मुसलमान व्हावें लागतें त्या स्वराज्याचें हिंदुसंघटन तोंडदेखील पाहूं अिच्छित नाहीं. कारण हिंदूंनीं मुसलमान होअूनच जें मिळतें किंवा ज्यांत वर वर्णिलेल्या अटी हिंदूंना पाळाव्या लागल्यानें, हिंदूंस मुसलमानांच्या ताटाखालील मांजरें बनून राहावें लागतें, तें स्वराज्यच नव्हे; तें मुसलमानी राज्य आहे. **ज्यांत स्वत्व अबाधित राहूं शकतें तें स्वराज्य. ज्यांत प्राणापलीकडे प्रिय**

**असलेलें आमचें स्वत्व–आमचें हिंदुत्व आम्हांस सोडावें लागतें. किंवा त्याच्या सन्मानाचा ध्वज अहिंदूचे पायावर नमवावा लागतो, तें आम्हां हिंदूचें स्वराज्यच नाहीं !** तें मुसलमानी राज्यच होय. आमच्या स्वत्वाप्रमाणें मुसलमानांसहि न्याय्य अधिकार मिळून त्यांचें स्वत्वहि–न्याय्य स्वत्वहि–ज्यांत राखलें जाईल, अशा स्वराज्यास आम्हीं आपली निष्ठा अर्पण करूं. किंबहुना हिंदु संघटनाचें हेंच ध्येय आहे, हें पूर्वीच आम्हीं सांगितलें आहे. परंतु पदोपदीं जातीय अपमानानें माना खालीं घालावयास लावणाऱ्या वर वर्णन केलेल्या मुर्दाड आततायी अटींवरच जी ऐकी आणि जें स्वराज्य मिळूं शकतें, त्याचा आम्हीं हिंदू शतवार धिक्कार करितों. या मुर्दाड आणि आततायी अटी आजच्या त्यांच्या परतंत्र आणि पतित स्थितींतहि घालण्यास जे मुसलमान कमी करीत नाहींत, ते त्या अटीप्रमाणें आम्ही वागलों तरी स्वराज्य मिळाल्यानंतर तेच मुसलमान सबळ आणि स्वतंत्र झाले असतां यांहूनहि भयंकर अटी घालीत आणि हिंदूंस दडपीत, त्या स्वराज्यास औरंगजेबी बादशाहीचें स्वरूप देण्यास थोडेच कचरणार आहेत ? मुसलमान होऊन जें मिळतें तेंच जर स्वराज्य म्हणावयाचें तर मग एवढा उपद्याप तरी कां करा ? आज ख्रिश्चन होतांच आणि विना अट दास्यत्व स्वीकारतांच इंग्रजी राज्यही स्वराज्य–स्वधर्मी राज्य–होणारें आहे.

छेः छेः अशा अटींवर मिळणारें हिंदुस्थानचें राज्यच काय पण इंद्राचें राज्य देखील आम्हांस नको आहे. **हिंदू राहून आम्हांस स्वतंत्र व्हावयाचें आहे आणि हिंदुत्वहि पण राखावयाचें आहे. ज्यांत आमचें हिंदु स्वत्व राहील तें स्वराज्य !**

तें हिंदुत्व आम्हीं विकूं ? शिवाजी आणि प्रताप, संग आणि पृथ्वीराज, ह्यांचें जन्म जसे कांहीं झालेच नाहींत ! पानिपतला मराठ्यांची दोन लाख बांगडी जशी कांहीं फुटलीच नाहीं ! भाऊसाहेबांच्या घणानें दिल्लीचें सिंहासन जसें कांहीं चूर्ण केलें गेलेंच नाहीं ! गुरु गोविंदसिंगाचे वीरतनय जसे कांहीं भिंतींत चिणून मारले गेलेच नाहींत आणि वीरबंदानें सूड उगविलाच नाहीं ! जसें कांहीं मुसलमानांचीं होतीं तीं प्रचंड साम्राज्यें हिंदूच्या पराक्रमाचा घोडा आपल्या टापाखालीं तुडवीत त्याचा चक्काचूर झालेल्या धुळीवर रामेश्वरापासून

अटकेपर्यंत आणि अटकेपासून काबुल नदीपर्यंत अप्रतिहतपणें नाचत गेलाच नाहीं. त्या अितिहासाचें अेक पान, अेक ओळ, अेक आठवण तरी जोंपर्यंत आमच्या रक्तांत रुजलेली आहे तोंवर तरी, हिंदु लोकांस असल्या अपमानास्पद आणि निर्लज्ज अटी स्वीकारण्याचे कारण नाहीं. **मुसलमानहो,** अेकी हवी असेल–तुम्हांस हवी असेल, तर या. स्वत्व रक्षण ज्यांत होअूं शकेल—तुमचें आणि आमचें दोघांचेंहि–त्या स्वराज्यास स्थापूं या आणि अेकी करूं या. पण तसें नसेल तर, जा, काय वाटेल तें करा जा. आम्हीं हिंदु तुमच्या अेकीवांचूनहि जिवंत राहूं शकतों, जसा शिवाजी तुमच्या अेकीवांचून जिवंत राहूं शकला. आम्हीं हिंदु अेकटे स्वतःच्या सामर्थ्यानें तुमच्याच नव्हे तर अिंग्रजांच्याहि पारतंत्र्यांतून मुक्त होअून स्वराज्य स्थापूं शकूं–जसें ग्रीकांच्या हातून मुक्त होअून यशोवर्मन् स्थापूं शकला. तो कांहीं जिनांच्या सहानुभूतिसाठीं थांबला नव्हता, हसन निजामीच्या नीच जाळ्यांत फसला नव्हता, मोपल्याच्या गुंडशाहीस भ्याला नव्हता किंवा आपल्या कन्यका विकून अेकी खरेदी करणाऱ्या शहाण्या गाढवपणास राजनीति म्हणून समजत नव्हता. त्यानें ग्रीकांच्या सम्राटांच्या मुली घेतल्या, आपल्या दिल्या नाहींत ! त्या चंद्रगुप्ताचें, यशोवर्म्याचें आणि भाअूंचे आम्हीं हिंदु वंशज आहोंत. आम्हीं तसेच संघटित होअूं. आणि वेळ पडली तर अेकटे झुंजून, अेकटे मरून, अेकटे मुक्त होअूं–स्वतंत्र होअूं ! कारण आम्हां संघटनवाद्यांचा हा सिद्धांत आहे कीं, ज्यांत स्वत्व अबाधित राहतें तेंच स्वराज्य अिष्ट आहे आणि असें स्वराज्य हिंदु मुसलमानांची अेकी झाली नाहीं तर मिळणारच नाहीं, हा पंढपणाचा महामंत्र आमूलाग्र भ्रामक आहे !!!

—श्रद्धानंद, ५–५–२७

# स्वराज्यासाठींच संघटन हवें

## [ भाग २ रा ]

## वेळच पडली तर अेकटे हिंदु देखील स्वराज्य मिळवूं शकतील

**स्वराज्यासाठींच** संघटन हवें या लेखाच्या पूर्वार्धांत आम्हीं हें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, स्वराज्याची खरी व्याख्या केवळ भौगोलिक नसून सांस्कृतिक असली पाहिजे. स्वराज्य म्हणजे या हिंदुस्थान देशाचें राज्य अितकाच अर्थ घेअून चालावयाचें नाहीं. हिंदुस्थानची भूमि ही तर आमची भूमि आहेच. ती आम्हांस प्रिय आहेच. पण ती प्रिय अेवढ्यांचसाठीं आहे कीं, ती आमची पितृभूमि आणि पुण्यभूमि आहे. म्हणजे आमच्या हिंदुसंस्कृतीचें तें सनातन अधिष्ठान आणि आमच्या हिंदुराष्ट्राची ती जननी आणि धात्री आहे, म्हणून ती प्रिय आणि पूज्य आहे अर्थात् जर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यांत आणि स्वराज्यांत आमच्या हिंदु संस्कृतीचें आणि हिंदु राष्ट्राचें स्वातंत्र्य आणि स्वराज्य समाविष्ट होणें शक्य असेल, तरच तें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य म्हणजे आमचें स्वातंत्र्य आणि हिंदुस्थानचें स्वराज्य तें आमचें स्वराज्य होअूं शकेल. नाहींतर केवळ हिंदुस्थान देशाचें स्वातंत्र्य म्हणजे आमचें स्वातंत्र्य किंवा स्वराज्य होअूं शकत नाहीं. पूर्वी मोंगल बादशाहीच्या वेळींहि हिंदुस्थान देश हा मुसलमानी दृष्टीनें स्वतंत्रच होता. आणि जागतिक राष्ट्रमंडळानें त्याचें स्वराज्यहि मानिलेलेंच होतें. पण तें स्वराज्य 'आमचें स्वराज्य , नसून तें मुसलमानी राज्य होतें. आज अिंग्रजहि हिंदुस्थानास ब्रिटिश साम्राज्याचा अंतर्गत भूभाग म्हणून, त्या साम्राज्याच्या स्वतंत्रतेच्या भाषेंत तो स्वतंत्रच आहे, असें म्हणूं शकतील– म्हणूं पाहतात देखील. पण म्हणून तें स्वातंत्र्य आमचें स्वातंत्र्य होअूं शकतें कीं काय ? तेव्हां अुद्यां हिंदुस्थानदेश अिंग्रजांचे हातून सुटून योगायोगानें येथील मुसलमानांचे हातीं आला, तर भौगोलिक अर्थानें त्यास स्वतंत्र किंवा स्वराज्यशाली म्हणून जरी म्हणतां आलें; तरी आम्हांस तो औरंगजेबाचे हातीं असतांना जितका परतंत्र आणि

परराज्यदलित वाटत असे तितकाच वाटणार; कारण त्यांत आम्हां हिंदूंचें स्वत्व सुरक्षित राहणारें नसल्यानें आम्हां हिंदूंची संस्कृति परसंस्कृतीच्या राक्षसी अत्याचाराखालीं क्वचित् आजच्याहूनही अधिक चिरडली जाणारी असल्यानें आम्हांस हिंदुस्थानचें केवळ भौगोलिक स्वातंत्र्य आणि स्वराज्य, पारतंत्र्य आणि परराज्यच वाटणारें आहे. अेतदर्थ खरें स्वराज्य तेंच कीं, त्यांत आम्हां हिंदूंची ही हिंदुस्थानची पितृभूमि, भौगोलिक अर्थींच नव्हे तर सांस्कृतिक अर्थींहि स्वतंत्र आणि स्वराज्यशाली होअू शकेल. तेंच स्वराज्य कीं, ज्यांत हिंदूंचें स्वत्व संरक्षित आणि वृद्धिंगत होअू शकतें. ज्या स्वराज्यासाठीं आमच्या पिढ्यान् पिढ्या आम्हीं हिंदु लोक झटत आणि झुंजत आलों तें स्वराज्य म्हणजे या हिंदुस्थानांत हिंदूंना आपलें हिंदुत्व न गमवितां आपल्या हिंदु संस्कृतीचा ध्वज विजयानंदानें फडकवित ठेवतां येअील असलें भारतीय, साम्राज्य होय. त्या साम्राज्यांत भारतामधील अितर संस्कृतींसहि न्याय्य अधिकार अुपभोगितां येतीलच. त्यांचेंहि स्वत्व त्यांत न्याय्य त्या प्रमाणानें अबाधित राहीलच. पण आम्हां हिंदूंचेंहि स्वत्व त्या अितराप्रमाणेंच निर्भयपणें आपले मस्तक कोणापुढेंहि न वाकवितां या भारतभूमींत नांदेल. स्वराज्याची ही सांस्कृतिक व्याख्या आम्हांस अभिप्रेत असल्यानें त्या स्वराज्यासाठीं जेव्हां कोणी मुसलमानादिकांशीं अेकी करण्याचे वेडांत त्या स्वत्वाचाहि बळी देअू लागतो, तेव्हां आम्हीं त्याचा तीव्र प्रतिवाद आणि प्रतिकार करून सांगतो कीं, 'ज्यांत स्वत्व राहील तें स्वराज्य. जें स्वराज्य हिंदूंच्या स्वत्वाचा मुसलमानी अेरेरावीपुढें बळी देअून असल्या अेकीनें साधलें जातें तें स्वराज्य नसून तें मुसलमानी राज्य आहे! तें आम्हांस अिंग्रजी राज्याहून हानिकारक आणि घृण्य वाटतें. अशा अेकीचा आणि स्वराज्याचा आम्ही शतवार धिक्कार करितों!'

पण पुष्कळ प्रामाणिक माणसांना याविषयीं विचार करीत असतां असें भय पडतें कीं, जर आपण आपल्या हिंदु स्वत्वास्तव मुसलमानांची अेरेरावी चालू दिली नाहीं, जर आम्हीं शुद्धि, संघटन अित्यादि चळवळी मुसलमानांना त्यांचा राग येत असतांहि चालविल्या तर अेकी बिघडेल आणि हिंदु-मुसलमानांची अेकी झाली नाहीं तर स्वराज्य—कोणत्याहि प्रकारचें स्वराज्य—मिळणें अशक्य होअील! तेव्हां आतां या दुहेरी संकटांतून मार्ग कसा काढावा? अेकी केली तर मुसलमनांच्या आकांक्षा हिंदुस्थानांत

मुसलमानी राज्य स्थापन झाल्यावांचून तृप्त होणाऱ्या नसल्यानें मुसलमानांच्या ताटाखालीं मांजरें होअून रहावें लागणार ! अेकी न केली तर स्वराज्य मिळणें असंभव होअून इंग्रजांचे पायाखालील पादपीठ होअून रहावें लागणार, याला तोड काय ?

तीच तोड सुचविण्याचा हेतु ह्या लेखांकाचा आहे. तर वर वर्णिलेल्याप्रमाणें ज्या आमच्या हिंदु बांधवांना हें दुहेरी संकट भेडसावतें, त्यांच्या विचारसरणींत अेक जो मोठा हेत्वाभास गर्भित झालेला असतो, तोच त्यांस हें संकट दुहेरी आहे असें भासवितो. तो हेत्वाभास हाच होय कीं हिंदुमुसलमानांची अेकी झाली नाहीं तर स्वराज्य किंवा स्वातंत्र्य मिळणेंच अशक्य आहे, ही गोष्ट ते अुपजतच गृहीत धरितात. त्या हेत्वाभासाच्या पाशांतून आपल्या बुद्धीची मुक्तता करण्यांतच या दुहेरी संकटांतून सोडविणारी तोड सांपडणार आहे.

ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं कीं, जर मुसलमानांच्या मनांतहि राष्ट्रीय भावाचा प्रबळ अुदय होता आणि तेहि समसमान अधिकारांवर संतुष्ट राहून, आपल्या आणि आमच्या, दोघांचेहि स्वत्वास न गमवितां, केवळ हिंदुस्थानी केवळ राष्ट्रीय अशा स्वराज्यास स्थापन करण्याचे कार्यी आम्हांसह झटते, अेक होते, तर स्वराज्य लवकर मिळूं शकते, तर फार अुत्तम होतें. परंतु अिंग्रज लोकहि जर आपण होअून हिंदुस्थानांतून चालते होते किंवा हिंदुस्थानास परतंत्र करण्यास येतेच ना, तर त्याहूनहि अुत्तम होतें ! परंतु आतां प्रश्न ‘ काय झालें असतें तर अुत्तम होतें ’ हा नाहीं आतां प्रश्न काय होतें याचा नसून ‘ काय आहे, ज्या परिस्थितीचा पेंच पडूं नये, पण येअून पडला आहे, त्या परिस्थितीस तोंड कसें द्यावें हा प्रश्न आहे.

आतां ही गोष्ट अगदीं स्वयंसिद्ध झाल्यासारखीच आहे कीं, हिंदुस्थानचें राज्य सोडून अिंग्रज लोक आपण होअून कांहीं परत जात नाहींत, तसेंच मुसलमानहि त्यांच्या हिंदुस्थानांत अिस्लामी राज्य स्थापन करण्याच्या राक्षसी अुपायांनींहि हिंदूंस मुसलमान करून, हिंदुस्थानास मुसलमानमय बनविण्याच्या आकांक्षा आपण होअून कांहीं त्यागित नाहींत. व्यक्तींचा प्रश्न नाहीं; समाजाचा प्रश्न आहे. मुसलमानी समाज कितीहि ‘ हांजी हांजी ’ केली तरी अिंधनाबरोबरच वाढणाऱ्या आगीप्रमाणें, जों जों मअू द्याल तों तों कोंपरानें

खणण्यास मागें घेत नाहीं, हत्या, स्त्रिया पळविणें, दंगे करणें, गांवेंचीं गांवें अुध्वस्त करणें, बलत्कारानें वाटेल तें चलणें, त्याचप्रमाणें हिंदूंच्या सर्वमान्य पुढाऱ्यांच्या प्राणांभोंवतीं यमदूत होअून घिरट्या घालणें, धमक्या देणें, या साधनांनीं हिंदु संस्कृति अुध्वस्त करण्याचे रानटी अत्याचार या विसाव्या शतकांत हिंदुस्थानांत मुसलमानांकरवीं प्रत्यहीं आणि प्रत्यक्ष घडत असतां मुसलमानी समाजानें किंवा संस्थेनें त्यांचा निष्कपट निषेध केला नाहीं. तसा निषेध करणें त्यांस त्यांच्या विपर्यस्त धर्मवेडाच्या धुंदींत शक्य नाहीं, ही वस्तुस्थिति आहे. **तेव्हां हिंदु मुसलमान अेक होते तर किती बरें झालें असतें, ही वेडगळ लालसा 'अिंग्रज हिंदुस्थानांत आलेच नसते तर किती बरें झालें असतें' या लाळघोट्या लहाडीपणासारखीच आम्हां हिंदूंनीं लाथाडून दूर फेकून दिली पाहिजे.**

मुसलमान हे ज्यांत हिंदूंचेंहि स्वत्व अक्षुण्ण राहूं शकेल अशा स्वराज्याच्या स्थापनेच्या कार्यांत अेक होत नाहींत. पण हिंदूंस स्वराज्य तर स्थापावयाचें आहे. अेक हिंदु जोंवर जिवंत आहे तोंवर ही पितृपरंपरागत आकांक्षा, हें राष्ट्रीय ध्येय मरत नाहीं. मग ह्यास अेकच अुपाय आहे कीं, हिंदूंनीं आपल्या स्वतःचे बळावर आपल्या स्वतःच्या हातानें तें स्वराज्य हिसकावून घेतलें पाहिजे. तसें तें हिसकावून घेणें अशक्य आहे? होय, सध्यांच्या हिंदु समाजाच्या आत्मविस्मृत असंघटित स्थितींत तें अशक्य नसलें, तरी फार दुर्घट आहे परंतु जर हा हिंदु समाज, हें महान् हिंदु राष्ट्र, थोडेंबहुत संघटित आणि आत्मावलंबी झालें, तर तें दुर्घट कार्यहि साध्य होईल. ह्यासाठींच आम्ही म्हणतों कीं, स्वराज्यासाठींच संघटन हवें. कारण संघटित हिंदु राष्ट्र वेळच पडली तर–आणि ती वेळ पडलीच आहे!—अेकटें झुंजूनहि स्वराज्य मिळवूं शकेल.

तें कसें याचें विवेचन करण्यापूर्वीं प्रथम थोडक्यांत हें पाहूं कीं जगतांत ज्या ज्या देशांनीं स्वातंत्र्य किंवा स्वराज्य प्रस्थापित केलें त्यांनीं तें आपलें

## राष्ट्रीय स्वातंत्र्य कोणाच्या बळावर संपादन केलें?

इटली, अमेरिका, जर्मनी किंवा अगदीं आपल्या इकडचें शिवाजीच्या वेळचें महाराष्ट्र, यांनीं स्वातंत्र्ययुद्धें केलीं तीं काय त्या त्या देशांतील अगदीं

अेकूण अेक मनुष्य, देशभक्त आणि स्वातंत्र्येच्छु होअून असें राष्ट्रचें राष्ट्र अेकमुखानें आणि अेक हस्तानें समरांत अुतरून केलीं ? मुळींच नाहीं.

पारतंत्र्य आहे तोंवर कोणत्याहि राष्ट्रांत अगदीं संपूर्ण अेकी नांदणें शक्यच नाहीं. अेकूणअेक मनुष्य जेथें स्वातंत्र्येच्छु आणि स्वातंत्र्यास्तव स्वार्थत्याग करणारा होतो तें राष्ट्र परतंत्रच नसतें. खरी राष्ट्रीय अेकी स्वातंत्र्यसंपादना-नंतरच घडली तर घडते. पारतंत्र्य आहे तोंवर राष्ट्रांत बेकी असणारच. दास्य-सुलभ कापुरुषता, राष्ट्रद्रोह, बजबजपुरी या दुर्गुणांचा पूर्ण अुच्छेद, पारतंत्र्य आहे तोंवर कोणत्याहि राष्ट्रांत झालेला नाहीं, होणें शक्य नाहीं. **मग हीं राष्ट्रें जीं स्वतंत्र झालीं तीं कशाच्या बळावर? अखंड अेकीच्या नव्हे, बहुमताच्या बळावरहि नव्हे तर त्या त्या राष्ट्रांतील परिणा-मकारक अल्पमताच्या बळावर.** जे कांहीं लोक संघटनेच्या आणि उत्कट स्वातंत्र्यवीरत्वाच्या बळावर कर्तव्यसमरांत अुतरले आणि कृतनिश्चयानें झुंजले, त्या मूठभर लोकांनीं आपआपलीं राष्ट्रें स्वतंत्र केलीं आहेत. पुष्कळ अुदासीन होते. पुष्कळ विरुद्ध होते, पुष्कळ शत्रुपक्षास मिळत होते, तरीहि त्या सहस्रांमागें अेक जो, शिर हातावर घेअून अुठे, तो तशा आणखी कांहीं निश्चयी वीरांसह लढून राष्ट्रस्वातंत्र्य मिळवित आला. अमेरिकेंत शेंकडों लोक इंग्रजांचे बाजूचे होते, अिटलींत तर प्रांत प्रांतांशीं उघडपणें लढत आणि नेपल्सची पिडमॉंट आणि पिडमॉंटची रोम, कत्तल करीत चालले होते. तरीहि ही यादवी आंत आणि परशत्रू पुढें अशा दुहेरी सामन्यांत त्या राष्ट्रांतील मूठभर स्वातंत्र्यवीरांनीं तीं राष्ट्रें स्वतंत्र नि संयुक्त राष्ट्रें केलीं. शिवाजी अुठला तेव्हां काय महाराष्ट्र माणसामाणसापर्यंत अेक होता? मुसलमान तर तेव्हां शत्रू होतेच; पण हिंदूंत, मराठ्यांत शेकडों त्याचेविरुद्ध होते, सहस्रों अुदासीन होते. प्रत्यक्ष मामे आणि काके देखील अेक नव्हते; मग अितरांची कथा काय? परंतु बहुमताच्या मृगजळाला न भुलतां अल्पमत संघटित करितां आलें, त्या बळावर त्यानें काम करून दाखविलें. हा सिद्धांत आहे कीं, 'सर्वचे सर्व राष्ट्र दास्यत्वाचें विष अंगांत पिढ्यान् पिढ्या मुरलेलें असतां अकस्मात् स्वातंत्र्यप्रवण होत नाहीं. यादवीस आणि परशत्रूस अेकसमयावच्छेदें तोंड देअून

**अर्थं वा साधयेत्, देहं वा पातयेत्, अशा निष्ठेचा अेक यथा-**

**प्रमाण अल्पसंख्यांक संघ स्वातंत्र्य–समरांत उडी घेऊन राष्ट्र स्वतंत्र करितो.**

बहुसंख्या मग अनुकूल होते. अर्थातच ही अल्पसंख्या अत्यल्प असून अुपयोगी नाहीं. म्हणूनच आम्हीं यथाप्रमाण–म्हणजे ज्या मानानें शत्रूसंख्या असेल त्या मानानें असली म्हणजे झालें असें म्हटलें आहे.

हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांतहि हाच नियम ध्यानांत ठेविला पाहिजे तीस कोटि अेक होतील आणि मग आपण स्वातंत्र्य मिळवूं, असें म्हणणें म्हणजे घरोघर चरखा फिरविला गेला कीं, अेका वर्षांत स्वातंत्र्य मिळवूं, असें म्हणण्याअितकेंच अशक्य आणि म्हणूनच हास्यास्पद आहे. जेव्हां केव्हां हिंदुस्थान स्वतंत्र होईल तेव्हां तो, बहुसंख्या त्याच्या स्वातंत्र्यार्थ स्वार्थत्याग करण्यास सिद्ध झालेली आहे म्हणून होणार नाहीं. कारण परतंत्र देशांत बहुसंख्या सदोदित अशीच दरिद्री म्हणूनच राष्ट्रीय दृष्टीनें निर्बळ, पापी, दास्यप्रवण, असंघटित आणि भ्याड असणारच. कोणचा तरी संघटित, निर्भय आणि कृतनिश्चयी स्वातंत्र्य–वीरांचा अल्पसंख्याक संघच–यथाप्रमाण अल्पसंख्याक संघच, हिंदुस्थानचें स्वातंत्र्य, अितरांची वाट न पहातां आणि अितरांशीं सामना देत जेव्हां हिंदुस्वातंत्र्यार्थ कर्तव्यसंगरांत उतरेल, तेव्हांच हिंदुस्थान स्वतंत्र होईल.

आतां अशी अल्पसंख्या हिंदुस्थानांतील कोणत्या जातींत वा पंथांत संघटित करणें अधिक सुलभ आहे? मुसलमानांत का हिंदूंत? अेखाद दुसरा मुसलमान राष्ट्रीय वृत्तीचा असेल; पण सहस्र मुसलमानांत अेरेबियास पुण्यभूमि मानणारे मुसलमान अधिक असलेच पाहिजेत. खलिफाविरुद्ध हिन्दुस्थान लढलें तर आम्ही खलिफाच्या वतीनें हिन्दुस्थानाशींच लढूं, कारण तो आमचा धर्म आहे; अफगाणिस्थानच्या नेतृत्वाखालीं मुसल्मानी सत्ता हिंदुस्थानांत स्थापन झाली तर ती गोष्ट अिस्लामी गौरवाचीच असल्यानें आम्हीं आमच्या मुसलमानी झेंड्यावर हिंदूंचे वतीनें आघात करणार नाहीं; हिंदूंच्या मुली जर कोणी मुसलमानानें–मोपल्यांनीं पळविल्या तशा पळवून आणि गांजून मुसलमान केल्या तरी आम्हीं त्या मुसलमानांचा गौरवच करूं; आणि त्यांतील जर अेखादी हिंदु मुलगी पुनः हिंदु नेअूं लागले तर तिला आम्हीं जाअूं न देतां लारखान्याप्रमाणें हिंदूंची अुभी वस्तीची

वस्ती त्रेचिराख करूं; असें म्हणणारे मुसलमानच नअूशें नव्याणव निघतील, ही अनुभवाची गोष्ट आहे. मुसलमानीं शास्त्राप्रमाणेंच जगताच्या अमुसलमानी तुकड्यांत हिंदुस्थान पडत आहे. त्यांत जोंवर हिंदु लोक आहेत तोंवर, किंवा त्यावर मुसलमानी राजसत्ता चालू झाली नाहीं तोंवर, तो हिंदुस्थान मुसलमानांस राहण्यास पवित्र भूमि होअूं शकत नाहीं. तो त्यांचा देश होअूं शकत नाहीं. जर या सर्व हिंदूंना ते मुसलमान करूं शकले किंवा जर या राष्ट्रावर कोणत्याहि कां होईना पण मुसलमानाची सत्ता स्थापूं शकले तरच, या हिंदुस्थानावर ते स्वराष्ट्राप्रमाणें प्रेम करूं शकतील, ही वस्तु-स्थिति आहे.

आतां हिंदूंची स्थिति पहा. हिंदुस्थान हीच त्यांची पितृभूमि, हीच पुण्यभूमि. त्यांच्या सहस्रांत नअूशें नव्याणव अुपजतच तिच्यावरच प्रेम करण्यास शिकण्या-सारखे असणारच. राष्ट्राची कल्पना येतांच ते स्वयमेवच सांगतील कीं, "हेंच आमचें राष्ट्र ! हाच आमचा देश !" **हीहि वस्तुस्थिति आहे. येथें कल्पनेचें कांहीं नाहीं.**

तर मग हिंदुस्थानच्या राष्ट्र–स्वातंत्र्य–संपादनार्थ जें कृतनिश्चयी, विश्वासु आणि सुसंघटित अल्पसंख्याक राष्ट्रवीरांचें दळ अुत्पन्न करावयाचें, ते अल्पाया-सांत, सापेक्षतः थोड्या परिश्रमांत कोठें अुत्पन्न करतां येणें अधिक संभवनीय आहे ? मुसल्मानांची धर्मान्धता दूर करण्यास कितीहि झटलें तरी ते जोंवर मुसलमान आहेत तोंवर, हिंदुभू त्यांची पुण्यभू होअूं शकत नाहीं. त्यांची प्रीति नेहमींच द्विधा राहणार. हिंदु, जोंवर तो हिंदु आहे तोंवर, तिलाच पितृभू आणि पुण्यभू म्हणणार. त्याची धर्मांधता ही त्याची राष्ट्रप्रीति अुत्कट करण्यासच कारणीभूत होणार ! हिंदुस्थानचा हिंदु राष्ट्र हा मुख्य पाया आहे. हिंदुस्थानचाच नव्हे पण हिंदी राष्ट्राच्याहि ज़ीवनगंगेचा मुख्य ओघ, हिंदु जाति हा आहे; जसा तुर्कस्थानचा तुर्कजाति आणि अमेरिकेचा अँग्लो सॅक्सन. मुसलमान, पारशी, ज्यू अित्यादि आमच्या देशबंधूच्या संस्कृतीचे ओघ पुढें मागें तिला मिळतात; पण तीं त्या जीवनगंगेची अुपांगें आहेत. त्यांच्या मिळण्यापूर्वी आणि ते सुकल्यानंतरहि, हिंदु जाति हीच हिंदुस्थानी राष्ट्र-गंगेचें मुख्य जीवन होतें–आहे–राहील. तेव्हां या हिंदी राष्ट्राचे स्वातंत्र्यार्थ आणि स्वराज्यार्थ अढळ निर्धारानें आणि अनन्य निष्ठेनें झुंजणारी ती यथा-

प्रमाण अल्पसंख्या या हिंदु जातींतच अुत्पन्न होणें अधिक संभवनीय आणि अधिक द्रुततर साध्य आहे, हें सत्य सूर्यप्रकाशाअितकें स्पष्ट आहे.

अेतदर्थ अशी कृतनिश्चयी अल्पसंख्या अुत्पन्न करण्यासाठीं जे प्रयत्न करावयाचे, ते हिंदुजातींतच विशेषतः केले पाहिजेत. अितर कोणत्याहि जातीस, हिंदी राष्ट्राच्या कोणत्याहि अहिंदु घटकांस निष्कारण धिक्कारून नव्हे, त्याची अन्यायानें मृगया करण्याकरितां नव्हे, तर हिंदी राष्ट्राच्या हितार्थ ज्या कोण्या जातींतून अधिकांत अधिक सैनिक, शीघ्रांत शीघ्र अशा अवधींत भरती करतां येतील, त्या त्या जातींतून ते भरती करून घेणें, हें राष्ट्रीय दृष्टयाहि अपरिहार्य कर्तव्यच ठरत असल्यानें सर्वप्रथम हिंदु जातींतच स्वातंत्र्य–वीरांची सेना उत्पन्न करण्यासाठीं प्रचंड जागृति आणि प्रबळ संघटना करणें अवश्य आहे, असें न्यायाचें राजनीतीचें आणि व्यवहार-पटुत्वाचेंहि आग्रहाचें सांगणें आहे.

प्रत्येक देशास पारतंत्र्यांतून सोडवून स्वतंत्र करण्याचें कार्य अंती तेथील निर्धारी आणि वीर्यशाली अशा यथाप्रमाण अल्पसंख्येलाच करावें लागतें. तशी स्वातंत्र्य–वीरांची अल्पसंख्या हिंदी राष्ट्राच्या विशिष्ट परिस्थितींत हिंदु जातींतच सापेक्षतः कमी प्रयत्नांत आणि अधिक द्रुततेनें अुत्पन्न आणि सुसज्ज होअूं शकणार आहे आणि ती तशी अुत्पन्न व्हावी म्हणूनच संघटन हिंदुराष्ट्रांतील सुप्त शक्तीस जागृत करून त्यास सबळ, संघटित आणि अन्यायाचा प्रतिकार करण्यास सक्षम करण्याचे यत्न करूं निघालें आहे. अेतदर्थेच आम्हीं म्हणतों कीं, ज्या अर्थी वेळ पडली तर हिंदु अेकटे लढून देखील आपलें स्वातंत्र्य आणि स्वराज्य स्थापूं शकतील हें सत्य आहे, **त्या अर्थी हिंदुसंघटन हें स्वराज्याचेंच एक अत्यंत परिणामकारक साधन आहे. स्वराज्यासाठींच संघटन हवें आहे.**

—श्रद्धानंद, २–६–२७

# खड्गा, तुझा विजय असो !

नैतिक कृत्य कशाला म्हणावें या संबंधाच्या अुहापोहांत स्थल नि काल यांच्या अभावास्तव मी खोल शिरूं अिच्छित नाहीं. नीतीचें शास्त्र आत्मस्फूर्तीनें, साक्षात्कारानें किंवा व्यवहाराच्या सोयीनें कोणत्याही तत्त्वावर अधिष्ठित झालेलें असो, तथापि त्याची जी व्यावहारिक बाजू, जी सर्व नीतिशास्त्रवेत्ते अेकमुखानें मान्य करतात नि जिच्या योगानें नीति कोणती आणि अनीति कोणती, सद्‍गुण दुर्गुणाहून वेगळा कसा, किंवा चांगलेवाअीट कोणतें हें ठरविलें जातें ती कसोटी केवळ व्यावहारिक गोष्टीवर अधिष्ठित केलेली आहे. ती म्हणजे ही कीं, मानवी जीवनाला जे जे विचार किंवा आचार अुपकारक होतील त्या त्या सर्वांना नीति किंवा सद्‍गुण म्हणावें आणि त्याच्या विरोधी जें जें असेल त्याला अनीति किंवा दुर्गुण समजावें. हाच न्याय सर्व नीतिशास्त्रवेत्त्यांनीं मान्य केलेला आहे. याचाच अर्थ नीतीची कल्पना मानवी जीवनावरच मुख्यतः अधिष्ठित आहे. या अगदीं व्यावहारिक आणि पुन्हां पूर्णपणें पायाभूत कसोटीस अनुसरून पाहतां ज्या आत्यंतिक अहिंसावादांत अन्याय्य आक्रमणाविरुद्धही केला जाणारा सशस्त्र प्रतिकार त्याज्य ठरविला जातो तें अहिंसेचें तत्त्वज्ञान अगदींच अव्यवहार्य, मानवी जीवनाला घातक आणि म्हणून पूर्णपणें अनीतिमय असेंच मानिलें पाहिजे. लहान मुलें निजलेलीं असतां त्यांच्यामध्यें अेकादा साप शिरला, किंवा लोकांची जत्रा जमली असतां त्यामध्यें अेकादा पिसाळलेला कुत्रा अेकदम घुसला, तर तुम्ही त्याला मारूं शकत असतांही केवळ आत्यंतिक अहिंसेच्या तत्त्वज्ञानास अनुसरून तुम्ही त्यास ठार मारलें नाहीं तर तुम्ही प्राणघातक हिंसेलाच आपल्या कृत्यानें प्रोत्साहन देतां असें होतें. कारण तुमच्या त्या कृत्यानें तो साप किंवा पिसाळलेला कुत्रा माणसांना चावून ठार मारतो. यामुळें अेका सापाचा किंवा कुत्र्याचा जीव वाचविण्याकरितां तुम्ही अनेक माणसांचे जीव वांचविण्याचे टाळतां आणि त्याला आपल्या सोयीप्रमाणें आणि सवडीप्रमाणें अनेक माणसांचे जीव घेण्यास स्वतंत्र ठेवतां. अशा रीतीनें

दुहेरी पापाचे तुम्ही धनी होतां. याच्या अुलट जर, तुम्ही तो कुत्रा किंवा साप त्या क्षणी ठार मारिला तर कोणाही जीवाचा कोणत्याही कारणाकरितां केव्हांही वध करावयाचा नाहीं या तुमच्या तत्त्वाच्या विरोधी वर्तन केल्याचें पाप तुम्हांला लागलें. या अेकाच अुदाहरणावरून आत्यंतिक अहिंसेचें तत्त्व हें केवळ अव्यवहार्य मानवी जीवनाला घातक, आणि म्हणून पूर्णपणें अनीतिकारक आहे असें सिद्ध होतें. जी गोष्ट वैयक्तिक बाबतींत लागू पडते तीच राष्ट्रांच्याही बाबतींत लागू पडते. हेंही लक्षांत ठेवावें कीं, जे धर्म अनत्याचार, अहिंसा, अित्यादींचा आत्यंतिक गुणगौरव करतात त्यांनासुद्धां या नियमांना अपवाद करावे लागले आहेत. कोणत्याही प्रकारच्या अन्याय्य आक्रमणाविरुद्ध केल्या जाणाऱ्या सशस्त्र प्रतिकाराचा निषेध ते करीत नाहींत नि असा निषेध करणें हा खऱ्या अहिंसेचा गुणही होअू शकत नाहीं.

## मर्यादित अहिंसा हा गुण; आत्यंतिक अहिंसा हें पाप !

तथापि, मर्यादित अहिंसा मात्र अेकंदरीनें मानवी जीवनाला अत्यंत अुपकारक असल्यामुळें तो अेक मोटा गुण असून आपले वैयक्तिक किंवा सामाजिक जीवन, किंबहुना आपल्या सर्व सामाजिक सुखयोयी त्यावरच आधारलेल्या आहेत पण कोणत्याही काळीं किंवा प्रसंगीं पाळावयाची आत्यंतिक अहिंसा ही वैयक्तिक किंवा राष्ट्रीय स्वरूपाच्या मानवी जीवनाला अत्यंत हानिकारक असून ती अनीतिकारकही आहे नि म्हणून ती त्याज्य ठरविली पाहिजे. ज्या नीतिशास्त्रवेत्यांनीं समर्याद अहिंसेला अेक मोठा सद्‌गुण म्हणून मानलें त्यांनींच आत्यंतिक स्वरूपाच्या अहिंसेला त्याज्य समजून तिचा निषेध केला आहे.

## जैनबौद्धांची अहिंसा गांधींहून वेगळी !

बौद्ध धर्मानें किंवा जैन धर्मानें जें अहिंसाधर्माचें प्रतिपादन केलें आहे तें गांधीजींनीं प्रतिपादिलेल्या सर्व प्रकारच्या परिस्थितींत सशस्त्र प्रतिकाराचा निषेध करणाऱ्या आत्यंतिक अहिंसाधर्माशीं, अगदीं विरोधी आहे. ज्या जैन लोकांनीं राज्यें स्थापन केलीं, वीर आणि वीरांगना निर्माण केल्या, जे समरभूमीवर शस्त्रानें लढले आणि ज्या जैन सेनापतींनीं जैन सैनिकांचीं सैन्यें लढविलीं त्यांचा जैन आचार्यांनीं कोठेंही नि केव्हाही निषेध केला नाहीं ही अेकच गोष्ट त्यांची अहिंसा गांधीवादी वाणेरड्या अहिंसेहून वेगळी होती. असें सुचविते किंबहुना अन्याय्य आक्रमणाचा सशस्त्र प्रतिकार करणें नुसतें न्याय्यच नव्हे तर,

आवश्यक आहे असें जैनधर्मानेंही अुघडपणें प्रतिपादिलें आहे, जर अेकादा सशस्त्र नि आततायी मनुष्य अेकाद्या साधूची हत्या करूं लागला तर त्या साधूचा जीव वांचविण्यासाटीं अशा मनुष्यास ठार मारणें अवश्य असलें तर सरळ ठार मारावें; कारण अशा प्रकारची हिंसा ही अेक प्रकारें अहिंसाच होय असें म्हणून जैन धर्मग्रंथ तिचें समर्थन करतात. मनुस्मृतीमध्यें म्हटल्याप्रमाणेंच जैन धर्मग्रंथानेंही असेंच म्हटलें आहे कीं, या ठिकाणीं हत्येचें पाप जो मूळ हत्या करतो त्यास लागतें; हत्या करणाराचा वध करणारास तें लागत नाहीं. "मन्युस्तन् मन्युमर्हति ।" भगवान् बुद्धानें सुद्धां अशाच प्रकारचा अुपदेश केला आहे. अेकदां अेका टोळीचे पुढारी त्याजकडे गेले नि दुसऱ्या टोळीच्या लोकांनीं आपणांविरुद्ध आक्रमण केल्यामुळें त्यांचा सशस्त्र प्रतिकार करण्यास अनुज्ञा मागूं लागले, तेव्हां बुद्धानें त्यांस सशस्त्र प्रतिकाराची आज्ञा दिली. भगवान् बुद्ध म्हणाले, "सशस्त्र आक्रमणाच्या प्रतिकारार्थ क्षत्रियांनीं युद्ध करण्यास आडकाठी नाहीं. जर ते सत्कार्याकरितां सशस्त्र होअून लढतील तर त्यांस पाप लागणार नाहीं."

## माणसांची संरक्षक तलवार !

आपण हा निसर्गाचा नियम म्हणून समजा, किंवा अीश्वराची अिच्छा म्हणून माना, निसर्गांत अत्यंतिक अहिंसेला कोठेंहि स्थान नाहीं ही गोष्ट अगदीं सत्य आहे. नाहींतर मनुष्यप्राणी हा जिवंतच राहिला नसता, किंवा फार तर अेकाद्या भित्र्याप्रमाणें किंवा किड्याप्रमाणें कोठें तरी पृथ्वीच्या पाठीवर जीव धरून राहिला असता. परंतु त्यानें आपल्या मूळ सामर्थ्याच्या जोडीला कृत्रिम शस्त्राची जोड निर्माण केल्यामुळें त्याला आजची स्थिति प्राप्त झाली आहे. भौतिक शास्त्राप्रमाणें जेव्हां प्राण्याला मानवी जीवन प्राप्त झालें, तेव्हां त्याच्याभोंवतीं अत्यंत क्रूर पशु आणि सरपटणारे प्राणी पसरलेले होते. त्यांच्याशीं तुलनेनें पहातां केवळ व्यक्ति या नात्यानें तो अत्यंत दुर्बळ प्राणी होता. ज्या वेळीं तो प्रथम निर्माण झाला, तेव्हां त्याच्या भोंवतालीं असणाऱ्या प्रचंड अरण्यांत जगण्यासाठीं धडपड करणाऱ्या सर्व प्राण्यांत शरीरतः मनुष्यप्राणी हा अत्यंत दुर्बळ होता. त्याला विषारी दांत नव्हते किंवा सोंड नव्हती; त्याला शिंगें नव्हती किंवा तीक्ष्ण नखेंही नव्हतीं. आपण गाअीला स्वभावतःच आणि शरीरानेंही अत्यंत निरुपद्रवी आणि स्वसंरक्षणाला अत्यंत असमर्थ **असा**

**प्राणी समजतों; तथापि जर गाय आणि** मनुष्य ह्या दोघांचीही लढत जुंपली तर अशी गायसुद्धां माणसाच्या पोटांत आपली शिंगें खुपसून त्याला ठार मारील. पण मनुष्य कांहीं करूं शकणार नाहीं. मनुष्याचें मोठेंपण जर कशांत असेल तर तें आपल्या शारीरिक अवयवांना सामर्थ्य प्राप्त करून देण्याकरितां जी कृत्रिम शस्त्रें त्यानें निर्माण केली त्यांत आहे. म्हणूनच तो सर्व प्रकारच्या पशूंवर मात करूं शकला. वाघ, सिंह, हत्ती, लांडगे, साप, कांसव या सर्वांच्यावर मात करून त्यानें जमीन आणि पाणी यांवर आपले प्रभुत्व स्थापन केलें. अगदीं प्राचीन काळापासून लोहयुगापर्यंत सर्व काळांत मनुष्य अितरांवर आपला शह ठेवूं शकला, आपला विस्तार वाढवूं शकला नि या पृथ्वीचा धनी बनूं शकला तो केवळ शस्त्रांच्या सहाय्यानें. खरोखर स्वतःच्या संरक्षणाकरितां अुत्पन्न केलेली तरवार हीच माणसाची खरी रक्षणकर्ती झालेली आहे!

## निसर्ग नियम हेच शाश्वत.

आत्यंतिक अहिंसावाद मानणें नि त्यासाठीं कोठल्याही प्रकारच्या आक्रमणाच्या सशस्त्र प्रतिकाराचा निषेध करणें हें महात्मापदाचें किंवा साधुत्वाचें लक्षण नसून तें केवळ मिथ्यावादाचें आणि मूर्खपणाचें लक्षण आहे. जी गोष्ट पाशवी जगताशीं झगडा करतांना मनुष्यानें कार्यवाहींत आणली तीच गोष्ट मानवांमानवांतील झगडा करून जिवंत रहाण्यास त्यास उपयोगी पडली. अेका टोळीचा दुसऱ्या टोळीशीं, अेका वंशाचा दुसऱ्या वंशाशीं किंवा अेका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्राशीं होणारा झगडा आजपर्यंत हेंच दाखवीत आहे. अितिहासाच्या प्रत्येक पानापानांतून, अगदीं अखेरच्या पानापर्यंत अेकच गोष्ट सिद्ध झालेली दृष्टीस पडते ती ही कीं, अितर गोष्टी सारख्या असल्या तरी जीं राष्ट्रें सैनिकी दृष्ट्या सामर्थ्यवान् ठरतील तींच काय तीं जगतील. नि जीं सैनिकी दृष्ट्या कमकुवत ठरतील तीं गुलामगिरीत खितपत पडतील किंवा नामशेष होअून जातील. आपण जगाच्या अितिहासांत अेक नवें दालन अुघडणार आहोंत, अेक नवें तत्त्वज्ञान प्रसृत करणार आहोंत असें म्हणणें भाकडपणाचें आहे. तुम्हीं कदाचित् अितिहासांत नवीन भर घालूं शकाल पण निसर्गाचा जो नियम आहे त्यांत तुम्ही काडीमात्र फरक करूं शकणार नाहीं. फार कशाला, जर आजही माणसानें वाघांना आणि कोल्ह्यांना आपण पूर्णपणें अहिंसावादी राहणार आहों त,

कोणत्याहि जीवाची कधींही हिंसा करणार नाहीं नि शस्त्र अुचलणार नाहीं असा कोरा चेक लिहून दिला तर ते लांडगे आणि वाघ सुद्धां तुमचीं मंदिरें आणि मशिदी, तुमची संस्कृति, तुम्ही पिकविलेलीं शेतें, तुम्ही बांधलेलीं घरें आणि आश्रम हीं सारीं पार अुध्वस्त करून टाकतील. आणि बारा वर्षांच्या आंत साधु आणि पापी माणसें या सर्वांना खाअून फस्त करतील. निसर्गाचा नियम अशा प्रकारचा असल्यामुळें अशा प्रकारचें आत्यंतिक अहिंसेचें, मानवी जीवनाला घातक असणारें नि आक्रमणाचाही सशस्त्र प्रतिकार करूं नको म्हणून सांगणारें तत्त्वज्ञान हें किती अनीतीचें आणि पापकारक आहे हें काय वेगळें सांगावयास पाहिजे ?

## फोल कल्पना ! !

तरीसुद्धां आश्चर्य आहे तें हें कीं, ज्यांना हें आत्यंतिक अहिंसेचें तत्त्वज्ञान अव्यवहार्य वाटतें आणि म्हणून जे त्याचा निषेधही करतात तेच लोक बोलतांना असें बोलतात कीं, आम्हां व्यवहारी माणसांच्या बाबतींत जरी तें तत्त्वज्ञान अव्य-वहार्य असलें तरी मुळांत तें मोटें नीतीचें लक्षण असून जो कोणी त्या तत्त्वाचा अंगीकार करील तो महात्मा धन्य होय ! त्यामध्यें मानवश्रेष्ठांचे सद्गुण भरलेले आहेत. ही जी मनोवृत्ति आहे ती तावडतोब बदलली पाहिजे. अशा प्रकारचे तऱ्हेवाअीक मत प्रतिपादन करणाऱ्या या प्रेषितांना सामान्य लोक देवदूत समजूं लागतात आणि मानवी जीवनाची अुंची वाढविण्याकरितां त्यांनीं कांहीं नवे नीति-नियम शोधून काढले आहेत असें मानूं लागतात. ज्यांना त्यांचें हें धोरण आचरणांत आणतां येत नाहीं ते लोक यांच्या या तऱ्हेवाअीकपणाला साधुत्वाचें लक्षण म्हणून समजतात आणि तसें झालें म्हणजे या लोकांनांही आपण कोणी तरी मोटे महात्मे आहोंत असें वाटूं लागतें नि ते सुखेनैव, बेछूटपणें, मोठ्या गंभीरपणाचा आव आणून भारतीय जनतेला हातांत काठी घेणें हें सुद्धां पाप आहे असें प्रतिपादन करूं लागतात. एवढेंच नव्हे तर पुढें स्वतंत्र झाल्यानंतरही हिंदुस्थानला अेकही सैनिक लागणार नाहीं किंवा हिंदुस्थानची सीमा सांभाळण्याकरितां अेकही लढाअू जहाज आपणांस ठेवावें लागणार नाहीं असें सरळ सांगत सुटतात ! परदेशीयांच्या जोखडाखालून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मिळविण्याचा यांचा मार्ग म्हणजे सुताचा चरखा होय आणि जर या आत्यंतिक अहिंसेच्या कल्पनेवर हिंदुस्थाननें विश्वास ठेवला आणि त्यास अनुसरून त्यानें सैन्य, नौकादल

किंवा वैमानिक दल ठेविलें नाहीं तर, जगांतील कोणतेंही राष्ट्र हिंदुस्थानवर स्वारी करणार नाहीं, किंवा जर कोणी केलीच तर त्याच्यासमोर गरगर फिरणाऱ्या चरख्याच्या आवाजावर गाणें गाणाऱ्या देशसेविकांचा ताफा अुभा करून आपण त्यांना परतण्यास भाग पाडूं अशी यांची विचारसरणी आहे !

## साक्षेप अहिंसाच हवी.

जेव्हां गोष्टी अशा थराला जातात नि यांच्यासारखे भंगड लोक सर्वसामान्य भोळसट माणसांचे विश्वस्त प्रतिनिधी म्हणून गोलमेज परिषदेसारख्या परिषदांना जातात आणि परदेशांतसुद्धां असलीं खुळचटपणाचीं, हिंदुस्थानच्या नांवानें मोठ्या गंभीरपणानें विधानें करूं लागतात तेव्हां परदेशांतील राजकारणी लोक आणि युरोप–अमेरिकेंतील सर्वसामान्य जनता हीं यांच्या या खुळचटपणाला हंसतात. यामुळें या मतांचा गंभीरपणें समाचार घेण्याची वेळ आली आहे. या मताच्या प्लेगाला आतां शक्य तितक्या लौकर गाडून टाकलेंच पाहिजे. आपण या लोकांना क्षमायाचनेच्या भाषेंत नव्हे तर अगदीं ठणठणीत शब्दांनीं असें सुनावलें पाहिजे कीं, तुमचें हें आत्यंतिक अहिंसेचें खूळ हें केवळ अव्यवहार्य आणि अनैतिक तर आहेच आहे, पण शिवाय यांत साधुत्वाची छटा कोठेंच नसून त्यांत सारा मूर्खपणा मात्र भरलेला आहे. जेव्हां जगांतील सर्व माणसें आत्यंतिक अहिंसेचें पालन करतील तेव्हां जगांत युद्धच होणार नाहीं, आणि सशस्त्र सैनिकांचीहि त्या वेळीं गरज अुरणार नाहीं असें हे सांगतात. पण हें तत्त्वज्ञान सांगण्यास फारशी बुद्धि लागत नाहीं. जर प्रत्येक माणसानें चिरंजीव व्हावयाचें ठरविलें तर या जगांत कधीं कोणाला मरण येणारच नाहीं असें म्हणण्यासारखें हें आहे. आम्हीं जेव्हां तुमच्या आत्यंतिक अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा धिक्कार करतों, तेव्हां साधुत्वाच्या दृष्टीनें तुमच्यापेक्षां आम्ही कांहीं कमी आहोंत म्हणून नव्हे, तर तुमाच्यापेक्षां आम्हांस अधिक बुद्धि आहे म्हणून होय! **मर्यादित अहिंसावाद हें आमचें ध्येय आहे. आणि म्हणून माणसाचें संरक्षण करण्याचें पहिलें साधन म्हणून केवळ संरक्षणासाठीं आम्ही तरवारीची अुपसना करतों. याच बुद्धीनें हिंदु लोक शक्तिदेवता कालीमातेची खूण म्हणून**

शस्त्रांची पूजा करतात. गुरु गोविंदसिंगानें आपल्या तरवारीला अुद्देशून केलेल्या काव्यांत पुढीलप्रमाणें म्हटलें आहे:—

सुखसंताकरणम् दुर्मतिहरणम् खलदलदलनम् जयतेगम् ।

आणि आम्हीहि या थोर गुरुच्या गाण्यांत आपला सूर मिसळून असें म्हणतों कीं, 'खड्गा तुझा, विजय असो.'

—अध्यक्षीय भाषण, मदुरा

# जन्मजात जातिभेद मोडायचा म्हणजे काय करावयाचें ?

## ( पूर्वार्ध )

ज्यांना जन्मजात जातिभेद–जो आज हिंदु समाजांत प्रचलित आहे तो–असणेंच अिष्ट वाटतें, त्यांना तो कसा नी किती अनिष्ट आहे हें दाखविण्यासाठीं हा लेख आम्ही लिहीत नाहीं.

ज्यांस हा 'जन्मजात' म्हणविणारा परंतु वास्तविक केवळ 'पोथीजात' असणारा जातिभेद अत्यंत अनिष्ट आहे असें वाटतें, तो मोडावा हें विधेय पटलेलें आहे, पण 'तो मोडायचा म्हणजे आज काय काय केलें पाहिजे', 'आमच्यापुरता आम्ही आरंभ कुठून नी कसा करावा' असा प्रश्न ज्यांच्यापुढें पडलेला आहे आणि 'जातिभेद मोडा म्हणतां तें ठीक; परंतु त्या सहस्र वर्षांच्या रचनेस अुलटून पाडल्यास अेवढी मोठी गडबड अुडेल कीं, हिंदु राष्ट्राचें अस्तित्वहि त्या धुमाकुळींत नामशेष होअून जाअील त्याची वाट काय ?' अशी अेक भीति वाटल्यामुळेंच जे त्या कामास हात घालण्यास वचकत आहेत, त्यांच्या त्या प्रश्नांचा नी त्या भीतीचा विचार करण्यास्तव काय तो हा लेख लिहिण्याचें आम्हीं योजिलें आहे.

जन्मजात जातिभेदाची अिष्टानिष्टता या विषयावर केसरींत आमची लेखमाला प्रसिद्ध झाल्यापासून आणि तो जातिभेद मोडण्याचा प्रत्यक्ष प्रयोग मोठ्या प्रमाणावर रत्नागिरींत सामुदायिक रीत्या धूमधडाक्यानें चालू झाल्यापासून आम्हाला लेखी नी तोंडीं शेंकडोंजणांनीं हे वरील प्रश्न आजवर विचारले आहेत. दुसरी गोष्ट ही कीं, जातिभेद मोडणें अिष्ट असें मानणारा अेक फार मोठा वर्ग अुत्पन्न झाला आहे. पण त्याच्यापुढें अेक निश्चित कार्यक्रम नसल्यानें तो गोंधळलेला आहे. त्यासाठीं अेक चालचलाअू कार्यक्रमहि या लेखांत रेखाटणें आहे.

## जन्मजात जातिभेदांचें उच्चाटन म्हणजे जन्मजात म्हणून केवळ गृहीत धरलेल्या उच्चनीचतेचें उच्चाटन.

प्रथम हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं जन्मजात जातिभेदामध्यें जें काय आपणांस, राष्ट्रीय दृष्ट्या अनिष्टतम असल्यानें मुख्यतः अुच्छेदावयाचें आहे तें आजच्या जातींतील जन्मजातपणाची नुसती अुपपत्ति वा भावना ही नसून तिच्याशीं घातलेली मानीव अुच्चनीचतेची आणि विशिष्टाधिकारांची सांगड ही होय. अमुक मनुष्य ब्राह्मणकुलांत जन्मला, म्हणूनच केवळ, त्याच्यांत तसा विशेष गुण नसूनहि, त्यास अग्रपूजेचा, वेदोक्ताचा, पूर्वीच्या निर्बंधानुसार अवध्यत्वाचा अित्यादि जे विशिष्ट जन्मजात अधिकार वा सवलती देण्यांत येतात, त्या तेवढ्या बंद करावयाच्या आहेत. अमुक मनुष्य क्षत्रिय कुलांत जन्मला म्हणूनच काय तें, त्याच्या अंगीं तसा कोणताहि विशेष गुण नसतां, त्यास सिंहासनाचा नी वेदोक्त राज्याभिषेकाचा अधिकारी समजणें आणि शिवाजीसारख्या पराक्रमी पुरुषानें स्वतंत्र राज्य स्थापिलें तरी 'तो क्षत्रिय नाहीं म्हणून सिंहासनाचा अधिकारी होअूं शकत नाहीं. त्यास आम्ही अभिषेकिणार नाहीं,' असें म्हणणें हें निर्भेळ मूर्खपणाचेंच नव्हे तर घातक असल्यानें क्षत्रियत्वाचे ते केवळ जन्मानेंच देअूं केलेले विशिष्टाधिकार तेवढे छिनावून घेतले पाहिजेत !

कोणतीहि जात दुसरीहून मूलतःच श्रेष्ठ वा कनिष्ठ आहे ही गोष्ट केवळ पोथींत तसें सांगितलें आहे म्हणूनच गृहीत घेतां कामा नये.

जातिभेदांतील ही जन्ममूलक नी केवळ मानीव अशी अुच्चनीचतेची भावना आणि हे प्रकट गुणांवांचून मिळणारे विशिष्टाधिकार वजा घातले तर प्रस्तुतच्या जातिभेदाचीं जीं अितर अनेक लक्षणें आहेत, तीं आणखी किल्येक वर्षें तग धरून राहिलीं वा न राहिलीं तरी त्यामुळें फारशी हानि होणार नाहीं. त्या त्या जातीचे धंदे, नांवें, त्यांचे संघ, वरील व्याख्येशीं विरुद्ध न जाणारीं नी दुसऱ्यास अुपसर्ग न देणारीं त्याचीं विशिष्ट व्रतें, कुळधर्म, कुळाचार, गोत्रपरंपरा प्रभृति शेकडों ज्ञातिविशिष्ट बंधनें त्या त्या ज्ञातींनीं जरी आणखी कांहीं काळ तशींच चालू ठेवलीं तरी त्यायोगें अखिल हिंदु राष्ट्राची म्हणण्यासारखी हानि होणार नाहीं.

**मानीव अुच्चनीचता नी प्रकट गुणांवांचून केवळ जन्मामुळेंच मिळणारे विशिष्टाधिकार हे काढून घेतल्यानंतरहि अुरणारा जो**

## जातिभेद तो, विषारी दांत पाडून टाकलेल्या सापासारखा, आणखी कांहीं काळ जरी वळवळत राहिला तरी फारशी चिंता नाहीं !

अशा प्रकारच्या जातींचे गट म्हणजे आजच्या कुलांसारखेच निरुपद्रवी असतील. ब्राह्मण जात म्हणून, गुण नसतांहि विशिष्ट अधिकार असा जर समाजांत कोणताहि मिळेनासा झाला किंवा भंगीजात म्हणून योग्यता असतांहि विशिष्ट अधिकारास वंचित व्हावें लागलें नाहीं, तर कुण्या संघानें स्वतःस ब्राह्मण म्हणविलें वा मराठा, वैश्य, महार म्हणविलें तरी तेवढ्यामुळेंच आपसांत परस्परांचा मत्सर वा द्वेष करण्याचें कोणतेंहि सबळ नी न्याय्य कारण उरणार नाहीं. आज जसें कोणाचें नांव रानडे असतें, तर दुसऱ्या कुळाचें आडनांव दिवेकर असतें. पण तेवढ्यासाठीं त्यांच्यांत भांडण लागत नाहीं. तथापि जर रानडे कुळांतील मनुष्य म्हटला कीं, त्याला गुणानें श्रेष्ठ असो वा नसो, गंधाचा अग्रमान किंवा वैद्यभूषण पदवीचा ताम्रपट दिलाच पाहिजे, नी दिवेकर कुळांतील मनुष्य म्हटला, कीं तो रानड्याहून कितीहि सच्छील वा वैद्यकतज्ज्ञ झाला तरी त्यास ते अधिकार मिळणार नाहींत अशी व्यवस्था ठरली—तर रानडे आणि दिवेकर कुळांत मत्सर नी द्वेष अुत्पन्न झाल्याविना राहणार नाहीं. प्रत्येक व्यक्तीचें नांव नी कुळाचें अुपनांव (आडनांव) भिन्न असतांहि त्यांस त्यामुळें जन्मतः कोणतेहि विशिष्टाधिकार वा विशिष्ट हानि चिकटविली नसल्या-मुळें त्यांच्यांत जसें वैषम्य केवळ नामभिन्नतेनें गाजत नाहीं तशीच स्थिति, जन्ममूलक पोथीजात अुचनीचता आणि विशिष्टाधिकार काढून टाकले असतां, ह्या जातीजातींच्या गटांचीहि होईल. तेव्हां जन्मजात जातिभेदाचा अुच्छेद करावयाचा म्हणजे ह्या जातीजातींतील मानीव अुचनीच भावनेचा नी तदनु-षंगिक विशिष्टाधिकारांचा तेवढा अुच्छेद करावयाचा. प्रत्येकानें ही भावना ठेवायची कीं, जर कोण्या जातींत आणि व्यक्तींत अेखादा गुण प्रगट होईल तरच नी त्याच प्रमाणांत ती योग्य ठरून तदनुषंगिक अधिकारास पात्र होईल. मोटारहाक्या तो कीं, जो स्वतः मोटार चालविण्यांत कुशल आहे. त्याचा बाप, आजा, पणजा, मोठा प्रवीण मोटारहांक्या असला तरी तेवढ्यामुळेंच त्याच्यांतहि मोटार हांकण्याचे गुण आनुवंशिकपणें असलेच पाहिजेत असें गृहीत धरून, त्याच्या मोटारींत जर कोणी शहाणा बसेल तर कपाळमोक्षाचीच पाळी बहुधा येईल. तुला मोटार हांकण्याचें प्रमाणपत्र

मिळालें आहे का ? हा मुख्य प्रश्न. जर त्याच्यांत तो गुण आनुवंशिकतः असेल तर तो प्रकट झाला पाहिजे. तो नुसता सुप्त आहे, म्हणून त्यास तें प्रमाणपत्र मिळतां कामा नये. मोटारहांक्याचा अधिकार त्यास गाजवूं देतां कामा नये ! तीच स्थिति राष्ट्रीय प्रगतीच्या मोटारीची. ह्या कामास प्रत्यक्षपणें प्रकट गुणानें जो प्रवीण ठरला तो धुरीण. मग तो जातीनें ब्राह्मण असो, क्षत्रिय असो, भंगी असो. कपडा अुत्तम शिवतो तो शिंपी. मग तो तथाकथित शिंपी जातीचा असो; वा वाणी वा कुणबी असो.

प्रस्तुतच्या जातिभेदांतील कोणता अत्यंत घातक घटक आपणांस अुच्छेदिला पाहिजे, हें असें नक्की ठरविल्यानंतर आतां आपल्या हिंदु राष्ट्राच्या संघटनास आड येणाऱ्या अशा ज्या दुष्ट रूढी जातिभेदांतील त्या घातक घटकांत अंतर्भूत होतात किंवा ज्या त्याचे परिणाम आहेत त्या कोणत्या नी त्यांचा नायनाट कसा करावयाचा याचें दिग्दर्शन करूं.

जातिभेद हा अेक चतुष्पाद प्राणी आहे. ज्या चार पायांवर तो मुख्यतः अुभा आहे ते त्याचे चार पाय, हाणले कीं, हें धूड खालीं कोसळलेंच म्हणून समजावें. जातिभेदांत हिंदु राष्ट्राच्या प्रबळ संघटनास अत्यंत हानिकारक असणारा भाग म्हणजे मुख्यतः ह्याच चार रूढी आहेत. पैकीं—

## व्यवसायबंदी

ही आजला जवळजवळ तुटलेलीच आहे. चार वर्णांच्या वा जातींच्या चार सहस्र जाती ज्या झाल्या आणि त्यांच्या पुन्हा अनेक पोटजाती ज्या पडत चालल्या, त्या ह्या व्यवसायबंदीच्याच अवदसेपायीं होत. अुभ्यानें विणणाऱ्यांची अेक जात, बसून विणतात म्हणून त्यांची दुसरी जात ! गवळी जात दुध-दही-लोण्याचा धंदा करणारी म्हणून निराळी. पण पुन्हा तिच्यांत पक्क्या दुधाचें लोणी काढतात म्हणून त्यांची दुसरी अेक जात झाली ! ही अनर्थपरंपरा यापुढें चालण्याची भीति फारशी उरलेली नाहीं. कोणताहि धंदा कोणीहि करण्यास जातीची आडकाठी आतां येअीनाशी झाली आहे. जात शिंपी—धंदा तांबटाचा. जात ब्राह्मण—धंदा लोखंडी कारखान्याचा. जात वाणी—धंदा शिक्षकाचा, अशी वस्तुस्थिति जिकडेतिकडे झाली आहे. ज्यास ज्या धंद्याची पात्रता असेल त्यास तो धंदा करण्याचें स्वातंत्र्य मिळालेलें आहे. आजचे वकील मोटारहांके, डॉक्टर, आगगाडीवाले, तारवाले प्रभृति, नवे

धंदे करण्यास जशी जात आडवी येत नाहीं, तसेंच पूर्वी स्मृतींतून वा रूढीनें जे धंदे करण्यास जात आडवी येअी, ते धंदेहि करण्यास ती मुळींच आडवी येत नाहीं. महार शिपाअी होतात, ब्राह्मण, क्षत्रिय–गवळी होतात, फार काय, दुकानांतून विलायती बूट–वहाणा–जोडेहि प्रकटपणें विकतात आणि तरीहि त्यांची जात जात नाहीं.

अेकाच जातींत अेक धंदा डांबून टाकण्याचें जे आपल्या जुन्या जातिभेदाचें धोरण असे, त्याच्या वतीनें दोन लाभ बहुधा पुढें करण्यांत येतात. अेक हा कीं, त्या धंद्यास वा कलेस अनुरूप अशी प्रवृत्ति नी प्रावीण्य पुष्कळ अंशीं पिढीमागून पिढींत अनुवंशाच्या ( हेरिडिटी ) बळें प्रत्येक पुढच्या व्यक्तींत प्रकर्ष पावतें आणि दुसरें हें कीं, लहानपणापासून घरीं वाडवडिलांचा भिक्षुकीचा वा चांभारकीचा जो कोणता व्यवसाय असेल त्याचें शिक्षण, त्याचें भांडवल, त्याची खुबी सहजगत्या होतकरू पिढीस लाभूं शकते. पण ह्या दोन लाभांना आपल्या नव्या गुणाधिष्ठित पद्धतींतहि मुकण्याचें कोणास कारण नाहीं. जुनी जातबंद व्यवसायपद्धति जरी सुटली तरी व्यवसायस्वतंत्रतेच्या आपल्या नव्या पद्धतींतहि **वाडवडिलांचा धंदा करूंच नये असा कांहीं प्रतिबंध नसल्यानें**; हे दोन्ही लाभ ज्या कोणच्या प्रमाणांत खरोखरीच होअूं शकतात, त्या प्रमाणांत पदरीं पडण्यास मुळींच प्रत्यवाय येणार नाहीं. अुत्कृष्ट ‘ संगीतरत्न ’ गवयाचा मुलगा जर उपजत गवयी असेल तर त्यानें सुखेनेव गवयाचा धंदा करावा; त्या गुणास पारंगतता मिळाल्यास त्यासहि ‘ संगीतरत्न ’ म्हणून पदवी मिळेलच. पण जर सात पिढ्या कुळांत गायकी असूनहि अेखादा मुलगा मडक्यासारखा फुटक्या आवाजाचा निघाला नि गायनकलेपेक्षां गुरें वळण्याच्या कामाचा असला, तर तरीहि त्यास ‘ संगीतरत्न ’ ही पिढीजात पदवी नि राजदरबारचे गायकाचें पिढीजात स्थान द्यावयाची घोडचूक ह्या नव्या गुणाधिष्ठित व्यवसायपद्धतींत होत नाहीं. बापाचे गुण मुलांत सुप्त तरी असतातच, ह्या म्हणण्याचा व्यवहारांत कांहीं अुपयोग नाहीं. व्यवहारांत प्रकट गुणाचें काम. वकिलाच्या मुलांत वकिलीचे आनुवंशिक सुप्त गुण असोत वा नसोत; तेवढ्यावारीं त्यास कोणी वकील म्हणून न्यायालयांत मानणार नाहीं. त्याचीं स्वतःची वकिलीची परीक्षा अुतरली पाहिजे. ते गुण प्रकट स्वरूपांत दिसले पाहिजेत. ज्यांत ते वकिलीचे गुण प्रकटतील,

ती परीक्षा जो अुतरेल, तो वकील. मग ते गुण आनुवंशिक असोत वा स्वोपार्जित असोत. त्याचा बाप, आजा वकील असो वा वडारी असो. जातिबद्ध व्यवसायबंदी तोडल्याने तिच्यांतील वरील दोन्ही लाभास न मुकतां कोणालाहि आपल्या जातिबद्ध धंद्याहून अुचतम धंदा करण्यास वाव मिळतो. गुणावरच व्यवसाय नि तज्जन्य मान मिळणार असल्यामुळें धंद्यांचा नि कलांचा, त्यांना योग्य तेंच लोक त्यांत पडल्यानें नी चढाओढींत टिकतील तेंच त्यांतील धनमानांचें धनी होत गेल्यानें, अुत्कर्ष होत जातो. योग्य मनुष्य योग्य कामीं लागला जाण्याचा या व्यवसायस्वतंत्रतेंत अधिक संभव असल्यानें, राष्ट्राची अेकंदर क्षमता वाढत जाते, सैनिकांचाहि गुण अुरला नसतां कोण्या दाभाड्यांच्या कुळांत हिंदुपदपातशाहींचें सेनापतीपण पिढ्यानूपिढ्या कुजत पडत नाहीं. निरक्षर भट्टाचार्यांनाहि पहिल्या गंधाच्या अग्रपूजेचें वतन मिळत नाहीं.

## पण ! काय होअील न कळे !

जातिनिष्ठ व्यवसायबंदीची प्रथा तुटून गुणनिष्ठ व्यवसायस्वातंत्र्याची प्रथा सरसहा चालू केली असतां, समाजावर कोणतें तरी भयंकर संकट कोसळेल कीं काय, जिकडे तिकडे बेबंदशाही माजेल कीं काय, पापच पाप फैलावून अीश्वरी कोप होअील कीं काय ? काय होअील न कळे ! अशी भीतीहि आतां कोणास बाळगावयास नको आहे. मनुस्मृतींत केलेली धंद्याची जातवार वांटणी आणि आजची प्रत्यक्ष व्यवहारांत झालेली त्या धंदेवारीची गल्लत समोरासमोर ठेवली असतां जी व्यवसायबंदी हेंच ज्या जाति–पोटजातीभेदांचें मुख्य गमक होतें ती शिंपी, सोनार, लोहार, गवळी, वाणी, भट, गोंधळी, कोष्टी प्रभृति जातींची जात वास्तविक बुडाली असतां, त्याची कोणास कशी जाणीवहि राहिली नाहीं हें ध्यानांत येअील. या सर्व जातींचे मूळ धंदे वाटेल तो करीत असतां आणि त्या जाती आपली शिंपीसोनारादि नांवें आणि जातिसंघ तसेच चालू ठेवून स्वतः ते धंदे न करतां वाटेल ते अितर धंदे करीत असतां त्यांच्यांतील सनातनी मंडळीदेखील जातिभेद अजून जिवंतच आहे, आणि सुधारक हेच तो नव्यानें तोडूं पाहतात अशी मनःपूर्वक कागाळी करीत आहेत ! अितकी व्यवसायबंदीची नी जातवारीची ताटातूट लोकांच्या पूर्णपणें अंगवळणी पडली आहे. मनुमध्यें त्या काळीं छापखान्याची कलाच माहित नसल्यामुळें त्या धंद्यांत ब्राह्मणांनीं पडावें म्हणून सांगितलेलें नाहीं. पण मनु त्रिकालज्ञ

त्याची स्मृति त्रिकालाबाधित नी अपरिवर्तनीय, असें म्हणणारे सनातनी ब्राह्मण पत्रकारहि, मनुभगवानांनीं मुद्रणालयें ब्राह्मणांनीं चालवावीं असें लिहिलें नसतांहि तो धंदा अुत्तम रीतीनें चालवीत आहेत; आणि पुन्हां आपण ब्राह्मणचे ब्राह्मणच्च आहोंत असें समजून 'जातिभेद हाच आजच्या हिंदु राष्ट्राचा पाया आहे ! तो कधींहि बुडवितां कामा नये ! मनुस्मृतीच्या निर्बंधानुरूप धर्म हा अपरिवर्तनीय राहिला पाहिजे ! यास्तव आम्ही ही मनुस्मृतीच चातुर्वर्ण्य नांवाच्या छापखान्यांत छापीत आहों !' असें चापून घोषीत आहेत ! व्यवसायबंदी तुटल्यामुळें खरा जातिभेद अर्ध्या अधिक अंशानें मुळांतच मरत आला आहे. त्याचा पायाच ढांसळला आहे, याची कोणास जाणीवहि अुरूं नये अितकी आज गुणनिष्ठ व्यवसायस्वतंत्रता ही रूढ होअून बसली आहे ! अर्थात् व्यवसायबंदी तुटल्यानें काय होअील न कळे अशी भीति बाळगण्याचें आज कारणच नाहीं. यास्तव कीं, ती तुटल्यानें समाजाचें जें काय व्हावयाचें तें आज हें असें झालेलेंच्च आहे ! अितकेंच्च नव्हे, तर तें तुम्हां आम्हां सर्वांस पूर्णपणें परवडतहि आहे. कारण त्या व्यवसायबंदीची बेडी तुम्हीहि प्रतिपदीं अुजळ माथ्यानें तोडून त्यामुळें जातिधर्माचें कांहीं अुल्लंघन होतें, अशी शंकादेखील घेत नाहीं.

## सारें जग, विशेषत: यूरोप, अमेरिका पाहा !

गुणनिष्ठ व्यवसायस्वातंत्र्याच्या प्रथेचे सुपरिणाम पाहावयाचें असतील तर अेकदां आजच्या युरोप-अमेरिकेकडे पाहावें, म्हणजे जातिनिष्ठ व्यवसायबंदी तोडली तर काय होअील न कळे अशी विभीत शंका पार मावळून त्यायोगें राष्ट्रीय बळ, अुद्यम, संपत्ति, कर्तबगारी, कला, क्षमता प्रभृति सर्व अंगांनीं राष्ट्राची झाली तर भरभराटच होते, असा ठाम विश्वास वाटूं लागेल. केवळ हिंदुस्थानांतच जातिनिष्ठ व्यवसायबंदी चालू; बाकी जपान, चीन, तुर्क, सारा यूरोप, सारी अमेरिका, ह्यांत त्या प्रथेचें नांवहि कोणी घेत नाहीं. **हिंदुस्थानावांचून हें सारें जग गुणनिष्ठ व्यवसायस्वतंत्रतेच्चें अनुयायी असतांनाहि, त्या जातीपातींवांचून त्यांचें कांहीं अडलें नाहीं, अितकेंच नव्हे तर गुणनिष्ठ व्यवसायस्वतंत्रतेमुळें-निदान यूरोप, अमेरिका तरी व्यवसायकुशलतेंत आमच्याहून अेका शंभर वर्षांत पांच हजार वर्षें पुढें निघून गेलीं आहेत !** गुणनिष्ठ निर्वाचनानें संघटलेलें

त्यांचें सैन्यबळ आमच्या नुसत्या 'क्षत्रिय' छापाच्या जातिनिष्ठ राजन्यांहून सहस्र पटीनें झुंजार; त्यांचें गुणनिष्ठ निर्वाचनाने संघटिलेलें बुद्धिबळ परवां बाष्पयुगांत, तर काल विद्युत्युगांत, तर आज रेडियमच्या युगांतील अतिदर्शन अतिश्रवणाच्या सिद्धि संपादून आमच्या स्वप्नांतहि सुचली नाहींत तीं आश्चर्यें, तें दूरध्वनि ( टेलिफोन ), ते दूरदर्शक ( टेलिव्हिजन ), ते ध्वनिक्षेप ( ब्रॉडकास्ट ), ते ध्वनिलेख ( फोनोग्राफ्स ), ती तार, ती बिनतारी, त्या वेडरी, त्या मशीन्गन्स, त्या पाणबुड्या, तीं विमानें, तीं वियानें—आज सत्यसृष्टींतलीं खेळणीं करून सोडीत आहेत! शिल्प, वाणिज्य, कृषि, कलाकुसरी सर्व व्यवसाय अिकडच्याहून तिकडे शतपटीनें प्रकर्ष पावलेले आहेत. **अर्थात् जातिबद्ध व्यवसायबंदी तोडल्यानें ब्राह्मण, राजन्य, वाणिज्यादि गुणांत, शक्तींत नी व्यवसायांत राष्ट्र अपकर्ष पावत नसून अुलट गुणनिष्ठ व्यवसायस्वतंत्रतेनेंच तें भरभराटूं शकतें, हे आतां प्रयोगसिद्ध झालेलें आहे.**

## भट नी भंगी !!

जन्मजात जातिभेदाच्या अुच्छेदनार्थ अत्यंत अवश्य असलेल्या या व्यवसायबंदीच्या अुच्चाटनाचें काम अशा रीतीनें आज बहुतांशीं झालेलेंच असल्यामुळें आणि कोणी कोणताहि व्यवसाय केल्यास त्याची जात त्यास आडवी येत नसल्यामुळें त्याच प्रकरणीं जातिभेदाशीं आपलें फारसें भांडण अुरलें नाहीं, जर अजून कुठें व्यवसायबंदी कांहीं प्रमाणांत आडवी येत असेल, तर ती अस्पृश्यांच्या प्रकरणीं मात्र येते. पण त्याचा विचार स्पर्शबंदीच्या प्रकरणीं होणारच असल्यामुळें, अिथें त्याचा केवळ अुल्लेख तेवढा करून ठेवणें पर्याप्त आहे. अस्पृश्यांतहि आतां ती चांभार–महारादिकांच्या परंपरागत व्यवसायांत तितकी बंदी राहिली नाहीं. चांभाराचे धंदे, दुसऱ्या जाती कांहीं अंशी—जोडे, बूट विकण्याचीं दुकानें चालविण्याच्या नि चामड्याचे मोठे नवीन धर्तीचे सामुदायिक कारखाने चालविण्याच्या प्रकरणीं तरी-करतातच नी चांभार, महार गुणानुरूप शाळामास्तरही होअूं शकतात. व्यावसायबंदी कडकपणेंच जर कुठें सांपडली तर ती अिकडे अस्पृश्यांत, भंग्याच्या धंद्यांत मात्र सांपडते आणि तिकडे स्पृश्यांमध्यें भटांच्या! भंग्याचें काम अितर जातींतील कुणी करूं अिच्छित नाहीं. भटांचें काम अितर जातींतील कोणास

करूं देत नाहींत. त्यामुळें या दोन धंद्यांचें मात्र त्या दोन जातींस अगदीं 'अेकस्व' ( मोनॉपली ) मिळाल्यासारखें झालें आहे ! दुसरें कोणीहि आपल्या जातींचें काम करीत नाहीं, ही निश्चिति असल्यानें भंगी हा कलकत्त्यासारख्या प्रचंड कॉर्पोरेशनलादेखील वाकवूं शकतो, मग साध्या घरवाल्याची कथा काय ! अेक वेळ नगरसंस्थेच्या अध्यक्षानें संप केला तरी मोडतां येअील; दहा अर्जें त्या जागेसाठीं लगेच येतील; पण भंग्यानें कां संप केला कीं, त्यांच्या मागण्या मान्य करण्यावांचून तो मोडण्याचें दुसरें साधन सांपडणें कठीण जातें ! कारण दुसरा कोणी त्याचें काम करणारच नाहीं !–तीच गोष्ट भटाची. भट म्हटला कीं, तो ठराविक जातीचा, वृत्तीचा नसेल तर धर्मसंस्कार व्हावा तसा झाला नाहीं अशी रुखरुख भटापेक्षां यजमानालाच जास्त लागते ! व्यवसायबंदी जर कुठें मोडायची अजून बाकी असेल, तर ती ह्या दोन प्रकरणीं होय.

## पैकीं भंग्याची खोड अशी मोडली पाहिजे—

भंग्याचें काम कोणी करणार नाहीं ही जाणीवच भंग्यांच्या जातीस त्या धंद्याचें 'अेकस्व' ( मोनॉपली ) हातीं राखून ठेवण्यास समर्थ करते, तसा कोणाचाहि निर्बंध ( कायदा ) नाहीं. यास्तव कांहीं काल जातिभेद तोडूं अिच्छिणारांनीं तत्त्वासाठीं म्हणून भंगीकाम करून दाखविलें पाहिजे. प्रथम सेनापति बापट, नंतर महात्मा गांधी, अप्पाराव पटवर्धन प्रभृति कांहीं ठळक पुढाऱ्यांनीं तो पायंडा पाडला आहेच. मागें अेकदां कलकत्त्यास भंग्यांचा मोठा संप होऊन, सारें नगर घाण सांचून हतबुद्ध झालें असतां शेकडों भद्र तरुणांनीं ( सभ्य वंशांतील तरुणांनीं ) आपापल्या आळींतून नी विभागांतून भंग्यांचें काम करण्यास आरंभिलें आणि त्याचा परिणाम संप मोडण्याच्या कामीं चांगला झाला. 'अुच्च' मानलेल्या जातींनींच हा धंदा हाताळला, केवळ तत्त्वाकरितां कां होईना–कीं, भंग्यांच्या जवळपासच्या 'अस्पृश्य' जाती तो करण्यास पुढें येतात हाहि अनुभव आहे. कारण प्राप्तीच्या दृष्टीनें पूर्वास्पृश्यांच्या हातीं असलेल्या धंद्यांत आज तरी भंग्यांचा धंदाच भरभराटीचा आहे. मुलांसुद्धां अेका कुटुंबांतील बायका–पुरुष, नोकर म्हणून नोंदवून घेअून भंग्यांचें अेकेक कुटुंब महिना पन्नास साठ रुपये मिळवीत असतें ! तेव्हां कांहीं सुशिक्षित तरुणहि ह्या जर धंद्यांत कांहीं काळ जाणूनबुजून पडले, तर मामलेदार कचेरींतील कारकुनीपेक्षां वा शाळा-शिक्षकांतील प्राथमिक नोकरीपेक्षां दुप्पट पगार सहज मिळूं शकेल.

अेका बाजूनें भंग्यांचें काम प्रत्यक्ष करणारे प्रचारक पुढें यावे नी दुसऱ्या बाजूनें तितकें जास्त करवत नाहीं, अशा अितर सुधारकांनी भंगी काम करीत असलेल्यांना अितर कोणत्याहि मनुष्याप्रमाणें समानतेनें वागवावें. प्रत्यक्ष आचरणांत स्वतः तसें वागणाऱ्या पांचपन्नास सुधारकांचा गट जरी निर्भयपणें काम करूं लागला, तरी या प्रकरणीं समाजाची सहस्र वर्षांची, भंग्यांस अत्यंत नीच मानणारी धार्मिक भावनाहि किती झटकन् बदलूं शकते त्याचें आश्चर्य वाटण्याअितकें प्रत्यंतर अुदाहरणच हवें तर, गेल्या चार वर्षांत रत्नागिरीस बघावयास मिळतें. भंग्यांचीं मुलें शाळेंत सरमिसळ बसतात, भंगीकाम संपतांच भंगीमंडळी अखिल हिंदु अुपहारगृहांत प्रत्यहीं दुपारीं, संध्याकाळीं, ब्राह्मण, वाणी, मराठा प्रभृति अनेक नागरिकांसह सरमिसळ चहाचिवडा अुपहार खात, हंसतखेळत बसलेलीं दिसतात. कीर्तनकार भंगी हजारों लोकांसमक्ष देवळाच्या सभामंडपांत कीर्तन करतात, ब्राह्मणादिक महिला मालाफुलें त्या भंगी कीर्तनकारास अर्पितात नी ब्राह्मणादि शेंकडों नागरिक कीर्तनपरंपरेप्रमाणें त्यांच्या पायां पडून प्रदक्षिणा घालतात. जी भंगीण दहा वाजतां मळाचा डबा घेअून घरून गेली, तीच अकरा वाजतां स्नान करून सुवसनें लेवून सहस्रभोजन-समारंभीं म्हणून जेवावयास देवळांत येते नी शेंकडों प्रतिष्ठित त्रैवर्णिक स्त्रिया तिच्यासह सरमिसळ जेवतात. असे प्रसंग अनेकदां घडत आहेत. ज्या रत्नागिरींत सात वर्षांपूर्वी भंगी स्त्रियांस नुसतें कुंकू लावावयास मोठ्या कष्टानें अवघ्या पांच त्रैवर्णिक मुली मिळाल्या, तिथें आतां यात्राअुत्सवीं देवळोंदेवळांतून सहस्र स्त्रियांच्या थव्यांत भंगिणी सरमिसळ वावरतात, कुंकूं लावतात, लावून घेतात, सभांतून निर्विशेष समतेनें अेकत्र बसतात! तीच रूढि होत आली आहे!

तेव्हां समाजाला अत्यंत हितकारक नी अपरिहार्य असें भंगीकाम हें नीचपणाचें द्योतक नाहीं. तो धंदा करणारा समाजांत अितर धंदेवाल्यांप्रमाणेंच स्वच्छ नी शुद्ध असल्यास समतेनें संव्यवहार्य असतो असें स्वतःच्या वर्तनानें प्रत्येक सुधारकानें प्रत्यहीं दाखविलें पाहिजे. म्हणजे त्या धंद्यांतहि अितर जाती पडतील नी व्यवसायबंदी जी दोन धंद्यांतच अजून जातवार अुरलेली आहे, ती भंग्यापुरती तुटेल. राहतां राहिला भट.

## पण भटांची खोड मोडायची तर प्रथम यजमानांची खोड मोडली पाहिजे !

कारण वास्तविक पाहातां निदान आजतरी भट हा जर समाजाच्या डोक्यावर चढला आहे असें कोणास वाटत असेल तर त्यानें हें लक्षांत ठेवावें कीं, तो त्याच्या घरची, धूर्तपणाची शिडी आणून कांहीं तसा आमच्या डोक्यावर चढलेला नाहीं. तर आम्हीच आमच्या भाबडेपणाची शिडी त्याला देअून आपल्या डोक्यावर चढवून घेत आहोंत ! भट हा खरोखर पाहातां अेक निरुपद्रवी प्राणी आहे. तो जोंवर पोलिसचें सहाय्य घेअून आज आमच्या घरांत बळानें घुसत नाहीं आणि जोंवर आम्हीच त्याच्यामागें आमंत्रणावर आमंत्रणें धाडून त्याची पायधूळ आमच्या घरांत झाडली जाअीतों समाधान पावत नाहीं तोंवर तो दोष भटाचा नसून आम्हां यजमानांचाच आहे. भटाच्या नांवानें सांज-सकाळ बोटें मोडणारे अनेक ‘ समाजिस्ट ’ नी ‘ सुधारक ’ लग्न-मुंज, श्राद्धपक्ष, गौरी –गणपतीचा दिवस अुजाडला कीं, भटजीकडे जे हेलपाटे घालतात, तो येत नाहीं म्हणून त्यावर जे चडफडतात, दोन वाजेपर्यंत अुपाशी रहातात पण भटानें पूजा सांगितल्यावांचून अन्नाचा घास जो त्यांस गिळवत नाहीं, त्या त्यांच्या भाबडेपणांतच भटशाहीचें बळ आहे, भटाच्या दर्भांत नव्हे. जोंवर यजमान हा भाबडेपणा सोडणार नाहीं, तोंवर भटशाहीस लाख शाप दिलेत तरी भट हा असाच डोक्यावर चढलेला असणार. यजमानाची ही खोड सुटली नाहीं, तोंवर भटाची खोडहि मोडतां यावयाची नाहीं. हे आजचे भट बदलाल तर ते अुद्यांचे डोकीवर चढतील !

कारण भट म्हणतांच प्रथम ब्राह्मण भट जरी चटकन् डोळ्यापुढें येतो तरी गुरव गुरु, जंगम, फार काय महारांत देखील महार भट आहेतच ! ही सारी अब्राह्मण असली तरी भटशाहीच आहे. भटाचा मुलगा तो भट. त्यास तो गुण असो नसो. त्याचें केवळ वंशपरंपरा वतन तें. त्याच्यावांचून दुसऱ्या जातीस वा कुळास वा व्यक्तीस ते संस्कार करण्याचा हक्कच नाहीं. अशी स्थिति आज तरी जेथेंजेथें असेल तेथेंतेथें त्या भाबड्या समाजास ती परवडते, ती हवी आहे–म्हणूनच ती टिकून आहे.

यास्तव भटाची जातवार व्यवसायबंदी मोडण्याचा मुख्य अुपाय म्हणजे संघटनाभिमानी सुधारकानें प्रथम आपले संस्कार ठराविक जातीच्या वा

कुलाच्या भटावांचून होऊं शकत नाहींत, हा स्वतःचा भावडेपणा सोडून प्रत्यक्ष आचारणांत ती सुधारणा व्यवहारली पाहिजे. प्रथमतः अनेक संस्कारांत भट बोलवूंच नये. पूजा, पाठ, गौरी, गणपती, सोयर–सुतक, संक्रांत, द्वादशी, दसरा, दिवाळी प्रभृति शेंकडों प्रसंगीं भटावांचून कांहींअेक अडगार नाहीं. स्वतः पोथी वाचावी किंवा शुद्ध मराठींत ते शब्द नी भाव व्यक्तवून ज्याची त्यानें पूजा करावी. पारणें फेडणें तर आजच्या अुपयुक्त संस्थांस दक्षिणा द्यावी. श्राद्धपक्षास पितरांचें गुणसंकीर्तन करून त्यांच्या नांवें आज हिंदु राष्ट्रास बलवत्तर करणाऱ्या कार्याकडे कांहीं दान देत चलावें किंवा तो दिवस राष्ट्रसेवेस, पितृभूसेवेस म्हणजे तो पितृसेवेस अर्पून स्वतः राष्ट्रकार्य कोणतें तरी करावें. पितृभूच्या–पितृराष्ट्राच्या प्रीत्यर्थ झटण्याहून नी झुंजण्याहून पितृ-अृण फेडण्याचें अधिक श्रेयस्कर साधन तें कोणतें असणार ? लग्नें नैर्बंधिक नोंदीनें ( लीगल रजिस्टरनें ) करावीं. भटास प्रथम हातांपायां पडून बोलावतां कां नी मग त्यांच्या नांवें रडतां कां ! भटास ' शहा ' म्हणूं नका, कीं भटशाही संपली !

तें होत नसेल आणि अुपाध्याय वर्ग हवाच असेल तर आमचे आर्यसमाजीय बांधव आज कित्येक वर्षे त्यांचा धर्मोपाध्याय वर्ग ज्या पद्धतीनें निर्मितात ती पद्धति अवलंबावी. श्रुतिस्मृतियज्ञप्रक्रियेंत ज्याची जी परीक्षा अुतरेल त्या पदवीचाच नव्हे, तर याज्ञिकी चालविण्याचा अधिकार अधिकृत प्रमाणपत्र देअून अर्पिला जावा. मग ती कोणत्याहि जातीची वा कुलाची व्यक्ति असो ! आज डॉक्टर जसा जातपातीनेंच ठरत नसून ज्यास डॉक्टरीचें ज्ञानार्जित प्रमाणपत्र मिळेल तो डॉक्टर होतो; तसाच यापुढें वैदिक, याज्ञिक, अुपाध्याय, भट भिक्षुक ! श्रीमान् श्रद्धानंदांनीं स्थापिलेल्या गुरुकुलांतून असलेले अस्पृश्य जातीचे ब्रह्मचारी विद्यार्थी आज वेदालंकार, तर्कतीर्थ, विद्यानिधि, याज्ञिक, अुपाध्याय होत आहेत. त्यांस ब्राह्मणतर्कतीर्थांचा, विद्यानिधींचा, याज्ञिकांचा भटांचा मान मिळाला पाहिजे, अुपाध्यायाचा व्यवसाय करतां आला पाहिजे. तेव्हां भटच हवा असेल तर प्रत्येक सुधारकानें तो जातवार न निवडतां गुणावर निवडावा. म्हणजे आज सुतारकी वा वैद्यकी जशी सर्व जातींना अुघडी झाली आहे, तशी याज्ञिकी किंवा भटकीहि ज्ञातिनिष्ठ न ठेवतां गुणनिष्ठ झाली पाहिजे

खरोखर व्यवसायबंदी ज्या दोनच व्यवसायांत आज जातिबद्ध आहे,

त्यांपैकीं अेक वेळ भंग्यांची व्यवसायबंदी तोडणें किंचित् कठीण जावो; पण बिचाऱ्या भटाची व्यवसायबंदी तोडणें कठीण जाअूं नये. कारण भटास बोलावलें नाहीं कीं संपलें आणि त्यास न बोलावलें तर भंगी न आला तर अडतें तितकें देखील अडणार नाहीं. स्वतः भंगी होणें अेक वेळ आजच्या समाजभावनेप्रमाणें अपमानार्ह होईल; पण स्वतःचा भट स्वतःच होणें हें सर्वस्वीं सन्मानार्हच समजलें जाईल. देवास मराठी समजतहि असलेंच पाहिजे. तेव्हां प्रत्येक सुधारकानें स्वतःचे सारे धर्मसंस्कार, पूजापाठ, व्रतवैकल्यें स्वतः मराठींत करावीं किंवा संस्कृतज्ञ बी. अे., अेम. अे. असलेल्या कोण्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, महार, चांभार, प्रभृति विद्वान् सदाचारी हिंदुसेवक मित्रांकडून करवावीं किंवा आर्यसमाजीय पद्धतीप्रमाणें गुणनिष्ठ नी जातिनिर्निरपेक्ष अशा निघालेल्या पुरोहित विद्यालयांतून योग्यतेचें प्रमाणपत्र मिळालेल्या नव्या अुपाध्यायांकडून करवावीं.

व्यवसायबंदी तोडण्याच्या कार्यीं, अशा रीतीनें सुधारकांस फारच थोडें करावयाचें आहे. तोंडपाटिलकी सोडून जो 'अितर करोत न करोत; मी माझ्यापुरता तरी ही सुधारणा प्रत्यहीं प्रत्यक्षपणें आचारून दाखविणार' असें वागेल तोच खरा सुधारक! आतां जन्मजात जातिभेदाच्या अुच्छेदनार्थ स्पर्शबंदी प्रभृति अुरलेल्या प्रकरणीं काय केलें पाहिजे, तें या लेखाच्या अुत्तरार्धांत विवेचिलें जाईल.

# जन्मजात जातिभेद मोडायचा म्हणजे काय करावयाचें ?

## ( उत्तरार्ध )

मागील लेखांकांत या विषयासंबंधीं जीं मुख्य विधेयें ( पॉअींटस् ) प्रतिपादिलीं त्यांचा या लेखांतील भागाशीं अगदीं निकट संबंध असल्यामुळें आणि त्या मुख्य विधेयांची पुनरुक्ति, त्यांचा ठसा वाचकांच्या मनावर पक्का बिंबविण्याच्या कामीं अुपयुक्तहि असल्यामुळें गेल्या लेखांकांतील तीं विधेयें अेकंदर विषयाच्या अनुसंधानार्थ आरंभींच पुन्हा अेकदां विवेचिणें अवश्य आहे.

आजचा जातिभेद हा ‘ जन्मजात ’ म्हणून म्हणवीत असला तरी तो निव्वळ ‘ पोथीजात ’ आहे ! जन्मतःच प्रगटणाऱ्या कोणत्याहि रूपगुणधर्माच्या भिन्नतेनें आजच्या जाती निरनिराळ्या ठरूं शकत नाहींत. तर अमक्या छापाच्या गटांत अमुक जन्मला म्हणून तो श्रेष्ठ किंवा स्पृश्य आणि अमुक कनिष्ठ वा अस्पृश्य ‘ मानला ’ जावा असें पोथींत सांगितलें आहे, यासाठीं तो तसा नुसता मानला जात आहे. आजचा जातिभेद हा जन्मजात नसून निव्वळ पोथीजात आहे !

आजच्या जातिभेदाची ही जन्मजात म्हणून नुसती मानल्या गेलेल्या अुच्चनीचतेची विषारी नांगी मोडून टाकली गेली कीं, मग त्या त्या जाती वा अुपजाती नुसत्या नांवानें आणखी कांहीं काळ जरी अशाच राहिल्या तरी मोठीशी हानि होणार नाहीं. प्रत्येक कुळाचें आडनांव जसें भिन्नभिन्न असतें, परंतु त्या कुळाला प्रत्यक्ष गुणानें अुपार्जिल्यावांचून कोणताहि अधिकार भोगतां येत नसल्यामुळें, त्या भिन्न नांवाच्या गटांमुळें, जसा कोणताहि परस्पर मत्सर वा राष्ट्रीय विघटना आज होअूं शकत नाहीं, तशीच ब्राह्मण, क्षत्रिय, साळी, माळी, महार, चांभार प्रभृति विभिन्न नांवें त्या त्या जातीच्या गटांची यापुढेंहि जरी चाललीं आणि जरी त्यांच्या विशिष्ट परिषदा, संघ, सण नी

संस्कार जातवारीनें यापुढेंहि चालत राहिले, तरीहि—त्यांना प्रत्यक्ष व्यवहारांत कोणतेहि हक्क प्रगट गुणांवांचून अुपभोगितां आले नाहींत तर, आणि जर यच्चावत् अधिकार नी व्यवसाय सर्व जातींत समानतेनें अुघडलेले असले तर—अशा घरगुती गटांनीं राष्ट्रीय संघटनेची हानि होण्याचा संभव म्हणण्यासारखा अुरणार नाहीं. अुलट अपरिहार्य म्हणून अुरणाऱ्या ह्या अशी नांगी तोडलेल्या जातवार गटांचा अुपयोगहि राष्ट्रीय संघटनेला तसाच करून घेतां येअील कीं, जसा तालुका, जिल्हा, अिलाखा प्रभृति भौमिक गटांचा अपयोग राज्याच्या संघटनेला करून घेतां येतो.

## ज्ञातिपरषदाहि राष्ट्रीय दृष्ट्या विघटक न होतां संघटकहि होअूं शकतील, जर—

त्या त्या परिषदा नी ज्ञातीय संस्था खालीं दिलेलीं मुख्य सूत्रें आपल्या मूळ अुद्देशपत्रिकेंत दोन ध्रुवाप्रमाणें अढळपणें अंकितील ! प्रत्येक ज्ञातिपरिषदेची पहिली प्रतिज्ञा, पहिलें सूत्र, हें असलें पाहिजे कीं, '**आम्ही कोणत्याहि अितर ज्ञातीस केवळ जन्मामुळेंच, जन्मतःच, हीनतर मानीत नाहीं वा अुच्चतर मानीत नाहीं,**' आणि दुसरी प्रतिज्ञा ही कीं, 'आमच्या जातींतील व्यक्तींत जे गुण प्रगटपणें नी प्रत्यक्षपणें आढळून येतील त्यांवरूनच आमची पात्रापात्रता ठरविली जावी, आम्हांस अधिष्ठान मिळावें, अितराप्रमाणेंच त्या आमच्या गुणाचें चीज व्हावें, अितराप्रमाणेंच त्या गुणांच्या संपादनास नी संवर्धनास आम्हांसहि मोकळीक असावी; पण **प्रत्यक्ष गुणांच्या कसोटीहून निराळ्या अशा कोणत्याहि पक्षपाती पोथीजात ज्ञातिनिष्ठेच्या वशिल्यानें अितर कोणतेहि न्याय्य अधिकार लुबाडण्याची आमची मनीषा नाहीं.** प्रत्येक जातिसंघानें ह्या दोन स्पष्ट प्रतिज्ञांच्या पायांवर आपली ज्ञातिसंघटना केली असतां ती अितर ज्ञातींच्या हानीस कारण होणार नाहीं. अितकेंच नव्हे, तर त्या दोन सूत्रांच्या कक्षेंत येणाऱ्या त्या त्या जातींची शिक्षण—आरोग्य—शक्ति—संपन्नता—सहकार्याची वाढ ही आपल्या अखिल हिंदु राष्ट्राच्या संघटनेस सहाय्यकहि होण्याचा पुष्कळ संभव आहे. जन्मजात कुलांचे गट जसे असतात, तसेच हे जन्मजात जातींचे गटहि आपल्या हिंदु राष्ट्राच्या विघटनेसच आजच्यासारखे कारणीभूत न होतां संघटनेसहि सहाय्यक होतील. आमच्या राष्ट्रीय

महासेनेच्या त्या निरनिराळया अुपसेना आपल्या परंपरांच्या छावण्यांतून गटा-गटांनीं संघटित नी सज्ज होत राहिल्या तर तें फारसे अनिष्ट नाहीं. राष्ट्रीय ध्वजाखालीं राष्ट्रीय ध्येयासाठीं राष्ट्राचें रणशृंग फुंकलें जातांच, त्या त्या अुपसेना झटकन् अेकत्र करून त्या महासैन्याच्या सुसंगत हालचाली करण्यास ही त्यांची गटागटांनीं केलेली पूर्वसज्जता अुपयोगी पडल्यावांचून राहाणार नाहीं. **जोंवर ह्या जाती मोडल्या नाहींत तोंवर** त्यांच्या विभिन्न परंपरेच्या आवडीनिवडींचा संघर्ष नी विरोध कमींत कमी हानिकारक करवून घेण्याचा आजच्या परिस्थितींत जो अेकच मार्ग आहे तो वरील दोन सूत्रें हाच होय.

ह्या दृष्टीनें पाहातां रत्नागिरीच्या चित्पावन संघाचें अुदाहरण कांहींसें अुल्लेखनीय आहे. या संघानें आपल्या अुद्देशपत्रिकेंत हीं वरील दोन सूत्रें गोविलीं असून नुकत्याच झालेल्या त्याच्या वार्षिक साधारणसभेंतहि त्यांचा सबळ पुरस्कार केला आहे. ‘ हा ज्ञातिसंघ आपल्या हिंदु राष्ट्राच्या कोणत्याहि ज्ञातीस केवळ जन्मतांच अुच्च वा नीच मानीत नाहीं. प्रत्यक्ष प्रकट होणाऱ्या गुणावगुणावरूनच ज्याची त्याची पात्रता ठरविली जावी. आणि कोणत्याहि ज्ञातीस वा व्यक्तीस अंगीं ते ते प्रकट गुण नसतां केवळ जन्माच्या वशिल्यानेंच कोणतेहि विशिष्टाधिकार वा विशिष्ट हानि भोगतां येऊं नयेत वा भोगावी लागूं नये असेंच या संघाचें ब्रीद आहे. ’ अशी ग्वाही त्या संघाच्या बहुतेक वक्त्यांनीं त्या सभेंत जी दिली ती स्तुत्य आहे. जर तो संघ त्यांचें हें लिखित ब्रीद तितक्याच प्रामाणिकपणें व्यवहारांतहि अुतरील आणि वैश्य, सारस्वत, मराठा, भंडारी प्रभृति ज्ञातिसंघहि जर तेंच ब्रीदवाक्य शिरोधार्थ करतील, तर या ज्ञातिपरिषदा नी हे ज्ञातिसंघ अखिल हिंदुराष्ट्राच्या राष्ट्रीय विघटनेस कारणीभूत होण्याचें भय फारसें अुरणार नाहीं; तर अुलट हिंदु संघटनेच्या महत्कार्यास ते झाल्यास अुपकारकहि होअूं शकतील.

## जन्मजात जातिभेदाचे चार पाय

तेव्हां आज हिंदु राष्ट्रास अत्यंत अपायकारक झालेल्या जन्मजात जातिभेदाचा अुच्छेद करण्यासाठीं आपणास केवळ मानीव असलेल्या ह्या पोथीजात अुचनीचतेला अुचलून धरणाऱ्या आणि व्यक्तीच्या प्रत्यक्ष नी प्रकट गुणांचा विचार न करतां, तिला कोणतेतरी विशिष्टाधिकार वा विशिष्ट हानि चिकटविणाऱ्या ज्या ज्या रूढी प्रचलित आहेत त्यांचें त्यांचें अुच्चाटन आपणांस

केलें पाहिजे. अशा रूढींत अत्यंत प्रबळ, व्यापक नी हिंदु राष्ट्राच्या संघटनेस मूलतःच घातक होणाऱ्या रूढी चार आहेत. त्या म्हणजे, **व्यवसायबंदी स्पर्शबंदी, रोटीबंदी आणि बेटीबंदी !**

## ( १ ) व्यवसायबंदी—

तोडण्यासाठीं आज काय केलें पाहिजे याची सविस्तर चर्चा गेल्या लेखांकांत केली आहे. जन्मजात जातिभेदाचा अत्यंत प्रबळ आधार ही व्यवसायबंदीची रूढीच होती. पण हिंदु राष्ट्राच्या सुदैवानें ती आज आधींच जवळजवळ अुच्छिन्नलेली आहे. वाटेल त्या जातीच्या मनुष्यास आज वाटेल तो व्यवसाय करतां येतो. त्यांत त्याच्या गुणानुरूप त्यास प्रतिष्ठाहि मिळते. निर्बंधाची ( कायद्याची ) त्याला कोणतीहि अटक नाहीं, अितकेंच नव्हे, तर अगदीं थोडे अपवाद वगळल्यास त्याला त्याच्या जातीचीहि आडकाठी अुरली नाहीं. ब्राह्मण, हा शिंपी, सोनार, डॉक्टर, वाणी अित्यादि वाटेल तो धंदा निर्बंधान्वयें ( कायदेशीर रीतीनें ) तर करूं शकतोच, पण त्याच्या जातिनियमानुरूपहि आज व्यवसायस्वातंत्र्यास आडकाठी अुरली नसल्यानें तो ते धंदे करूनहि पुन्हा ब्राह्मणच्या ब्राह्मण राहूं शकतो. तीच स्थिति अितर वर्णांची. पूर्वास्पृश्याविषयींहि निर्बंधाची अटक अुरलेली नाहीं. आज कोणताहि अस्पृश्य कोणताहि स्वतंत्र धंदा करूं लागला—वाणी, सुतार, डॉक्टर, बॅरिस्टर, शिक्षक झाला—तरी जातीच्या निमित्तानें निर्बंध ( कायदा ) त्यास अडवीत नाहीं. समाजाचा अप्रत्यक्ष अुपद्रव मात्र त्यास अजून सोसावा लागतो. पण त्यानें तोंड दिलें पाहिजे आणि वेळीं नैर्बंधिक सहाय्य घेअून त्या अुपद्रवाची खोड मोडली पाहिजे. व्यवसायबंदी आज जर खरोखर कुठें तुटली नसली तर ती भट नी भंगी ह्या दोन धंद्यांतच काय ती होय. त्यांतहि निर्बंध आड येत नाहीं. पण रूढि येते ! या दोन अपवादास अुच्छेदिणें अेवढेंच काय तें सुधारकांचें काम व्यवसायबंदी तोडण्याचें प्रकरणीं अुरलेलें आहे. तें त्यांनीं केलेंच पाहिजे आणि त्यांनींच केलें पाहिजे. पैकीं भंग्यांच्या धंद्याचें अेकस्व ( मोनॉपली ) तोडण्याचें दोन अुपायः—अेक हा कीं, भंग्यास प्रत्येक प्रसंगीं सन्मानानें वागवावें. त्यास हेतुतः प्रकटपणें बरोबर हातांत हात घालून हिंडावें. आपल्या घरीं सर्वसाधारणपणें स्पृश्य येतात तेथवर भंग्यासहि बेखटक येअूं द्यावें. समाजाच्या लक्षांत ठळकपणें येअील अशा थोड्या दिखाअूपणानें त्यास

प्रत्येक स्थळीं सन्मानावें, म्हणजे भंग्याचा धंदा हलकट ही भावना नाश पावून अितर जाती वेळ प्रसंगीं त्या धंद्यांत पडण्यास कचरणार नाहींत. आणि दुसरा अुपाय हा कीं, सुधाकरांनीं प्रसंगविशेषीं जाणूनबुजून सार्वजनिकपणें भंग्याचें काम करावें. वेळीं कांहीं दिवस तीच नोकरी करावी. भंग्यांच्या संपांत तर सुशिक्षित सुधारकांनीं हेतुतः भंग्याचें सारें काम स्वतः करून नगरग्रामें स्वच्छ ठेवावीं. स्वतःचा भंगी नाहीं कोण ! त्रिकाळ स्नान करणारा स्नातकहि आपलें भंग्याचें काम आपणच करतो. मोठा चक्रवर्ती राजा झाला, तरी तो बाकीचीं यच्चावत् कामें न्वाकरांकडून करवूं शकेल; पण स्वतःच्या भंग्याचें काम मात्र त्याचें त्यालाच करावें लागणार ! तें काम कांहीं तो राजाहि दुसऱ्या कोणाकडे कांहीं केल्या सोंपवणार नाहीं ! ही शिकवण सुधारकरांनीं तोंडी तर दिलीच पाहिजे, पण ती स्वतः प्रकटपणें सार्वजनिक भंगीकाम प्रसंगविशेषें वरचेवर करून दाखवून आचरली पाहिजे.

भटाची व्यवसायबंदी मोडण्याचें अुपाय असेः—अेक हा कीं, ब्राह्मण सुधारकानें शक्य तों भट बोलावूंच नये. आपलीं घरचीं व्रतें, सत्यनारायण, पूजापाठ सारीं स्वतः करावीं. वेळीं लग्नेंदेखील नैर्बंधिक नोंदीनें पार पाडावीं, म्हणजे ब्राह्मण सुधारकांना सहभोजनादि सुधारणांत प्रकटपणें भाग घेतांना जी ठराविक अडचण पडते कीं, ‘ नाहीं तर भट येणार नाहीं !’ ती मुळांतच नाहींशी होअील. दुसरा अुपाय हा कीं, ब्राह्मणेतर सुधारकांनीं भटास चक्क अट घालावी कीं, ‘तुम्ही आमच्या घरीं वेदोक्त संस्कार चालवाल तरच यावें.’ गौरीगणपतीप्रभृति प्रत्येक प्रसंगीं भटाकडून वेदोक्त पूजा करून घेतल्या कीं, वेदोक्तबंदी तुटलीच. आपली वृत्ति बुड-विण्यापेक्षां मोठमोठ्या शेटजींच्या वा सरदार, श्रीमंत अब्राह्मणांच्या घरीं वेदोक्त चालविण्यास मान्य होणारे भट मिळतात ही प्रयोगसिद्ध गोष्ट आहे. उदाहरणार्थ, प्रत्यक्ष रत्नागिरींत ती घडत आहे. पण ब्राह्मणेतर सुधारकहि भटास ही अट घालण्यास वचकतात ! तिथें भटापेक्षां अशा वाचाळ सुधार-कांचाच दोष अधिक असें म्हणणें भाग आहे. शक्य असेल तिथें भटांची व्यवसायबंदी तोडण्यासाठींच कांहीं अब्राह्मण विद्वान् सुधारकांनीं हेतुतः भटकी शिकावी. गुरव, जंगम, जोशीप्रभृति अब्राह्मण भटांचीहि भटशाही अशाच अुपायांनीं मोडली पाहिजे. भटांची भटशाही ही सर्वस्वी यजमानाच्या भावडे-

पणांतच आहे. त्यांत भटाचा अपराध अगदीं अल्प, हें सुधारकांनीं केव्हांहि विसरतां कामा नये. त्यास उत्कृष्ट अुपाय म्हणजे भट बोलावूं नये हाच ! साध्या भावड्यांनीं निरर्थक व्रतवैकल्यांच्या गौडबंगालास चाट देअून इत्यादि सामाजिक विधि नैर्बंधिक करारांच्या स्वरूपांत नैर्बंधिक नोंदीनें पार पाडावे; सारी पूजाप्रार्थना स्वतःच्या भाषेंत भक्तिभावानें स्वतःच करावी.

## ( २ ) स्पर्शबंदी

जन्मजात जातिभेदाचा दुसरा अुपाय जो स्पर्शबंदी तो पहिल्या व्यवसायबंदीच्या पायासारखा आज जरी आधींच दुबळा होअून पडलेला नाहीं, तरी त्यावर चहूंबाजूंनीं आज टोल्यावर टोले लगावले जात असल्यामुळें तोहि बराच अधू होत आला आहे. तरीहि सुधारकांना अजून दहाबारा वर्षे तरी ही स्पर्शबंदी अुखडून टाकण्यासाठीं पराकाष्ठेचे प्रयत्न करावयाला हवेत. स्पर्शबंदी ही व्यवसायबंदीप्रमाणें यच्चावत् हिंदु समाजाला भोंवत नाहीं. 'स्पृश्य समजल्या जाणाऱ्या वीस कोटी हिंदूंची ह्या व्यादीपासून मुळांतच सुटका झालेली असते. अुरलेल्या तीनचार कोटी हिंदूंना मात्र जन्मतःच त्यांची स्वतःची अुपजत प्रकृति धडधाकट असतांहि, ह्या महारोगाचें वीष समाजाकडून बळानें टोंचण्यांत येतें आणि त्यांचें जीवन प्रत्यक्ष महारोग झालेल्या दुर्भाग्याहूनहि दुर्भागी, दुर्धर, धीक्कृत नी अमंगळ करण्यांत येतें.

पण हा छळ 'स्पृश्य'च तेवढा अस्पृश्यांचा करतो असें नाहीं. तर 'अस्पृश्य' ही दुसऱ्या 'अस्पृश्या'चा असाच असह्य छळ करावयास सोडीत नाहीं. गांवच्या विहिरीवर कावळे, कुत्रीं बागडत असतां, नी पाणी पीत असतां भर दुपारीं ताहानेनें व्याकुळ झालेल्या महाराला त्या पाण्यास शिवतां येत नाहीं. हें पाहून तो महार जेव्हां त्याला तेथून शिवीगाळ करून हुसकून देणाऱ्या ब्राह्मण मराठ्यांना "राक्षस आहेत हे क्रूर" म्हणून शिवी देतो, तेव्हां तो ती शिवी देत नसून सत्य तेंच सांगत असतो ! पण महारवाड्यांतल्या विहीरीवर भंगी जर तसाच तान्हेला, तशाच भर दुपारीं, तसेंच पाण्याला शिवूं लागला तर तेच महार त्याच ब्राह्मणमराठ्यांसारखे त्यासहि शिवीगाळ करून हुसकून देण्यास सोडीत नाहींत ! ब्राह्मणास 'पाजी' म्हणणारा महार स्वतःच भंग्याचा ब्राह्मण बनतो ! भंग्याला तसेंच छळण्याच्या 'पाजी' पणांत रतिभरहि कमी करीत नाहीं ! नाशिकच्या राममंदिर सत्याग्रहाच्या वेळीं महार मंडळी देवदर्श-

नाचा, आपला हिंदुत्वाचा न्याय हक्क बजविण्यास गेली असतां, देवांतहि अस्पृश्यतेची संस्था घुसवून, 'स्पृश्य' देव नी 'अस्पृश्य' देव असा भेद निर्मून, अस्पृश्यांच्या दर्शनानें देव विटाळूं नये म्हणून जेव्हां कांहीं भटजी-शेटजींनीं त्या महारांची टाळकीं लाठ्यांनीं सडकली तेव्हां सात्विक संतापानें जे महार चवताळले, त्यांनीं हेंहि विसरतां कामा नये कीं, जर महार जातीच्या कोण्या मरीआअीच्या मंदिरांत देवदर्शनाच्या त्याच हिंदुत्वाच्या हक्कासाठीं भंगी लोक जाअूं लागते तर महारांनींहि तितक्याच लांब पल्ल्याच्या लाठ्यांनीं त्यांची टाळकींहि तशींच सडकण्यास कमी केलें नसतें!

अर्थात् स्पर्शबंदी तोडण्यासाठीं केवळ 'स्पृश्य' सुधारकांनींच नव्हे, तर 'अस्पृश्य' सुधारकांनींहि परस्परांशीं सहकार्य करून प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. स्पर्शबंदी तोडण्याचें दायित्व 'स्पृश्यां' अितकेंच 'अस्पृश्यां' वरहि आहे.

अशा लहानशा लेखांत फुटकळ अुपाय अशेषतः सुचविणें अशक्य. सर्वसाधारण रूपरेखा आंखणें नी दिग्दर्शनापुरतें कांही ठळक अुपाय सुचविणेंच काय तें शक्य. यास्तव स्पर्शबंदी तोडण्याच्या कार्यक्रमाविषयीं अितकेंच सांगणें अिथें पर्याप्त आहे कीं, अस्पृश्यता घालविणें म्हणजे दुसरतिसरें कांहीं नसून 'शिवणें' हेंच होय. अस्पृश्योद्धार–त्यांना शिक्षण, नोकऱ्या, घरें प्रभृति सहाय्य देणें हा देखील जातिभेदोच्छेदाचा विषय नव्हे. जातिभेदोच्छेदनाशीं प्रत्यक्ष संबंध जन्मजात अस्पृश्यता तोडण्याशींच काय तो आहे. न शिवणें म्हणजे अस्पृश्यता अर्थात् शिवणें म्हणजे अस्पृश्यता नाहींशीं करणें. रोटीबंदी बेटीबंदी, वेदोक्तबंदी प्रभृति अितर सुधारणा पुढच्या पायऱ्या त्या स्पृश्यांसहि लागूं असतात. अस्पृश्यांचा गट 'स्पृश्य' केला कीं, स्पर्शबंदी तुटली. अर्थात् अितर नाना अल्पसंबद्ध वा असंबद्ध प्रश्नांची ह्या प्रश्नांशीं गुंतागुंत केल्यानें, स्पर्शबंदीची जी बेडी तोडणें अेका बाजूनें अितकें दुर्घट कार्य वाटतें तेंच दुसऱ्या बाजूनें अितकें सोपें होअून बसतें. केवळ शिवायचें! कीं, जन्मजात जातिभेदाचा अेक पाय खाड्दिशीं अुखडला जाअून ज्याच्या त्याच्या पुरतें तरी चार कोटि हिंदुबांधवांस माणुसकींत आणून सोडण्याचें महत्कृत्य त्याचें त्यानें पुरतें केलें म्हणून समजण्यास हरकत नाहीं. तरी रे हिंदुसंघटका, अुठ आणि दुसरें कोणी काय हवें तें करो, तूं तुझ्यापुरतें या घटकेपासून हें

व्रत धर कीं, **जें बोट कुत्र्यामांजरास मी लावतों तें बोट मी माझ्या ' अस्पृश्य ' धर्मबंधूस, माणसास, प्रत्यहीं लावल्यावांचून प्रत्यहीं अन्नग्रहण करणार नाहीं.** म्हण ' शिवेन ! ' आणि कोणातरी अस्पृश्य धर्मबंधूस प्रत्यहीं, प्रकटपणें सगळ्यांना शिवून दाखीव !–कीं तुझ्यापुरतें तूं अस्पृश्यतेच्या पापापासून हिंदु जातीस मुक्त केल्याचें पुण्य जोडलेंस ! सर्वसाधारण स्पृश्याला घरांत आपण जितके येअूं देतों तितकें अस्पृश्यांस येअूं द्यावें, ज्यांचीं भाड्यानें देण्याचीं घरें असतील त्यांनीं स्पृश्यांप्रमाणेंच ती ' अस्पृश्यांना 'हि भाड्यानें द्यावींत; ज्यांच्या स्वतःच्या विहिरी असतील त्यांनीं त्या स्पृश्यांअितक्याच अस्पृश्यांना अुघडाव्या, जाणूनबुजून प्रदर्शनास्तवच महार, भंगीप्रभृति धर्मबंधूंस हातांत हात घालून साधेल तितक्या वेळां मार्गानें, बाजारांत, यात्रेंत प्रकटपणें हिंडावें. थोडक्यांत म्हणजे, जो कोणी अस्पृश्य भेटेल त्याला स्पृश्य समजूनच ते ते व्यवहार त्यांच्याशीं दिवसांतून अेकदां तरी प्रगटपणें सगळ्यांदेखत केल्यावांचून संध्याकाळ अुलटूं देअूं नये. ' अस्पृश्य ' सुधारकानें त्याच्या ' खालच्या ' अस्पृश्यास, तसेंच व्रत धरून अेकदां तरी दिवसांतून स्पृश्यत्वाचा अधिकार देअून शिवावें. चांभारानें धेडास, महारानें भंग्यास ! संघटक सुधारकांपैकीं जर प्रत्येकजणानें बोलघेवडेपणा सोडून असा करघेवडेपणा प्रत्यहीं आचरला, आपल्यापुरतें तरी ' अस्पृश्यांस ' पूर्णस्पृश्य करून सोडलें, तरीदेखील दहा वर्षांच्या आंत अस्पृश्यतेचा मागमूसदेखील साऱ्या समाजांत आढळून येणार नाहीं. अितकी संघटक सुधारकांची संख्या आजहि पुष्कळ झालेली आहे.

अस्पृश्य सुधारकांनीं आणखी अेक व्रत व्यक्तिशः स्वीकारलें पाहिजे. आज निर्बंधानें अनेक शाळा, कचेऱ्या, धर्मशाळा, विहिरी, वाहनें प्रभृति सार्वजनिक स्थानीं अस्पृश्यतेचें अुच्चाटन केलें आहे. त्या साऱ्या नैर्बंधिक ( कायदेशीर ) सवलतींचा प्रत्यक्ष अुपयोग प्रत्येक अस्पृश्य सुधारकानें हटातटानें करून त्या आत्मसात् केल्या पाहिजेत. ही गोष्ट सध्यां त्यांतल्या त्यांत सहज आहे. कारण त्यांत निर्बंधाचें सहाय्य सुधारकाच्या बाजूस आहे. या कामीं श्री. राजभोज बोर्डाच्या विहिरीवर अस्पृश्यांकडून प्रत्यक्षपणें पाणी भरविण्याची जी खटपट करतात आणि नागपूर प्रभृति प्रांतीं निर्बंधानुरूप अुघडलेल्या तलाव प्रभृति स्थानांचा प्रत्यक्ष अुपयोग करून घेण्याचा पायंडा जो तिकडील अस्पृश्य

पुढारी चढाअी करून, वेळीं सत्याग्रहानेंहि पाडीत आहेत तो प्रत्येक ‘ अस्पृश्या ’नें जिकडेतिकडे अनुकारिला पाहिजे.

परंतु आज जे हे नैर्बंधिक अधिकार अस्पृश्यांस मिळालेले आहेत, **त्या सर्वांत अत्यंत परिणामकारक अधिकार म्हणजे शाळांतून मुलें सरमिसळ बसविण्याचा होय.** हा अधिकार प्रत्येक अस्पृश्यानें तलाव, विहिरींप्रभृतींच्याहि आधीं बजावावा. मुलें प्रत्यहीं शाळेंत अस्पृश्यास्पृश्य भावना विसरावयास शिकलीं कीं, पुढच्या पिढीला धोबीप्रभृतिप्रमाणेंच महारभंगीहि पूर्णपणें नी सहजगत्या स्पृश्य वाटणारच वाटणार—केवळ सवयींच्या बळें ! ते अस्पृश्य केव्हां तरी होते याची आठवणहि बुजेल–लहानपणापासून सरमिसळ खेळीमेळीनें वागत आल्यानें ! स्पृश्य मुलांशीं–खोत, वकील, शेटजींच्या मुलांशीं बरोबरीनें प्रत्यहीं मांडीस मांडी भिडवून बसत आल्यानें अस्पृश्य मुलांची राहणी सुधारते आणि अनेक प्रसंगीं बुद्धीच्या चढाओढींत अस्पृश्य मुलांचा क्रमांक ब्राह्मणादिकांहूनहि वर लागला असल्यामुळें अेका बाजूस अस्पृश्याचा आत्मविश्वास वाढतो, दुसऱ्या बाजूस स्पृश्यांचा अहंकार घटतो. आज शाळेंत अस्पृश्य मुलें सरमिसळ बसूं लागलीं कीं, अुद्यां आपण होअून त्या अस्पृश्यांचें ‘पूर्वास्पृश्य’ झालेच म्हणून समजावें ! पुन्हा शाळांतून सरमिसळ बसण्याचे कामीं सरकारी निर्बंध ( कायदा ) अस्पृश्यांचे बाजूसच असल्यानें, मंदिरप्रवेशापेक्षांहि अधिक परिणामकारक असतांहि हा अुपाय अधिक सहजसाध्य ठरतो.

यास्तवच मंदिरप्रवेशाचा प्रश्न सध्यां दुय्यम समजावा—शाळाप्रवेशाहून तरी ! कारण मंदिराविषयीं वहिवाट वैयक्तिक भत्ता अित्यादि प्रत्येक प्रकरणीं निर्बंध ( कायदा ) अस्पृश्यांच्या अुलट जाणार हें ठरलेलें. मंदिरप्रवेशाच्या प्रश्नावर चढाअी करून त्यास सुरुंग लावण्याचा, कमींत कमी विरोधाचा नी जास्तींत जास्त परिणामाचा मार्ग म्हणजे रत्नागिरीच्या पतितपावन मंदिरासारखें अेकेक अखिल हिंदु देवालय, जातिनिर्विशेषसमानतेच्या पक्क्या पायावर प्रतिनगरीं स्थापणें, तेंच यशस्वी करून दाखविणें–हाच होय. जुनीं मंदिरें धडाधड अुघडलींच पाहिजेत, अुघडणारच; पण तीं त्यांच्यावर समोरून चढाअी करून नव्हे, तर अखिल हिंदु देवालयांचा वा धर्मालयांचा सुरुंग त्यांचे मर्मस्थानींच भरून त्याच्या धडाक्यासरशीं समाजाच्या भावनेंतच क्रांति घडविल्यानें होय. ह्या वर्षी पुढें मागें रत्नागिरीच्या जात्युच्छेदक आंदोलनाच्या प्रयोगाची प्रत्यक्ष

फलश्रुति आम्हीं अेका लेखांत स्वतंत्रपणें सांगू अिच्छतों. त्यांत श्रीपतितपावनासारख्या ह्या अखिल हिंदुसंस्थेचे परिणाम ह्या प्रकरणीं किती दूरवर होतात, तें स्पष्टविलें जाअीलच.

## ( ३ ) रोटीबंदी

जन्मजात जातिभेदांचें अुचाटण जर आजच्या परिस्थितींत कोणत्या अेखाद्या रूढीच्या अुचाटणांतच बव्हंशीं सामावलेलें असेल तर तें ह्या अुचाटणांतच होय. कारण व्यवसायबंदी तुटलेलीच आहे; स्पर्शबंदी ही सर्व हिंदुसमाजास लागू नसून अस्पृश्यांपुरतीच आहे. तुटतहि आली आहे आणि रोटीबंदी तुटून महाराबरोबर ब्राह्मण जर जेवूं लागला, तर तो स्पर्श करील कीं नाहीं हा प्रश्नच अुरत नाहीं. अुंटच गिळणारा सुपारीचें खांड गिळण्यास का कचरणार आहे ? आणि बेटीबंदी ही रोटीबंदी तोडण्याअितकी कां अवश्य नी कठिण नाहीं तें आम्ही पुढें सांगतच आहों. अशा रीतीनें आजच्या जातिभेदाच्या या चार पायांपैकीं जो पाय मुख्यत्वेंकरून हाणतांच हें धूड खालीं कोसळणारें आहे तो पाय रोटीबंदी हाच होय ! आजच्या ह्या हजारों जाती अेकमेकांपासून पृथक् करणारें मुख्य नी सर्वगामी जिवंत लक्षण रोटीबंदी नी बेटीबंदी हेंच होय. पैकीं रोटीबंदी फार थोड्या प्रमाणांत जात्युच्छेदनाच्या सार्वजनिक नी त्वर्य ( अर्जंट ) कार्यक्रमास आडवी येते. ती कशी तें पुढें पाहूं अुरलेली रोटीबंदी तेवढी तत्काळ तोडलीच पाहिजे आणि ती तोडली कीं, जन्मजात जातिभेदांत जो कांहीं थोडाबहुत खरा जीव आज अुरलेला आहे त्याच्या मर्मीं मारक टोला बसलाच म्हणून समजावें.

रोटीबंदी तोडावयाचें साधनहि विश्वास वाटूं नयें अितकें सोपें आहे; नुसतें जेवायचें !—भिन्न जातीयाबरोबर जेवायचें ! कीं हा अेवढा दुर्गम, दुस्साध्य वाटणारा जातिभेदाचा प्रचंड गड गडगडत कोसळलाच पाहिजे. जातिभेद अेकत्र लढून जन्मांत मरायचा नाहीं; पण अेकत्र जेवतांच तो ठिक च्याठिकाणीं मरून पडतो. यास्तव प्रत्येक खऱ्या सुधारकानें हें सूत्र वेशीवर टांगावें कीं, जें रुचेल नी पचेल तें वैद्यकीय दृष्ट्या योग्य त्या कोणत्याहि मनुष्यानें खावें, नी प्यावें !’ तो हिंदु असो, मुसलमान असो वा अंदमानीज असो—कोणाबरोबरहि खाण्यानें, पिण्यानें, सहभोजनानें वा सहपानानें, जात जात नाहीं ! धर्म बुडत नाहीं ! सहपान वा सहभोजन हा वैद्यशास्त्रीय प्रश्न

आहे; जातीची जात किंवा धर्मच्या धर्म भाताच्या पेजीच्या बुडबुड्यांत बुडतो असें सांगणाऱ्या भावड्या धर्मशास्त्रांचा नव्हे ! आम्हांस जर कोणा संघटक सुधारकानें विचारलें कीं, आजच्या स्वरुपांत असलेल्या ह्या पोथीजात जातिभेदाचें मरण नक्की कशांत आहे ? तर आम्हीं अेका शब्दांत अगदीं प्रयोगसिद्ध सत्य म्हणून सांगूं कीं—

## सहभोजन ! सहभोजन !! सहभोजन !!!

या पोथीजात जातिभेदाचें मरण सहभोजनांत आहे. पण त्याच्या अटी ह्याः— (अ) ' आम्हांस सहभोजनाचें तत्त्व मान्य आहे ! ' अशी वाचाळता करून प्रत्यक्षपणें सहभोजनांत भाग घेण्यास कचरतां कामा नये. (आ) सहभोजनांत अितर कोणी भाग घेवो वा न घेवो अन्य जातींचा अेकच मनुष्य जरी मिळाला, तरी आपण आपल्यापुरते त्याच्याबरोबर जेवून आपल्यापुरती रोटीबंदी तोडली पाहिजे. (अि) ती जन्मांत केव्हां तरी अेकदां तोडूं, आतां पुन्हां मुद्दाम कशाला ? असें विचारीत पुन्हां अुभ्या जन्मांत सहभोजनांत पाय न टाकणारें भीरुत्व वा सभ्यत्व कुचकामी समजून प्रत्यहीं प्रसंग आला तरी प्रत्यहीं सहभोजन केलें पाहिजे. प्रत्यहीं ब्राह्मणभोजन करणारा जर अधिकच पुण्यशील समजला जातो, तर प्रत्यहीं सहभोजन करणारा मात्र खट्याळ कां समजला जावा ? (अी) प्रत्यक्ष सहभोजन प्रकटपणें—जाहीर रीतीनें—झालें पाहिजे. नांवें शक्य तों छापलीच पाहिजेत. अिराण्याच्या दुकानांत जसे अचानक ' भटजी ' सांपडतात आणि कॉलेजांतून वा कलेक्टरम्लेंच्छांसह गुपचुप जेवणारे वकील वा पदवीधर अुघडपणें आमच्या रोटीबंद आर्यसंस्कृतीचा अुदोअुदो करतांना जसे गल्लोगल्लीं आढळतात, तसेच मिथ्याचारी सुधारकहि दुर्मिळ नाहींत ! त्यांचा अुपयोग काय ? (अु) प्रत्येक सहभोजनांत शक्य तों ' अस्पृश्य ' मनुष्य अवश्य असावा. सहभोजनाची तीच खरी क्षारपरीक्षा ( ॲसिड टेस्ट ) आहे ! नाहीं तर केवळ ब्राह्मणाबरोबर सहभोजनें करण्यास हपापलेले, पण महाराबरोबर बसतांच 'आज कोठा जड, दूध घेतों कीं थोडें !' अशी लटपटपंची करणारे समाजिस्ट कांहीं थोडेथोडके भेटत नाहींत !

आम्ही अनुभवजन्य निश्चितीनें सांगतों कीं, असें प्रत्यक्ष आचरण करणारे पांचशें संघटक सुधारक वारंवार सहभोजनें करीत राहिले, तर पांच सहस्र वस्तीच्या नगरांतून रोटीबंदीची रूढि अुखडून टाकूं शकतात. जेवण्यावारीं

जातिभेद मारला जातो, तें कसें हें लेखमर्यादेमुळें अिथें पाल्हाळानें आम्हीं सांगत बसत नाहीं—पाल्हाळ अवश्यहि नाहीं. खऱ्या संघटक सुधारकांस आम्हीं ग्वाही देतो कीं, तुम्ही आधीं करून पाहा. फळ न मिळालें तर मग ह्याचें समर्थन आम्हांस पाल्हाळानें विचारीत बसा. बहिष्कार ? पडतीलच ! पण पांचशें चिकाटीच्या सहभोजक सुधारकांवर बहिष्कार घालणारा पांच हजारांचा बहुजनसमाजहि अंतीं मेटाकुटीस येतो. कारण बहिष्कार हें दुधारी शस्त्र घालणारासहि तें कापतें. खरा सुधारक निश्चितार्थ असतो. बहुजनसमाज तसा नसतो. संख्येचें प्रमाण हें वरचें असेल तर, बहुजनसमाजच या रोटीबंदी प्रकरणीं तेवढें बोलायचें तर—आज तितकासा मनःपूर्वक विरुद्ध नसल्यामुळें त्रास सोसण्या-अितका चिवट राहात नाहीं आणि शेवटीं त्याची दृष्टि मरून, त्यांत त्याला कांहीं विशेष चिडल्यासारखें वाटेनासें होअून, आगबोटींत विटाळ नाहीं हें शास्त्र जसें जन्मलें तसें सहभोजनानें जात जात नाहीं हें शास्त्रहि न कळत अुमजतें,—पटतें.

## ( ४ ) बेटीबंदी

जातिभेद मोडायचा म्हणतांच सर्वसाधारणतः बहुतेक लोकांना जो धक्का बसतो तो त्यामुळें बेटीबंदी तुटून प्रचंड घोंटाळा अुडणार ह्याच कल्पनेनें होय ! म्हणजे आतां शेंकडों ब्राह्मणांच्या मुली महारवाड्यांत कोंबायच्या नी चांभारांच्या मराठामोळ्यांत घुसायच्या ! अशी एक भयानक कल्पना जातिभेद मोडायचा म्हणतांच लोकांसमोर उभी राहते ! रोटीबंदी तोडून महारांच्या पंक्तीस ब्राह्मण जेवणाऱ्या सहभोजनांचादेखील त्यांना अेक वेळ अितका धक्का बसत नाहीं; पण बेटीबंदी तोडण्याचें नांव काढतांच जे अगदीं घाबरून जातात ! अुलटपक्षीं कित्येक सुधारक विशेषतः जहाल अस्पृश्य—जातिभेद तोडायचा याचा अर्थ ब्राह्मणांच्या मुली आम्हांस दिल्या पाहिजेत असाच नेमका टांमूनठांसून सांगतात !

पण वास्तविक पाहातां त्या पहिल्यांची भीति नी ह्या दुसऱ्याची आकांक्षा ही सारखींच असत्य नी अतिरेकी आहेत. कारण बेटीबंदी तोडण्याचा अर्थ अमक्याच्या मुली तमक्यांना 'दिल्याच' पाहिजेत असा नाहीं. ब्राह्मणांच्या वा वाण्यांच्या मुली आम्हांस ' दिल्याच ' पाहिजेत असें म्हणणारे अस्पृश्यहि त्या सौद्याच्या प्रतिमूल्याचा प्रश्न निघतांच धक्का खाअून ' नव्हे, नव्हे, दिल्याच

पाहिजेत असें नव्हे !' असें म्हणत चांचरूं लागतात; कारण त्यांसच तें प्रतिमूल्य परवडत नाहीं. जातिभेद मोडण्यासाठीं ब्राह्मण–वाण्यांच्या शंभर मुली जर महारचांभारांस 'दिल्याच' पाहिजेत, तर त्याच अटीप्रमाणें महारचांभारांच्या शंभर मुली भंग्यास नी धेडांसहि 'दिल्याच' पाहिजेत, म्हणून भंग्यांच्या वतीनें मागणी घालण्याचा अुशीर कीं, त्याच महारचांभार-जहालांस भीक नको पण कुत्रा आंवर असें होअून जातें. आणि तेहि विवेकाची भाषा बोलूं लागतात.

तो विवेक असाः—अमक्यानें तमक्या मुली 'दिल्या' पाहिजेत ही भाषाच मूलतः असह्य नी आजतर अशक्य आहे ! आजच्या मुली उपवर असणार, त्यांच्या वरांना दिवसेंदिवस मुख्यतः त्याच निवडणार. आम्हांस 'देणारे' तुम्ही कोण म्हणून त्या आओबापांसदेखील जिथें हटकणार तिथें तिसऱ्या सोमाजी-गोमाजीस कोण विचारतो. दुसरें असें कीं, महार, वाणी, बंगाली, मराठ्यानें अेखादे दिवशीं क्षणभर शेजारीं बसून सहभोजनांत जेवणें निराळें आणि भाषा, वेषभूषा, आचारआहारानें विभिन्न अशा अेका रहाणींतील मुलीला दुसऱ्या अगदीं अपरिचित राहाणींत जन्माची ढकलणें वा जावें लागणें हें निराळें ! अुद्यां रोटीबंदी जरी अगदीं निर्बंधानें ( कायद्यानें ) तोडली, तरी देखील महाराष्ट्रीय ब्राह्मण मुलीला बंगाली ब्राह्मणाच्यादेखील घरीं देणें हजारीं नअूशेंनव्याण्णव अंशीं परवडणार नाहीं, जुळणार नाहीं, कारण जातीचा विराच सोडला, तरी लग्नासारख्या आजच्या शरीरसंबधांत सोयीचा विचार तरी केला जाणारच जाणार. त्या मराठी नी बंगाली ब्राह्मण वधुवरांच्या आवडीनिवडीहि जुळणें दुर्घट. मराठी ब्राह्मण वधू त्या बंगाली ब्राह्मणाच्या घरीं, आपल्या सासरीं जातांच तीं माणसें बंगाली बोलणार, ही मराठींत अुत्तरणार ! कानडीनें केला मराठी भ्रतार ! अेकांचें अुत्तर अेका नये ! पुढें स्नानें होअून साड्या पालटूं लागतांना त्या बंगाली सासू–जावा बिनकाष्ट्यानें लुगडीं नेसणार; हिला तसेंच बिनकाष्ट्यानें सगळ्यांसमोर वावरणें जिवावर येणार ! सैंपाकाला ती सासू बसली कीं हिला सांगणार, 'येवढे चार मासे सोलून दे पाहूं.' जेवतांना ती बंगाली ब्राह्मणांच्या रीतीप्रमाणें माशांची आमटी भुरक भुरक भुरकणार ! ही मराठी ब्राह्मणाची मुलगी त्या मासोळी जेवणाच्या वासासरशीं ओकओक ओकणार ! परत वरचेवर माहेरीं यावें तर अेका वर्षाचा येत्याजात्या भाड्याचा खर्च लग्नाअेवढा होत रहाणार ! !

ही गोष्ट जशी अेका प्रांतांतील मुली स्वजातीय परप्रांतीयांच्या घरीं दिल्याची, तशीच गांवांतल्या गांवांतहि महाराची मुलगी मराठ्याच्या वा चांभाराची महाराच्या घरीं देण्याची. अंतर, भाषा, रहाणी अित्यादि सोयी–गैरसोयीमुळें नी आवडीनिवडीमुळें रोटीबंदी तत्त्वतः तुटली तरी, अेका जातीच्या मुली शेंकड्यानें अन्य जातींत ढकलल्या जातील अशी जी भीति वाटते ती तसें कधींहि घडणें शक्य नसल्यामुळें अगदीं काल्पनिक आहे. अिंग्लंड नी स्कॉटलंड यांमध्यें जातवारीची बेटीबंदी नाहीं. पण ह्या सोयीगैरसोयीमुळेंच हजारीं अेक अिंग्लिश मुलगी लंडनला पिढ्यान् पिढ्या राहात असतां स्कॉटलंडांत दिली जाते कीं नाहीं, याची शंकाच आहे. लंडनच्या मुली बहुधा लंडनच्या आसपासच आपले वर निवडणार. तीच स्थिति जातवार बेटीबंदी तत्त्वतः तुटली तरी पुण्याची, मद्रासची, कलकत्त्याची, रत्नागिरीची. तिथल्या मुली बहुधा आपल्या शेजारच्या गांवांत नी स्वजातींतच आपले सासर शोधणार, आपलें स्वयंवर निवडणार; तेव्हां बेटीबंदी तत्त्वतः तुटली तरी प्रत्यहींच्या व्यवहारांत अकस्मात् म्हणण्यासारखी अुलाढाल होणें शक्य नाहीं. मग बेटीबंदी तोडायची याचा अर्थ तरी काय ? त्याचा अर्थ हा कीं—

**बेटीबंदी तोडणें म्हणजे, अमक्या जातीच्या मुली तमक्या जातींत 'दिल्याच' पाहिजेत अशी आज्ञा नसून, जर कोणा हिंदूनें प्रेमशील, सुप्रजननक्षमता प्रभृति वैवाहिक गुणानुकूल असा अन्य जातीचा हिंदु वधूवर निवडला तर, केवळ जात भिन्न अेवढ्यासाठींच, तो विवाह निषेधिला जाअूं नये वा त्यायोगें त्या वधूवरांस पूर्णपणें सव्यवहार्य समजण्यास हरकत असूं नये, अशी अेक अनुज्ञा आहे.**

अशी मिश्रविवाहाची अनुज्ञा जन्मजात जातिभेद मोडण्याच्या दृष्टीनें नव्हे, तर शुद्धिचळवळ पचविण्यासहि अत्यंत अवश्य आहे. हिंदु राष्ट्राच्या संघटनास अुपकारक नी अपरिहार्य आहे.

बेटीबंदी तोडण्याची अेक मर्यादा मात्र मनुष्यप्रगतीच्या सद्यःस्थितींत नी हिंदु राष्ट्राच्या आजच्या विशिष्ट परिस्थितींत निरपवादपणें पाळणें अवश्य आहे. ती ही कीं, हिंदूनें आपसांतील कोणत्याहि जातीशीं विवाह केला तरी चिंता नाहीं; पण हिंदुत्वाच्या कक्षेबाहेर जाअून कोणीहि मुसलमान

खिश्चनादिकांशीं विवाह करतां कामा नये. जोंवर मुसलमान, मुसलमानच राहूं अिच्छितों तोंवर हिंदूला हिंदूच राहिलें पाहिजे. तिला वा त्याला हिंदु करून घेतल्यावांचून अहिंदूशीं विवाह करणें आपल्या हिंदु राष्ट्राच्या सामुदायिक हितास अत्यंत अनिष्ट आहे. ज्या वेळीं ते दुराग्रही अहिंदु केवळ मनुष्यधर्मास भजूं लागतील नी मुसलमानकी सोडून माणुसकींतच सामावतील तेव्हां हिंदूही त्याच मनुष्यधर्माप्रमाणें मनुष्यामनुष्यांत कोणताहि जातिधर्म, देशाचा भिन्नभाव मानण्याचें सोडून केवळ माणुसकीचें नातें तेवढें पाळतील. आज मात्र हिंदूंनीं तसा भोळसटपणा करणें हेंच माणुसकीच्या विरुद्ध आहे.

## बाँब–गोळ्यांनीं नव्हे, बुंदीच्या लाडवांनीं !

जर या दोन्ही लेखांकांत दिग्दर्शिलेला कार्यक्रम पुढें ठेवून प्रत्येक संघटक सुधारक, अितर कोणाची वाट न पहातां आपला आपण ह्या सुधारणास स्वतःच्या प्रत्यहींच्या आचरणांत व्यवहारूं लागेल, प्रत्यक्ष तसें करूं लागेल, तर जन्मजात जातिभेद ज्या अर्थी तो मोडायचा आहे त्या ह्या लेखांत विशदिलेल्या अर्थी, अुच्छेदिणें फारसें दुर्घट नाहीं. ज्याच्या त्याच्यापुरता तरी जातिभेद आजच्या आज तोडतां येणार आहे. त्यांतल्या त्यांत त्यांचा आजचा जिवंत चालता पाय जी रोटीबंदी ती तर प्रत्येक सुधारकानें तत्काळ आणि सारखी तोडीत राहिलें पाहिजे. सहभोजन हाच जातिभेदाच्या संमंधास गाडणारा प्रबल मांत्रिक ! नुसत्या शास्त्राधाराच्या अेरंडाच्या गुऱ्हाळानें तर तो जातिभेद मरणार नाहींच, पण प्रत्यक्ष शस्त्राधारांच्या नैर्बंधिक सक्तीसहि तो मारणें दुर्घट, अनिष्टहि. जसा मारावा तसा जर त्यास मारणे असेल, तर सुधारका, तूं तुझ्यापुरती रोटीबंदी तत्काळ तोडून टाक. किती सोपें हें साधन ! ब्राह्मण नि महारांनीं अेकत्र बुंदीचे लाडू झोडावयाचे कीं जातिभेद मेलाच म्हणून समजा ! जातिभेदाच्या ह्या अजिंक्य किल्ल्यास असाच शाप मिळालेला आहे कीं, तूं शतकोशतकें बाँबगोळ्यांच्या माऱ्यानेंहि ढांसळणार नाहींस; पण शेवटीं बुंदीच्या लाडवांचा मारा मात्र तुझा चक्काचूर अुडवील ! !

# सूडाचें तत्त्वज्ञान !

## अशा वेळीं सूड हाहि परोपकारच होय !

### स्वतःसाठीं जरी नसेल तरी अुरलेल्यांनीं जगावें म्हणून !

( स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं लिहिलेल्या प्रख्यात "संन्यस्त खड्ग" या नाटकांतील हा अुतारा आहे. आत्यंतिक अहिंसेच्या प्रचारामुळें पंगु नि प्रतिकारशून्य झालेल्या शाक्य राष्ट्रावर कोसलच्या विद्युद्गर्भ राजानें स्वारी केली आणि त्याची धुळधाण अुडविली. तेव्हां ज्या शाक्य वीरांनीं आत्यंतिक अहिंसा ही पाप आहे आणि आक्रमक अन्यायाचा प्रतिकार हेंच पुण्य होय असें ब्रीद सोडलेलें नव्हतें, त्यांच्या शेवटच्या झुंजार सैन्यापुढें "शरण की रण" हा प्रश्न अुभा राहिला. त्या बुद्धकालीन अैतिहासिक परिस्थितींत तात्कालिक जयासाठीं नसलें तरी सूडासाठीं लढणें हेंच कर्तव्य आहे असें मतप्रतिपादणारें खालील भाषण शाक्यांच्या समरसभेंत त्यांचा अेक शूर सेनानी सुलोचन करीत आहे:—

**सुलोचन...** विजयाची आशा सुटली तरी शाक्यांस अजूनहि अेक आशा आहे. ती म्हणजे सूडाची. मरण टाळणें अशक्य आहे. पण तरीहि अेक गोष्ट शक्य आहे, ती म्हणजे **मारीत मारीत मरणें** ! ही माझी वृत्ती म्हणजे केवळ क्रोधाची अंध प्रतिक्रिया आहे असें तुम्हांला वाटेल, पण आहेच ती तशी ! पण **ही दलित क्रोधाची प्रतिक्रियाच अुन्मादाच्या हत्तीचा अंकुश असते.** सापाच्या शेपटीवर पाय पडला तर साप चटकन अुलटून दंश घेतो व आपण मरतां मरतां शत्रूसहि मरणोन्मुख करून सोडतो. तो कांहीं **विजयासाठीं नव्हे, रक्त पिण्यासाठीं नव्हे, तर सूडासाठीं;** आणि

सापाची जात अशी सूड घेणारी आहे ही मनुष्यांस धास्ती असल्यानें मुंगीस किंवा वागुरड्यास मुलेंही जशी गमतीनें चिरडतात तशीं माणसें सापास चिरडूं धजत नाहींत. वाघास बाण लागून तो घायाळ झाला तरीहि केवळ या निराश प्रतिक्रियेच्या आवेशानें अुडी घेअून मृगयूच्या नरडीस दांत देतो. **तो वाघ मरतो, तरीही वाघाच्या या सूडघेअू प्रतिक्रियेचा स्वभाव पाहून वाटेल तो मनुष्य वाघाच्या मृगयेस सशाच्या मृगयेसारखा सहज गमतीनें जात नाहीं, मुंगी** ती काय! मनुष्याच्या पायास डसते तेव्हां तिला पक्कें माहीत असतें कीं या डसण्यानें मी व्यक्तिशः वांचत नाहीं. पण ती **जगण्यासाठीं डसतच नाहीं. तर आपल्याला मारण्याचा काहीं तरी दंड मारणारालाहि भोगावा लागावा म्हणून ती डसते.** ती डसकी मुंगी मरते. पण पुन्हां तिच्या जातीच्या तशा डसक्या मुंग्यांच्या वारुळांत मनुष्य तर काय पण साप देखील सहसा घुसत नाहीं. मधमाशांची अेक जात आहे, **त्यांचें मोहळ पाडतांच त्या मधाचा नाद सोडतात, आपल्या अितर माशांचें काय होअील ही चिंता बाळगीत नाहींत.** तर अेकेकटी जी माशी असेल, तशीच त्या मोहोळ अुडविणाऱ्या माणसास गांवोगांव पाठलागीत जाते. डसते तेव्हां तिची नांगी त्या माणसाचे अंगांत अितकी पक्की रुजते कीं तिला परततां येत नाहीं.. ती तिथेंच मारली जाते **पण तरीही जाणूनबुजून तीं तसें मरण्यास येते. कारण सूड घेत मरण्याचें समाधान अपमानीत जीवनाच्या समाधानाहून तिला अधिक आनंद देतें,** त्यामुळें रेशमी किड्यांच्या अुभ्या वसाहतींत मनुष्य जितका भीत नाहीं, तितका त्या मधमाशांच्या अेकेका माशीस भितो. प्राणिमात्राच्या **क्रोधास ही जी निसर्गानेंच सूडाची नांगी ठेविली आहे तिच्यांत हा दैवी हेतु असतो कीं ही सूडाची प्रवृत्ति आततायी आक्रमणास त्यांचे पापी अपहरण सहसा अगदींच स्वस्त पडूं देत नाहीं.** त्यामुळें तो आततायी कर्म करणारा तितक्या निर्भय वेगानें धांवत नाहीं कीं जितक्या वेगानें तो सूडाचे भय नसतें तर धांवला असता. आततायी पीडेपासून त्या प्रमाणांत अुरलेलें जग अधिक सुरक्षित राहातें. म्हणून, जर आतां शाक्य राष्ट्र मरणेंच अनिवार्य आहे तर **स्वतःच्या जगण्यासाठीं नसलें तरी निदान अुरलेल्या जगानें जगावें म्हणून** तरी शाक्यांनीं विद्रु-

गर्भावर वाघासारखें तुटून पडावें. अेकेका शाक्यानें निदान पांच पांच क्रूरकर्मी कोसलांचे कंदन करीत, दंड देत देत, सूड घेत घेत मरावें म्हणजे हा विद्यूतद्गर्भ अितर लहान लहान प्राजकांवर तरी यापुढें सशस्त्र छापा घालू धजणार नाहीं.

**अशा वेळीं सूड ही नुसती अुपजत प्रतिक्रिया नव्हे तर परोपकारक कर्तव्य आहे !** म्हणून माझें आपल्या प्रश्नास अेकच अुत्तर आहे कीं, **शरण नव्हे सूड !**

—सन्यस्त खड्ग, पृष्ठें १०७–१०८, सन १९३१.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६६५०

REFBK-0006850

कादंबरीमय पेशवाओी, कादंबरीमय शिवशाहीकर्ते

सुप्रसिद्ध कादंबरीकार

विठ्ठल वामन हडप कृत

# कादंबरीमय आंग्लशाही

१८५७ पासून सुरू झालेल्या व आजपर्यंत चालू असलेल्या भारतीय स्वातंत्र्य संग्रामावर सुमारें दहा कादंबऱ्या श्री. हडप लिहिणार आहेत.

मालेंतील प्रथम पुष्प

# भारतमाते ऊठ

लवकरच प्रसिद्ध होओील

प्राप्तिस्थळ:—

## ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर

गोरेगांवकरांची चाळ क्र. २ गिरगांव, मुंबओी ४

# स्वा. सावरकर साहित्य

| | |
|---|---|
| ५७ चें स्वातंत्र्यसमर | १०-०-० |
| मॅझिनी | ५-०-० |
| माझी जन्मठेप | ८-०-० |
| सावरकर साहित्य ३-४-५ | २-४-० |
| सावरकर भाषणे | २-०-० |
| संघटन संजीवनी | १-४-० |
| हिन्दूंच्या चळवळींचें ध्येय धोरण | १-०-० |
| गांधी गोंधळ | १-०-० |
| हिन्दुत्व | ३-०-० |
| हिन्दुत्वाचे पंचप्राण | ३-०-० |

## काव्य

| | |
|---|---|
| रानफुलें | २-०-० |
| सावरकर कविता (२री आवृत्ती छापत आहे) | |
| गोमान्तक | ३-०-० |

## पोवाडे

| | |
|---|---|
| सिंहगड | ०-८-० |
| बाजीप्रभू | ०-८-० |
| चाफेकर रानडे | ०-६-० |

## नाटकें

| | |
|---|---|
| उ:शाप | १-४-० |
| सन्यस्तखड्ग | १-८-० |

आवृत्ती संपल्या

(१) उत्तर क्रिया (२) लंडनचीं बातमीपत्रें
(३) अंदमानच्या अंधेरींतून (४) हिन्दुपद पातशाही

प्राप्तिस्थळ:—

**ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर**

गोरेगांवकरांची चाळ क्र. २ गिरगांव मुंबई ४

आपले आर्थिक व्यवहार

# दि दक्षिणी ब्राह्मण
# कोऑपरेटिव्ह बँक लि०

## तर्फेच करा—

भांडवल

खपलेलें रु. २,००,००० खेळतें रु. ४५,००,०००

**आमचेकडे**

**१ फिक्स्ड् डिपॉझिट २ क्युमुलेटीव्ह डिपॉझिट**
**खाते अुघडून भावी काळाची तरतूद करा.**

| | |
|---|---|
| मुख्य कचेरी<br>जयंत निवास<br>गिरगांव, मुंबअी ४ | : शाखा :<br>दादर<br>मेनरोड |